## प्रकरण ४
## राजकिय चळवळी

**प्रस्तावना**

सतराव्या शतकापासून महाराष्ट्र राजकीयदृष्ट्या कार्यशील आहे. दखखन किंवा देश (पुणे, पंढरपूर आणि नाशिक) राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्राचे महत्त्वाचे भूभाग होते. तथापि शिक्षणाच्या अभावी तळागाळातील जनतेचे राजकीय ज्ञान मर्यादीतच राहीले. त्यास अजून एक कारण म्हणजे राजकारणापेक्षा आर्थिक आणि तात्त्विक ज्ञानावर जास्त भर होता. पर्यायाने जरी ब्राह्मण लोक राजकीयदृष्ट्या जागृत असले तरी सर्वसामान्य जनता राजकीयदृष्ट्या तटस्थ किंवा अकार्यक्षमच होती. जरी मराठ्यांची राज्ये ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली गेली तरीसुद्धा एकोणिसाव्या शतकाच्या मध्यानंतरच पुण्यात राजकीय घडामोडींना सुरुवात झाली.

मुंबई शहरात राजकीय जागृतीला एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच आरंभ झाला. इ.स.१८४१ मध्ये भास्कर पांडुरंग तर्खडकरांनी ब्रिटीशांच्या साम्राज्यावादी योजनांवर घाणाघाती हल्ला केला. इ.स.१८४८-४९ च्या दरम्यान, लोकहीतवादी गोपाळ हरी देशमुख यांनी सुद्धा मराठी पेपर 'प्रभाकर' मधून ब्रिटीशांच्या साम्राज्यावादी धोरणांवर टीकात्मक अनेक लेख लिहिले. ह्या सगळ्या सामाजिक क्रांतीची परिणिती अखेर इ.स.१८५२ मध्ये पहीली राजकीय संघटना मुंबई शहरात स्थापन झाली. तिचे नाव होते 'बॉम्बे असोसिएशन'.

**बॉम्बे असोसिएशनचे कार्य**

सर्वात प्रथम राजकीय पुढाकार मुंबई शहरातेल व्यापाऱ्यांनी व शेठ लोकांनी घेतला. इतर वर्गाप्रमाणे शेठ समुहात जाती बंधन नव्हते. त्यांच्यामध्ये एक सामायिक उद्देश, राहण्याची पद्धत आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे समाजातील स्थान. अनेक जाती-धर्माचे लोक व्यापार धंद्याच्या उद्देशाने उद्योग मोहीमांचे भागीदार म्हणून एकत्र आले. जशा त्यांच्या व्यापार मोहीमा यशस्वी होऊ लागल्या, तसे ते एकमेकांना एका वेगळ्याच उच्च वर्गाचे प्रतिनिधी ज्यांचे आर्थिक उद्दीष्ट एकच आहेत असे समजू लागले. तसेच त्यांचे स्वतःचे असे स्वतंत्र राजकीय विचार, दर्जा होता आणि ते स्वतःला मुंबईचे स्वयंघोषित नेते समजू लागले.

त्यांचे सुरुवातीचे युद्ध हे ब्रिटीश नियंत्रित व्यवस्थेत स्वतःचे स्थान भक्कम करणे ह्यासाठी होते. सरकारने लवकरच त्यांना जनतेचे प्रतिनिधी म्हणून स्विकारले. त्यांनी स्वतःचे असे एक मंडळ बनविले. ज्यामधून सरकारने विविध कार्यालयीन व बिगर कार्यालयीन कामासाठी, कर्मचा-यांच्या नेमणूका करण्यास सुरुवात केली.

इ.स.१८४० पर्यंत, मुंबई शहराने, पाश्चात्य शिक्षित अशा नव्या तरुण वर्गाचा उदय होताना पाहीला जो एल्फिन्स्टन कॉलेजची निर्मिती होती. ह्या सगळ्या तरुण मंडळीची एकच ओळख व एकच उद्देश होता. त्यांचे वेगवेगळ्या गोष्टींवर प्रभुत्व होते. ज्याद्वारे ते एकाच दृष्टीकोनातून एक सामाजिक उद्देश प्राप्त करु शकत होते. तसेच इ.स.१८५० पासून त्यांनी शेठजी वर्गाबरोबर हात मिळवणी करुन त्यांच्या समाजात सुधारणा आणण्याचे प्रयत्न करु लागले. त्यांचे राजकीय क्षेत्रातील सुधारणांसंबंधी सहकार्य फार मोलाचे होते. बौद्धिकदृष्ट्या अत्यंत कुशाग्र समजल्या जाणाऱ्या आणि राजकीय क्षेत्रात सक्रीय असलेल्या या नव्या तरुण वर्गाने, सामाजिक बदलाऱ्याठी शेठजी लोकांबरोबर काम करावयास सुरुवात केली.

इ.स.१८५० पासून धार्मिक उत्साह, वांशिक भेदभाव व पिळवणूक आर्थिक व राजकीय अस्वस्थता संपूर्ण भारतात पसरत चालली होती. मुंबई व्यतिरिक्त कलकत्ता व मद्रास येथे शिक्षणाचा प्रसार सातत्याने होत होता आणि थोड्या प्रमाणात का होईना परंतु सामाजिक परिवर्तनाने आता वेग पकडला होता. तसेच देशाची एकात्मता वाढीस लागली होती. अशा या परिस्थितीत ईस्ट इंडीया कंपनी चार्टर ॲक्टच्या नूतनीकरणाने देशामध्ये विविध राजकीय सुधारणांचा वेग वाढला होता. इ.स.१८५१ मध्ये कलकत्ता येथे ब्रिटीश इंडीया असोसिएशनची आधीच स्थापना झाली होती. पुण्यात जानेवारी इ.स.१८५२ मध्ये डेक्कन सभेची स्थापना झाली. परंतु मुंबईचे नेते त्यांच्याच कामामध्ये व्यस्त होते. त्यामुळे काही ठराविक लोकांच्या खांद्यावर ही जबाबदारी पडली की मुंबईचे स्वतःचे हक्क शाबूत ठेवायला, मुंबईलाही स्वतःची अशी स्वतंत्र संस्था गरजेची आहे. नौरोजी फर्टूनजी, नारायण दिनानाथजी, डॉ. भाऊ दाजी लाड

आणि दादाभाई नौरोजी हे त्यापैकी सगळ्यात बौद्धिक पातळीवर कार्यरत असलेल्यापैकी आहेत. परंतु एक गोष्ट स्पष्ट होती ती म्हणजे शेठलोकांच्या आर्थिक मदतीशिवाय काहीही शक्य नव्हते. शेवटी त्यांनी काही शेठजी लोकांचे मन वळविण्यात यश मिळविले. त्यापैकी एक हो ते खरशेतजी नसरवानजी आणि दुसरे होते जगन्नाथ शंकरशेठ. अशाप्रकारे २६ ऑगस्ट १८५२ रोजी बॉम्बे असोसिएशनची स्थापना झाली. तिचे बहुतेक सदस्य हे मुंबईचे नामवंत व्यापारी व उद्योगपती होते. जगन्नाथ शंकरशेठ तिचे अध्यक्ष बनले. भाऊ दाजी आणि विनायकराव जगन्नाथजी हे असोसिएशनचे सचिव बनले.

स्थापना झाल्यानंतर लगेचच असोसिएशनच्या नेत्यांनी जनतेच्या मागण्या व गरजांसंबंधी माहीती गोळा करुन ब्रिटीश सरकारास सुपूर्द केल्या. त्यांनी त्या सर्व कारवाया पडद्यामागे राहून केल्या व शेठजी लोकांना प्रकाशझोतात ठेवले. असोसिएशनने एक याचिका तयार केली. भाऊ दाजजींनी तिचे संकलन व संपादन केले जे ब्रिटीश संसदेत मांडण्यात येणार होते. इतर गोष्टींपैकी, त्यामध्ये ईस्ट इंडीया कंपनीच्या न्यायिक राजकारभारासंबंधी अनेक तक्रारी होत्या ज्यात ईस्ट इंडीया कंपनीचे भारतीय राज्यकर्ते व पोलिस दल यांच्याही अरेरावी कारवायांसंबंधी उल्लेख होता. त्यात देशी भाषेतून शिक्षण व भारतीय संस्कृतीचा विकास हे ही मुद्दे होते.

याचिकेतील पहिला आराखडा काही शेठ लोकांकडून संमत झाला नाही, ज्यांना ब्रिटीशांच्या आणि ब्रिटीश व्यापा-यांच्या खपामर्जीची भिती वाटली. याचिकेचा दुसरा सुधारित मसुदाही त्यांना विशेष आवडला नाही. म्हणून भाऊ दाजींनी असोसिएशनचे सचिव पदाचा राजीनामा दिला. याचा परिणाम म्हणून असोसिएशनमध्ये बुद्धीवादी आणि भांडवलदार अशी दुही पडली. इ.स.१८५६ मध्ये असोसिएशनमध्ये जास्ती करुन धनाढ्य असणाऱ्यांनाच प्राधान्य होते. ज्यांना सरकारच्या धनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन करणे, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जे विभाग आहेत, त्यांच्या कार्यक्षमतेविषयी जागृत राहणे यात ज्यांना रस होता अशाच व्यक्ती असोसिएशनमध्ये होत्या.

थोडक्यात म्हणजे असोशिएशनचा एकूण पवित्रा सरकार समर्थकच होता. त्यांच्या अनेक लोकांनी तर ब्रिटीश सरकारला खंडणी दिली होती जेणेकरुन ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली भारतीयांच्या स्वातंत्र्याचे व विकासाचे काही हक्क उपभोगता येतील. त्यामुळे ब्रिटीशांच्या विरोधात असोशिएशन काही कार्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. क्रिप्तीन डॉबीनने म्हटल्याप्रमाणे, "अत्यंत सौम्य, मवाळ सल्ला, सरकारला जनतेच्या भावना लक्षात घेऊन देण्यात येई आणि सरकारचा मुद्दा आणि विचित्र नियमांचे त्यांना समजतील असे अर्थ लावून जनतेला सांगण्यात येई. त्यांचा हेतू हा ब्रिटीश संरंजामशाहीला सहाय्य करणे व त्यातून स्वहीत साधणे हा होता. तसेच सरकारला माहीती पुरवून राजकारभार सुव्यवस्थित करण्यास हातभार लावणे त्यापैकी एका आघाडीच्या शेठने असे उघडपणे जाहीर केले की भारतीयांना यापेक्षा अधिक सवलतींची व आश्रयांची गरज नाही. जितकी सवलत आता मिळते तितकी पुरेशी आहे." असोसिएशनच्या शेठलोकांचा काहीच पाठींबा मिळत नसल्याचे लक्षात येऊनही, न डगमगता, भाऊ दाजी आणि नौरोजी फरखुनजीने असोसिएशनचे सेक्रेटरी या नात्याने त्यांचे भारताच्या राजकीय गरजांविषयीचे विचार अत्यंत स्वच्छपणे चुका न करता त्यांना शक्य होईल तितके मांडायचे ठरविले आणि म्हणूनच त्यांची संसदेला निवेदन पाठविले. त्यामधील मुद्दे थोड्याफार फरकाने कलकत्ता व मद्रास असोसिएशनच्या तत्त्वांवर आधारित होते. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे असे.

अ) भारतीय द्विदल पद्धती व सरकारची अत्यंत टोकाची केंद्रीकरणाची भूमिका यामुळे भारतीयांना अतिशय त्रास होत आहे.

ब) राज्यकारभार अतिशय खर्चिक आहे. संसदेच्या सल्लागार मंडळाच्या व्यक्ती ह्या प्रामुख्याने वशिल्यावर निवडून दिल्या जातात गुणांनुसार नाही. सदर प्रतिनिधींना कोणत्याही ठराविक जबाबदाऱ्या नाहीत कारण बहुतेक वेळा गव्हर्नरच सर्व बाबतीत निर्णय घेतो.

क) निवेदनात संसदेला नमूद केले होते की, सरकारच्या कारभाराच्या बाबतीत अतिशय गुप्तता बाळगण्यात येते जी सरकारी अधिकाऱ्यांना अत्यंत जाचक आहे. तसेच सध्याची सरकारची कारभारपद्धती ही वंशवादास खतपाणी घालणारी आणि सर्वसामान्यांना नुकसानकारक आहे. तसेच सामाजिक हिताने प्रेरीत झालेल्या काही संस्थांनी किंवा

व्यक्तींनी केलेल्या जनहितयाचिका धुडकावून दिल्या जातात. म्हणून असोसिएशनच्या निवेदनामध्ये इंडीयन सिव्हील सर्विसमध्ये सुधारणांची आवश्यकता आहे असे सूचित केले. इंडीयन सिव्हील सर्विसेसमध्ये ईस्ट इंडीया कंपनीच्या न्यायालयांची कायदेपद्धती, तसेच कार्यकारी सरकारमध्ये अनुभवी, प्रशिक्षित व्यक्ती जी इंग्लंडच्या कार्यालयामधून तयार झाली असेल, अशी व्यक्ती, जी लोकांचे प्रश्न समजावून घेऊ शकेल, लोकांपर्यंत ज्ञान पोहचवू शकेल, जिचे विविध बाबतीत सखोल, सर्वव्यापी विचार असतील, अशा व्यक्तींची गरज आहे. याउलट सद्यः यंत्रणा अशा व्यक्तीकडून चालविली जाते ज्यांचे बालपण इंग्लंडच्या, अप्रशिक्षित व्यवस्थेत जाते आणि अशा इंग्लंडच्या सद्‌गृहस्थऱ्यांना न स्वतःच्या लायकीबद्दल जाणीव असते, न ती सुधारावी याविषयी चिंता.

निविदनामध्ये, इतर गोष्टींबरोबरच शिक्षण पद्धती सुधारावी शिक्षणासाठी अनेक सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशा मागण्या होत्या. त्यांनी सामाजिक कामाची गती वाढविण्याविषयी विनंती केली जेणेकरुन उत्पादन वाढेल. तसेच त्यांनी, भारतीय संघटनांची मागणी केली जी भारताविषयी संसदीय सल्ले घेऊ शकेल. तथापि, हे अत्यंत महत्त्वाचे आहे की असोशिएशनच्या नेत्यांना ब्रिटीश सरकारवर मुख्यत्वे संसदेवर अतिशय विश्वास होता. तसेच दादाभाई नौरोजी आणि नौरोजी फरदूनजींना ब्रिटीश सरकारला मुक्त विचारांचे आणि ज्ञान प्रसारक असे सरकार म्हणण्यात काही वाटले नाही. दादाभाई नौरोजींना असे वाटे की ब्रिटीश सरकारने भारतास अनेक फायदे करुन दिले आहेत त्यामुळे हे सरकार कायम टिकून राहो.

असोसिएशनने बुद्धीवाद्यांचा कोणताही मुद्दा उचलून धरला नाही आणि भाऊ दार्जीच्या राजीनाम्या नंतर तर असोसिएशन फक्त शेठजी लोकांचीच मालकी सत्ता झाली. तसेच शेठजींना सरकारच्या विरुद्ध किंवा त्यांच्या कार्याविषयी काहीही वक्तव्य करावयाचे नसल्याने, असोसिएशनच्या अभा कमी प्रमाणात व्हायला लागल्या. म्हणूनच, इ.स.१८६१ मध्ये नौरोजी फरवूनर्जीनी अत्यंत रोषाने असोसिएशनचा राजीनामा दिला. त्यामुळे असोसिएशन राजकीयदृष्ट्या पूर्णपणे अकार्यक्षम बनली. इ.स.१८६५ मध्ये, मुंबई शेअर बाजार कोसळल्यावर शहरातल्या सर्व राजकीय घडामोडी बंद पडल्या.

इ.स.१८६७ मध्ये बॉम्बे असोसिएशनचे पुनर्जीवन झाले जेव्हा नौरोजी फडूनजी तिचे सचिव बनले. प्रामुख्याने ८७ सदस्य हे शेठजीवर्गातील होते. पुनर्जीवन झालेल्या असोसिएशनने सार्वजनिक सभांद्वारे त्यांचे कार्य सुरु केले. इ.स.१८६८ मध्ये त्यांची पहीली सार्वजनिक सभा झाली. बॉम्बे असोशिएशनने सिव्हील सर्विस परीक्षा इंग्लंड व भारतात एकाच वेळेस व्हावी अशी मागणी केली आणि अशा परीक्षांमध्ये, सहभागी होण्यासाठी भारतीयांच्या बयात वाढ करावी अशीही मागणी केली.

इ.स.१८६९ मध्ये डॉ. आर. जी. भंडारकर, एम.जी. रानडे आणि इतर नामवंत लोकांनी असोसिएशनमध्ये प्रवेश केला. इ.स.१८५७ च्या महान लढानंतर भारताची आर्थिक स्थिती अतिशय डबघाईस आली होती. तिच्यावर पुनर्विचार करणे, अत्यंत गरजेचे होते. इ.स.१८७० च्या उत्पन्न कर कायद्याच्या विरोधात बुद्धिवादी आणि शेठजी एकाच मंचावर आले. सभेस दोन हजाराच्या वर शेठजी, शेअर बाजारातील दलाल, तसेच असोशिएशनचे सदस्य हजर होते. ह्या सभेच्या दरम्यान, नामवंत उद्योगपती सर जमशेदजी जीजीभॉय आणि जगन्नाथ शंकरशेठ यांनी सरकारला सल्ला दिला की यापुढे जनतेशी संबंधित कोणताही कायदा उदा. उत्पन्न कर कायदा किंवा तत्सम, पास करण्यापूर्वी, जनतेशी सल्लामसलत करणे गरजेचे आहे. एन. व्ही. दाभोळकरांनी, सरकारच्या वाढत्या लष्करी खर्चाविषयी जाहीर निर्भत्सना केली. दाभोळकरांनी पुढे जाऊन भारतातील इंग्लिश संस्थांच्या बुद्धी विषयीही प्रश्न उभा केला आणि असे स्पष्टपणाने म्हटले की सध्याची संसदीय प्रतिनिधिक पद्धती हे निव्वळ थोतांड आहे, मृगजळ आहे.

तथापि शेठजीवर्ग व बुद्धीवादी अधिक काळापर्यंत एकत्र काम करु शकले नाहीत. ऑक्टोबर इ.स.१८७२ च्या असोसिएशनच्या मिटींगमध्ये त्यांचे दोन भाग पडले. शेठजी लोकांनी नौरोजी फर्दूनजीला असोसिएशनचा सचीव म्हणून दूर करण्याचा प्रयत्न केला. पण ते अयशस्वी ठरले. म्हणून दाभोळकर, शंकरशेठ, जीजीभॉय आणि आर.एन. खोत यांनी असोसिएशनचा राजीनामा दिला आणि ही पोकळी कायमस्वरुपी झाली जेव्हा असोसिएशनने, ब्रिटीश इंडीया

असोसिएशन ऑफ कलकत्ता स्थापन केले. भारतीय अर्थसंकल्पाच्या निवेदनावर आणि अन्य एका निवेदनावर जी व्हाईसरॉयला पाठवायची होती जी भारतीय सनदी सेवांशी निगडीत होती, ह्या बाबतीत असोसिएशन सहाय्य केले.
त्या दरम्यानच्या काळात असोसिएशनने त्यांचे सक्रीय कार्यकर्ते गमावण्यास सुरुवात केली होती. इ.स.१८७४ मध्ये भाऊ दाजी लाड वारले. दादाभाई नौरोजींनी आपले बस्तान लंडनला हलविले. रानडेंनी पुण्यास स्थलांतर केले. भांडारकर आणि आत्माराम पांडुरंग यांनी त्यांचे लक्ष प्रार्थना समाजावर केंद्रीत केले. त्यांच्या आघाडीच्या सदस्यांपैकी फक्त फरदुनजी आणि व्ही.एन. मंडलिक राहीले. इ.स.१८७६ मध्ये फरदूनजीने बॉम्बे असोशिएशनचे पुनर्जीवन करण्याचा प्रयत्न केला आणि वादग्रस्त महानगरपालिका उपविधींनी सामाजिक बंड किंवा तत्सम प्रतिकारास मान्यता मिळाली. परंतु इ.स.१८७८ नंतर असोसिएशन पुन्हा एकदा अकार्यक्षम झाली, निष्प्रभ ठरली आणि इ.स.१८७९ मध्ये तिचे कार्य पूर्णपणे ठप्प पडले.

जरी बॉम्बे असोसिएशनने काही प्रमाणात उल्लेखनीय कामगिरी केली असली तरी तिच्याद्वारे काही महत्त्वाच्या व्यक्ती प्रकाशझोतात आल्या ज्यांनी केवळ मुंबई पुरतीच नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर महत्त्वाची कामगिरी केली. आर.सी. मुझुमदार लिहीतात. "... बॉम्बे असोसिएशनने मुंबईच्या राजकीय विचारवंतांपैकी अत्यंत आघाडीच्या नेत्यांचे प्रतिनिधित्व केले."

**पुना सार्वजनिक सभा (इ.स.१८७०) व तिचे कार्य**

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आधीच अभ्यासल्याप्रमाणे महाराष्ट्रास देशाच्या सामाजिक व राजकीय जीवनात सहजपणे प्रवेश अपेक्षित होता. बंगालबरोबरच भारतीय समाजाच्या आधुनिक परिवर्तनासाठी अनेक यशस्वी चळवळी, मोहीमा राबविल्या गेल्या. त्यांचे आघाडीचे महान नेते होते न्यायमूर्ती रानडे, दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, गो. कृ. गोखले आणि बाळ गंगाधर टिळक. वैचारिक बौद्धिकदृष्ट्या आघाडीवर असलेल्या शहरात पुणे हे महाराष्ट्राचे मुख्य ठाणे होते. या नेत्यांच्या स्वतःच्या स्वतंत्र संस्था होत्या. पहिली संस्था होती डेक्कन असोसिएशन जिची स्थापना झाली जानेवारी इ.स.१८५२ मध्ये. परंतु ती जास्त काळ टिकू शकली नाही. नंतरची महत्त्वाची संस्था होती सार्वजनिक सभा. ती १८६७ मध्ये अस्तित्वात आली आणि रानडेंच्या महत्त्वाकांक्षी आश्रयाखाली, मार्गदर्शनाखाली वाढली. तिचे सेक्रेटरी होते. जी. व्ही. जोशी आणि नामवंत राजकीय नेते गोपाळ कृष्ण गोखले. सभेने सुरुवातीपासूनच चळवळीचे धोरण अंगिकारले. पुण्याच्या ओल्या दुष्काळात आणि दख्खनच्या दरोडेखोरी (इ.स.१८७५) दरम्यान, सभेने अत्यंत मोलाची कामगिरी पार पाडली.

सभेचा मुख्य उद्देश दख्खनच्या जनतेच्या गरजा व इच्छा व्यक्त करणे हा होता. त्यासाठी प्रसिद्ध निवडणूक पद्धती किंवा व्यवस्थेद्वारे नियुक्त होणे हाही होता. सभेच्या सदस्यांनी मुंबई प्रांतात मराठी बांधवांना व्यापक प्रतिनिधित्व मिळावे म्हणून विशेष प्रयत्न केले. सभेने मराठी जनतेचे, जी स्वतःची मते मोकळेपणाने मांडू शकत नाही अशा समाजाचे प्रतिनिधित्व केले. तसेच अधिकाऱ्यांसमोर, जनतेच्या हिताचे मुद्दे मांडू लागले मुख्यत्वे करुन, सुशिक्षित वर्गाच्या मागण्या आणि समाजाच्या काय गरजा आहेत व काय परिस्थिती आहे, याचेही विवरण करण्यात येऊ लागले.

पुना सार्वजनिक सभेचे सदस्य होते सरदार, जहांगिरदार, इनामदार, सावकार आणि समाजातील सुशिक्षित उच्चभ्रू, सभेने लवकरच राष्ट्रीय व राजकीय पातळीवर सक्षम व सक्रीय होण्यास सुरुवात केली. सरकारला उमरणपत्रिका आणि निवेदने पाठविण्याच्या व्यतिरिक्त त्यांनी राजकीय पातळीवर अभिनव प्रयोगांस सुरुवात केली. त्यापैकी एक म्हणजे स्वदेशी चळवळ ज्याद्वारे देशी उद्योगांना पुनर्जीवन मिळेल, चालना मिळेल. दख्खनमध्ये शाखांचे जाळे विणण्यात आले आणि संपूर्ण महाराष्ट्रात मोहीम उघडली ज्याद्वारे गरीब शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांच्या जमिनीविषयक काय काय जाचक नियम आहेत, यावर संशोधन करण्यात येईल. जी.व्ही. जोशींच्या (ते सार्वजनिक काका म्हणून जास्त प्रसिद्ध होते) अथक आणि समर्थ सचिवपदाखाली सभा ही एक समर्थ माध्यम झाली ज्याद्वारे, सरंजामशाहीखाली सामान्य जनता कशी भरडली जातेय याचा प्रत्यय जनतेला आला.

सभेने इ.स.१८७० च्या जमिन महसूल कराच्या विरोधात लढा पुकारला. त्यांनी कमी करासाठी चळवळ सुरु केली. जेव्हा इ.स.१८७३ मध्ये गरीब शेतकऱ्यांनी कर भरण्यास नकार दिला. तेव्हा सरकारला त्यामागे सभेचा हात

असल्याचा संशय आला. सार्वजनिक सभेने इ.स.१८७५-१८७७ च्या ओल्या दुष्काळा दरम्यान जनतेला मदत केली. त्यांनी मोठ्या प्रमाणावर स्वयंसेवकांना पाठविले, तसेच झालेल्या आर्थिक नुकसानीचा व जीवितहानीचा अंदाज घेतला. त्यांच्या अहवालानुसार, मुंबई सरकारने जनतेला ह्या भीषण प्रसंगातून बाहेर काढण्यासाठी अत्यंत दुर्दैवी प्रयत्न केले आहेत. त्यासंबंधी सभेने सरकारची खरडपट्टी काढली. सभा स्थानिक वृत्तपत्रांच्या आधारे सरकारचे नाकर्तेपणाचे धोरण, जनतेच्या त्रासासंबंधी कानाडोळा करण्याची वृत्ती यासंबंधी आवाज उठवित असे.

दख्खनचे दरोडे वासुदेव बळवंत फडकेंनी इ.स.१८७९ मध्ये आखले होते. तसेच इतर काही घटनांचा दाखला देऊन सर रिचर्ड टेंपलने ह्या दरोड्याचे वर्णन 'ब्रिटीशविरोधी गुप्त कारस्थान' असे हास्यास्पदरित्या केले आहे. रिचर्ड टेंपल हा तेव्हाचा गव्हर्नर जनरल होता. त्यांनी सुशिक्षित चित्पावन ब्राह्मण हे ब्रिटीश सरकारशी एकनिष्ठ नाहीत असे नमूद केले तसेच फडकेंचे बंड आणि सभेचा निकटचा संबंध असावा असेही भाकीत केले. टेंपलचे प्रत्युतर हे ब्रिटीश सरकारमधील उच्च पदस्थ अधिकारी सभेची कशी कुचेष्ठा करु इच्छित होते ते दाखवून दिले. परंतु त्यांच्या प्रतिक्रिया त्यांच्या मर्यादीत ज्ञानाप्रमाणेच फसव्या ठरल्या हे रानडेंनी लवकरच सिद्ध केले. रानडेंनी जरी मानवी हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या योजनांवर उदा. जमिन महसूल आणि ओल्या दुष्काळाशी संबंधित योजना यांच्यावर टीका केली असली तरी रानडे हे मवाळमतवादी होते आणि सरकारच्या चांगल्या धोरणांचे त्यांनी सदैव स्वागतच केले होते ही बाब ब्रिटीश स्वकार करावयास विसरले.

सभेची एक महत्त्वाची बाब अशी की, सभेने सदैव मुक्त पुरोगामी आणि लोकशाही विचारांचे समर्थन केले. तिच्या सुरुवातीपासूनच सभेने घटनेमध्ये निवडणूक पद्धती नमूद केली होती. सुरुवातीलाच खूप काळजी घेऊन ती एक निवडून आलेल्या व्यक्तींची सभा म्हणून स्थापना केली होती. म्हणून असे म्हणावे लागते की, निवडणूकांची तत्त्वप्रणाली ही भारतीयांच्या मनात आधीपासून रुजली होती. ती परकीयांची भेट आहे किंवा परकीयांची देन आहे असे मुळीच नव्हते. रानडे आणि जोशींच्या अथक प्रयत्नांमुळे पुना सार्वजनिक सभा, भारतातील अग्रगण्य सभा बनली. खरेतर सभेने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सुरुवातीच्या सभा आयोजित केल्या. त्यानंतर तिला वर्गणीसुद्धा मिळवून दिली. गोखलेंचा वाढता दबदबा यामुळेही संस्थेस भारतातील इतर संस्थांच्या बरोबरीचे स्थान मिळाले. त्यांचे त्रैमासिक वृत्तपत्र, सदस्यांच्या अनेक मतांसंबधी, महत्त्वाच्या विषयांविषयी, सामाजिक हिताच्या बाबींविषयी, व्यवस्थित व योग्यरितीने माहिती प्रसिद्ध करीत. शेती आणि अर्थ विषयक प्रश्नांविषयी, अभ्यासात्मक विचार वृत्तपत्रांमध्ये सदैव येतात. जरी मुंबई सरकारने सभेचे मान्यतापत्र रद्द केले तरी सभेच्या वृत्तपत्रातून छापून आलेल्या लेखांचा विचार केला जायचा. हळूहळू सभेच्या कारवायांकडे दुर्लक्ष करणे सरकारला कठीण जाऊ लागले.

इ.स.१८९५ मध्ये सार्वजनिक सभेतील राजकीय वादंग टोकाला पोहचल्यामुळे सभेमध्ये दोन गट पडले. मवाळ विचारांचे नेते जसे न्यायमूर्ती रानडे, जी. के. गोखले आणि त्यांचे अनुयायी यांनी सभेचा त्याग केला आणि सभेचे नेतृत्त्व बाळ गंगाधर टिळकांकडे आले. इ.स.१८९७ मध्ये सरकारने एक आज्ञापत्र काढले. त्यानुसार पुना सार्वजनिक सभेला, सद्यः परिस्थितीत ज्या पद्धतीने तिचा कारभार चालतो त्याचा विचार करता जनतेच्या प्रश्नांवर सरकारला सुनावण्याचा कोणताही अधिकार, एक स्वंतत्र संस्था म्हणून राहत नाही असे जाहिर केले. ही सरकारची एक चाल होती. त्यानुसार त्यांच्या कर्मठ टीकाकारांना थोडा आळा बसेल अशी त्यांना अपेक्षा होती. परंतु, सभेचे उच्चाटन झाले तरी त्यांच्या कारवाया व चळवळी बिनबोभाट चालूच राहील्या.

न्यायमूर्ती रानडे यांचे शिष्य गोखले, जी. व्ही. जोशी आणि लोकमान्य टिळक, यासारख्या अद्वितीय पुढाऱ्यांमुळे सार्वजनिक सभा भारतातील एक महत्त्वाची प्रभावी अशी संघटना बनली. त्यांची मते आणि विचारांचे जनतेकडून कायम स्वागतच झाले. त्या कारणाने सभेविषयी ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या मनात भीती निर्माण झाली. सभेने अनेक राजकारण्यांना, गोखले व टिळकांना धरुन राजकारणाचे बाळकडू पाजण्यापासून घडविण्यापर्यंत सर्व प्रयत्न केले. ज्यांनी पुढे जाऊन भारताच्या स्वातंत्र्यासाठी विशेष योगदान दिले.

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि महाराष्ट्रातील कार्य**

राजकीय जागृती आणि संघटनांची परिणती अखेरीस इंडीयन नॅशनल काँग्रेसच्या स्थापनेत झाली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना २८ डिसेंबर १८८५ मध्ये झाली. त्यांच्या अधिकृत स्थापनेनंतर तात्पुरत्या स्वरुपाचे गट पाडण्यात आले. ज्याद्वारे देशातील विविध भागातून भारतीयांना एकत्र आणता येईल व सामायिक उद्देशासाठी लढा देता येईल. संघटनात्मक प्रगती एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून मुंबई, पुणे, कलकत्ता व मद्रास ह्या भागात होऊ लागली. ज्याचा उपयोग, विविध कल्पना, सूचना यांचे संकलन करुन उत्साही कार्यकर्त्यांना देण्यात येई. इ.स.१८७५ मध्ये संपूर्ण भारतभर चळवळ सुरु झाली. मुंबई, पुणे आणि बंगालच्या नेत्यांच्या कारवायामुळे देशातील चळवळींना प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे संपूर्ण भारत अभियानास ह्या सर्व राजकीयदृष्ट्या कार्यरत असणाऱ्या ठिकाणांपासून प्रोत्साहन व पाठींबा मिळत होता. आधी पुण्यास प्राधान्य देण्यात आले. परंतु त्यानंतर, इंडीअन नॅशनल काँग्रेसचा जन्म मुंबई शहरात होण्याचे नक्की झाले. ॲलन ऑक्टेव्हियन ह्युम जो डिसेंबर १८८४ मध्ये मुंबईला आला होता, त्यांने मुंबई व पुण्याच्या नेत्यांबरोबर, राजकीय चर्चासत्राची मालिकाच सुरू केली. त्यांत सुशिक्षित भारतीयांचे राजकीय योगदान काय असावे, यावर चर्चा रंगली. आधी लॉर्ड रिपनने व्यक्त केल्याप्रमाणे, मुंबईप्रांतील हुशार लोक हे भारतातील उत्कृष्ठ लोक आहेत असे म्हटले होते. त्याने मुक्त कंठाने मुंबईचे नेते व्ही. एन. मंडलिक, फिरोजशहा मेहता, बद्रदिन तैयबजी, के.टी.तेलंग, जे.मु. याज्ञिक यांची स्तुती केली. रिपनने हे ही मान्य केले की पुना सार्वजनिक सभा ही एक अतिश समर्थ अशी हुशार माणसांनी चालवलेली संस्था आहे.

ह्या विचारांचा ह्युमवर परिणाम झाला आणि म्हणून मुंबई प्रांतातील सदस्यांवर त्याचा कलकत्याच्या लोकांपेक्षा, जास्त भर होता. त्याला त्याची 'अखिल भारतीय संघटना' (All India Association of India) ही संकल्पना अंमलात आणावयाची होती. तसेच, मुंबईचे सामाजिक जीवन हे कलकत्त्यापेक्षा जास्त मुक्त, वर्गहीन व व्यापक होते. मुंबईच्या नेत्यांचे विचार, देशासंबंधीचे विचार हे अधिक मुक्त, मवाळ व व्यापक होते. मुंबईत अँग्लो इंडीयन्सना कलकत्त्यापेक्षा जास्त चांगली वागणूक मिळे. तसेच मुंबईने संपूर्ण देशाला आवाहान केले की लॉर्ड रिपनला इल्बर्ट बिल तडजोडीवरुन आता अधिक खजिल करु नये व त्यांच्या सन्मानार्थ एक मोठा निरोप समारंभाचा कार्यक्रम त्याने आखला.

अशा कारवायांमुळे मुंबईच्या नेत्यांचा वरचष्मा कायम राहीला. त्यामुळे मुंबई व पुणे ही दोन ठिकाणे भारताच्या विविध भागाच्या प्रतिनिधींच्या संमेलनासाठी नक्की करण्यात आली. त्यामागचा उद्देश होता. अ) देशातील राजकीय घडामोंडीवर नियंत्रण ठेवणारी राष्ट्रीय संस्था उभारणे, ब) संसदेला सादर करण्यात येणाऱ्या मागण्यांचा मसुदा आराखडा तयार करणे या निमित्ताने ही अत्यंत महत्त्वाची अशी सभा होती. या सभेला ह्यूम, विल्यम वेडरबर्न, दादाभाई नौरोजी, एम.जी. रानडे, नौरोजी फरदूनजी, फिरोजशहा मेहता, के.टी. तेलंग आणि मुबंईचे इतर नामवंत नेते (जानेवारी इ.स.१८८४) हजर होते. एक केंद्रीय समिती स्थापण्यात आली जी लंडनच्या एखाद्या दैनिकाला भारतातील माहीती गोळा करुन टेलिग्राफद्वारे माहीती पाठवू शकेल. त्या समितीमध्ये मेहता, दादाभाई नौरोजी, तेलंग आणि बदुद्दिन तैयबजी होते. तसेच सभेमध्ये अजून एका नॅशनल इंडीयन असोसिएशनची मागणी पास झाली. ज्यात जनतेच्या दुःखाविषयी व त्यावरील उपायांविषयी पद्धतशीररित्या कार्यवाही करता येईल. मेहता, तेलंग आणि तैयबजी यांना नामवंत मंडळीकडून संस्थेसाठी आर्थिक व सामाजिक हातभार लावण्याचे वचन मिळाले. पुणे सुद्धा राजकीय दृष्ट्या आघाडीवर होते ज्यांचे संपूर्ण श्रेय एम. जी रानडे, जी.वी. जोशी, चिपळूणकर आणि जी. के. गोखले यांना जाते. पुणे सार्वजनिक सभा अतिशय प्रभावी व समर्थ अशी संघटना बनली. तसेच इ.स.१८८० च्या सुमारास मुंबईच्या नेत्यांमध्ये आणि असोसिएशनच्या कार्यकर्त्यांमध्ये अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते आणि म्हणूनच सभेचे नेते ह्यूमच्या ऑल इंडिया असोसिएशनशी अतिशय जवळून संबंधित होते.

डिसेंबर, १८८४ च्या आधी रघुनाथ रावांच्या घरी एक सभा घेण्यात आली, जे मद्रासचे फार मोठे धर्म विद्वान होते. त्या सभेत असे ठरले की, देशातील विविध संघटनांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने पुण्यात एक संमेलन भरविण्यात येईल. संमेलनाला नाव दिले जाईल 'कॉन्फरन्स ऑफ इंडीयन नॅशनल युनियन' त्यानंतर असे ठरविण्यात आले की सार्वजनिक सभेच्या नियंत्रणाखाली २८,२९ व ३० डिसेंबरला १८८५ मध्ये कॉन्फरन्स भरविण्यात येईल. दुर्दैवाने, पुण्यामध्ये पटकीची साथ पसरल्याने सभेला कॉन्फरन्ससाठी आवश्यक तयारी करताच आली नाही आणि पर्यायाने

कॉन्फरन्स मुंबईला हलविण्याचे ठरविले. एस. आर. मेहरोत्रा म्हणतात, "नियतीने पुण्याला इंडीयन नॅशनल काँग्रेसच्या पहील्या समेलनाचे मानकरी होण्यापासून परावृत्त केले." मेहता, तेलंग व तैयबजी या त्रिकुटाच्या सर्व साधनयुक्ततेमुळे तसेच गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजचे आणि बोर्डीग ट्रस्टचे मॅनेजर ज्यांनी गवालिया टँकच्या वरील इमारती असोसिएशनला वापरायला दिल्या आणि तेथील दिवाबत्ती, खुर्ची इत्यादींची सर्व आवश्यक तयारीची जबाबदारी उचलली. त्यामुळे काँग्रेसला नियोजित वेळेनुसार संमेलनाची कार्यवाही सुरु करता आली. मुंबईच्या विद्वानांनी ह्या कार्यक्रमासाठी अत्यंत महत्त्वाची कामगिरी पार पाडली.

इ.स.१८८५ ते १९१५ च्या दरम्यान आणि त्यानंतर महाराष्ट्रातील नेत्यांनी काँग्रेसच्या प्रगतीसाठी आणि त्यास आकार देण्याच्या दृष्टीने महत्त्वाची कामगिरी केली. काँग्रेसच्या पहिल्या ४० वर्षात अनेक कार्यकर्ते व पाठींबा देणारे हे प्रामुख्याने मुंबई पुण्याचे असत. काँग्रेसचा मुंबई प्रांताशी जवळचा संबंध असल्याने अनेक फायदे झाले. गॉडर्न जॉन्सन म्हणतात, "अखिल भारतीय चळवळ, भारताच्या अन्य कोणत्याही भागात अशा प्रकारे विकसित झाली नसेल." अशा संबंधामुळे, महाराष्ट्रातील नेत्यांना राष्ट्रीय पातळीवरुन, घडामोडींमध्ये लक्ष घालता आले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची अनेक अधिवेशने मुंबई व पुण्यात झाली उदा. इ.स.१८८९, इ.स.१८९५, इ.स.१९०४, इ.स.१९१५ आणि विशेष अधिवेशन इ.स.१९१८. दादाभाई नौरोजी, बदुद्दीन तैयबजी, फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक यांनी काँग्रेसच्या कार्यात अत्यंत महत्त्वाचे योगदान दिले आणि अनेक योजना पार पाडावयास मदत केली.

इ.स.१९०५ पर्यंत, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही फक्त धनाढ्य व्यक्तींची निवेदने किंवा मागण्या करणारी संस्था होती. त्यांचे आधारस्तंभ नौरोजी, मेहता, गोखले आणि इतर हे राजकीय बाबतीत मवाळ परंतु मुक्त विचारांचे होते. इ.स.१९०० पर्यंत त्यांच्या कारवाया ह्या अत्यंत नम्र विनंत्या, निविदा, सन्माननीय प्रतिनिधित्व या स्वरुपाच्या होत्या. थोडक्यात म्हणजे, अतिशय नम्रपणा हाच मूळच्या मावाळ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा काम करण्याचा पवित्र होता.

इ.स.१८९० नंतर मात्र महाराष्ट्रमध्ये काँग्रेसच्या अंतर्गत गंभीर आर्थिक संकट ओढले. स्थानिक राजकीय वाद टोकाला पोहचले. गोखले, मेहता, नौरोजी हे मवाळ मतवादी एका बाजूला व टिळक व इतर जहाल मतवादी दुसऱ्या बाजूला. अशा वादांमुळे राष्ट्रीय पातळीवर राजकारणावर परिणाम झाला. पर्यायाने एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात व इ.स.१९०८ च्या सुमारास राष्ट्रीय चळवळीमध्ये असंतोषाचेच वातावरण होते. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये विभाग पडल्याने, राष्ट्रीय पातळीवर त्याचा परिणाम झाला कारण महाराष्ट्रातील काँग्रेसच देशाचे राजकारण चालवित होती. त्यामुळे जहाल व मवाळ हा संघर्ष तीव्र झाला. केवळ फिरोजशहा मेहता व गोपाळ कृष्ण गोखलेंच्या मृत्यूनंतर व पहिल्या महायुद्धास सुरूवात झाल्यामुळे, काँग्रेसमधील वादळ शांत झाले.

इ.स.१८९० पर्यंत मवाळमतवादी नौरोजी, गोखले, मेहता ज्यांच्यावर पाश्चिमात्य विचाराचा प्रभाव होता असेच नेते, काँग्रेसची दिशा ठरवित होते. जरी त्यांनी काही प्रमाणात, ब्रिटीशांचे मन वळवून, काही सुधारणा घडवून आणल्या तरी सामान्य जनतेला सर्वार्थाने समावून घेण्यास ते यशस्वी ठरले. लोकमान्य टिळकांना ब्रिटीशांच्या मनाचा अचूक अभ्यास होता. त्यांनी फार कुशलतेने सामान्य जनतेला राजकारणात आढून घेतले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करुन मराठ्यांचे मन ब्रिटीशांच्या दुष्ट राजकारणाविरोधात करण्याचा प्रयत्न केला. मवाळमतवाद्यांना मात्र ते जमले नाही.

ब्रिटीशांचा अरेरावीपणा व उद्दामपणामुळे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्य करण्याच्या पद्धती हळूहळू बदलायला लागल्या नम्र मागण्या व निवेदनांची जागा, ब्रिटीशांशी उघडपणाने असंतोष, बंड यांनी घ्यायला सुरुवात झाली. टिळक गर्जले "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे." या उलट, महाराष्ट्रातील अतिरेकी कारवायांमुळे ब्रिटीशांनी बंड चिरडून काढण्यासाठी अधिक कडक पावले उचलली. तसेच शांतपणाने प्रतिकार, मुख्यत्वे, स्वदेशीची चळवळ, असहकार, सत्याग्रह अशा प्रकारच्या माध्यमामुळे काहीच न करु शकणाऱ्या असहाय्य जनतेकडे ब्रिटीशांशी झुंजण्यासाठी एक शस्त्र मिळाले.

मुंबईतील मुस्लिमांनी मात्र भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला कोणतीही मदत केली नाही. समकालीन वर्तमानपत्रे व लेखकांनी नमूद केले आहे की इंडिअन काँग्रेसला पाठींबा देण्याच्या बाबतीत मुसलमानांचा एकूण दृष्टीकोन

नकारात्मकच होता. एकतर ते तटस्थ राहीले किंवा त्यांनी विरोध केला. फक्त काही बोटावर मोजता येण्यासारखे मुस्लिम उदा. तैयबजी इ.स.१८८७ मध्ये काँग्रेसचे अध्यक्ष झाले. त्यांनी पाठींबा दिला आणि राजकारणाद्वारे देशासाठी कार्य केले.

इ.स.१९०० नंतर मात्र टिळक व त्यांचे महाराष्ट्रातील अनुयायी आणि अरबिंदो घोष व बिपिन चंद्र पाल, बंगाल मधील नेत्यांबरोबर संबंध वाढीस लागले. फाळणी विरुद्ध व स्वदेशी चळवळीच्या निमित्ताने ते अधिक जवळ आले व बंगाल व मुंबईमधील राजकीय संबंध अधिक दृढ झाले. त्यानंतर इ.स.१९२० पर्यंत लोकमान्य टिळक हे आघाडीचे नेतृत्व होते. टिळक हे काँग्रेसचे सर्वात जास्त प्रतिभावान नेते होते. सगळ्या राष्ट्रीय चळवळीत त्यांचा सहभाग होता. परंतु इ.स.१९१५ पर्यंत गोखले व मेहताही काँग्रेसचे प्रतिभाशाली नेते होते. मेहतांनी प्रामुख्याने त्यांच्या मृत्यूपर्यंत मुंबईकरांचे नेतृत्व टिकवून ठेवले.

अशा प्रकारे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व महाराष्ट्र यांचे फार जवळचे नाते निर्माण झाले. महाराष्ट्रातील नेत्यांनी, व्यक्तिगत पातळीवर कितीही भेदभाव असले तरी पहिल्या तीन दशकांमध्ये काँग्रेसच्या उभारणीसाठी मोलाचे सहाय्य केले. त्यांच्या लेखांतून, भाषणांतून आणि कारवायांमधून दादाभाई नौरोजी, एम. जी. रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता व बाळ गंगाधर टिळक व अनेक महाराष्ट्रीयन नेत्यांनी इंडीअन नॅशनल काँग्रेसच्या उभारणीसाठी, विकासासाठी महत्त्वाचे योगदान दिले.

**भारत सेवक समाज व योगवान**

इ.स.१८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उभारणी नंतर, महाराष्ट्रातील जुन्या पद्धतीच्या स्थानिक संस्था खऱ्या अर्थाने लोप पावल्या. तसेच राजकारणातील अंतर्गत, वैचारिक वाद, नेतृत्त्वपदासाठी भांडणे या कारणाने त्या संस्था कमकुवत ठरल्या. कालांतराने काही नेत्यांनी स्वतःच्या स्वतंत्र संघटना उभारण्यास सुरुवात केली. ज्याद्वारे त्यांना विशिष्ट उद्दिष्ट्ये व हेतू साध्य करता येईल. संघटनेच्या कार्याला ठराविक दिशा देता येईल. भारत सेवक समाज ही अशाच प्रकारची एक संघटना होती.

इ.स.१९०५ मध्ये गोपाळ कृष्ण गोखलेंनी, सर्वटस् ऑफ इंडिया ही संस्था स्थापन केली- त्या मागचा हेतू हा, ज्या ज्या व्यक्तींना देशाच्या हिताच्या दृष्टीने, देशाची आर्थिकता आबाधित ठेवून, घटनात्मक मार्गाने प्रयत्न करावयाची इच्छा आहे अशांना प्रशिक्षण देणे. संस्थेत प्रवेश करते वेळी सभासदांना सात शपथा घेणे, बंधनकारक होते.

**त्या शपथा होत्या :**

१) देशाला सर्वात चांगले द्यायचे व देशाच्या हिताचाच विचार करावयाचा..

२) देशातील सर्वांना स्वतःचे बांधव समजून, जात पातीची बंधन झुगारुन, एकत्रितपणे कार्य करायचे.

३) देशाची कुठलाही स्वार्थ वा मोबदल्याची अपेक्षा न करता, अत्यंत निरपेक्षभावाने सेवा करायची.

४) सोसायटीने जे काही, सदस्यांना व त्यांच्या कुटुंबियांना देण्यात येईल, त्यातच समाधान मानावयाचे, स्वतः वेगळी मिळकत करण्याचा प्रयत्न करु नये.

जरी हि सोसायटी पूर्वीच्या सामाजिक संस्थांच्या तत्त्वावर काम करीत असली तरी, तिने कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांचे सदसत्त्व अत्यंत बारकाईने निवडलेल्या लोकांपुरते मर्यादित राहील, ज्यांना खरोखरीच राष्ट्राच्या हितासाठी प्रयत्न करावयाचा होता. त्यांनी स्वतःच्या सदस्यांसाठी काहीही कारवाया केल्या नाहीत. उदा. राजकीय, शैक्षणिक, आर्थिक वा सामाजिक त्यांचे सदस्य हे केवळ मातृभूमीची ठराविक प्रकारची सेवा करण्यासाठी प्रशिक्षित झाले होते. सोसायटीने तीन लेख प्रसिद्ध केले. १) सर्व्हेन्टस् ऑफ इंडिया २) ज्ञान प्रकाश (मराठीतून) आणि ३) हितवाद (साप्ताहीक).

सोसायटीची अनेक कार्ये होती व त्यांचे कार्यक्रमही कौतुकास्पदच होते. त्यांच्या पाच नामवंत सदस्यांच्या कामगिऱ्या (जी.के. गोखले, श्रीनिवास शास्त्री, एन.एम. जोशी, एच.एन. कुंजरु, राम बाजपाई) ह्या सोसायटीचे राष्ट्रकार्यातील योगदान स्पष्ट करण्यास समर्थ आहेत. गोखले आणि शास्त्रींनी राजकारणात उडी घेऊन, फार मानाचे स्थान पटकाविले. जोशींनी इ.स.१९११ मध्ये सोशल सर्विस लिगची मुंबईमध्ये स्थापना करुन सामान्य जनतेच्या हितासाठी अनेक पावले उचलली. केवळ पंधरा वर्षातच लिगने सतरा रात्रशाळा सातशे प्रौढांसाठी, अर्धवेळ काम करणाऱ्या गिरणी

कामगारांसाठी तीन दिवसशाळा, अकरा वाचनालये व वाचण्याच्या खोल्या आणि दोन अंगणवाड्यां सुरु केल्या. तसेच लिगने शंभर पेक्षा जास्त सहकारी पतसंस्था, मुलांसाठी व्यायामशाळा सुरु केल्या. बाजपाईंनी बॉईज क्लब व स्काऊट कॉर्पस् सुरु केले. सोसायटीने झोपडपट्टीवासीयांसाठी मोलाची कामगिरी पार पाडली. भारताच्या इतर भागातही त्यांनी शाखा उघडल्या. त्याचे अतिशय सक्रीय कार्यकर्ते यांनी मोलाचे सामाजिक कार्य केले. त्यांच्या काही शाखा व कार्यकर्ते अनेकविध प्रकारच्या कार्यात सामील होते. उदा. ग्रामीण भागाचा विकास व पुनरर्चना, भिल्लाचे पुनर्वसन स्त्रियांचे शिक्षण व विकास इ.

जरी बॉम्बे असोसिएशनने, मर्यादित स्वरुपाचे काम केले तरी शहराच्या व विशेषतः देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या व्यक्तींना प्रकाशझोतात आणले. सार्वजनिक सभा, ही राष्ट्रीय पातळीवरची आघाडीची संघटना होती ज्यात अनेक राजकीय सामाजिक विचारांना खतपाणी घालण्यात आले. महाराष्ट्रातील नेत्यांनी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या विकासासाठी फार मोलाचे योगदान दिले. भारत सेवक समाजाने स्त्रिया व सामाजिकदृष्ट्या मागसलेल्या भिल्लांसाठी विशेष प्रयत्न केले.

**टिळकांचा कालखंड  आणि महाराष्ट्रातील राष्ट्रवाद**

**प्रस्तावना**

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत सामान्यपणे भारत आणि विशेषतः महाराष्ट्र दोहोंची अधोगती होण्यास सुरुवात झाली होती. जेव्हा समाज अशा स्थितीत असतो, तेव्हा तो तीन मार्गांचा अंगीकार करतो. १) बंड २) बदल ३) पुनरुत्थान. या तीन प्रवृत्ती आपण लक्षात घेतल्या पाहीजेत की त्या कधीही वेगवेगळ्या राहू शकत नाही. त्या एकमेकांस मिसळल्या जातात. एकीचा प्रभाव दुसरीवर पडतो परंतु त्या प्रवृत्ती संपूर्णपणे भिन्न विचारांच्या व कृतींच्या आहेत. पहिले बंड हे सध्याच्या पारंपारिक व जुनाट पद्धती आणि दृष्टीकोनाविरुद्ध होता. बंडाचा उद्देश जुन्या पारंपारीक कल्पनांना बदलून नवीन कल्पना व मूल्यांची जोपासना करणे, समाज सुधारकांना, कांतीकारकांप्रमाणेच, सध्य परिस्थितीचा विचार करता अस्वस्थ व्हावे लागले झाले आणि बदल अपरिहार्य आहे याची जाणीव झाली. तथापि कांतीकारकांप्रमाणे भूतकाळाशी त्यांचे भांडण नव्हते. त्यांनी समाजामध्ये बदल, हा नवीन कल्पना, मूल्ये यांची समाजाला ओळख करुन देऊन अंमलात आणण्यासाठी प्रयत्न केले. जरी तो एक समर्थ बंडखोर असला तरी समाजात राहूनच जुन्या विचारांची जाळीजळमटे दूर करण्याचे काम तो करी उदाहणार्थ, एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील काही बुद्धीवादी मुक्त विचारांचे सुधारक हे त्यांच्या सांस्कृतिक, पारंपारीक वातावरणातच वाढले होते. त्यांनी कुटुंबाचे पारंपारिक वातावरण टिकवून ठेवले. गतकाळातील कवी-संतांशी भावनिक नाते कायम ठेवले. तसेच भूतकाळातील व पुराणातील शूर व्यक्तींपासून त्यांना सदैव प्रेरणाच मिळत राहीली. एम.जी. रानडे म्हणतात, "एक सुधारक हा जुन्या काळाला व नवीन काळाला धरुनच चालत असतो. तो सुधारक पुरोगामी विचारांचा असतोच पण त्याच वेळेस जुन्या, पारंपारीक मुल्यांचे जतन सुद्धा करतो."

पुनुरुत्थान करणारे हे इतर दोघांपेक्षा वेगळे असतात. तो धर्म वेडा असतो. पुराणिक रीतीरिवाज, परंपरा, सामाजिक धार्मिक रितीरीवाज बदलू नयेत असे त्यास वाटते. भूतकाळातील गोष्टींपासून त्याला प्रेरणा मिळते. नवीन संकल्पनांचा तो धिक्कार करतो. पुनुरुत्थापन करणारा काही क्षेत्रात पुरोगामी असू शकतो. परंतु त्यांची मूल्यमापन करण्याची पद्धती पुराणमतवादी असते. बुद्धीवादी नसते. तथापि पुनुरुज्जीवन करणा-याचा नवीन बदलांना पूर्णपणे विरोध नसतो आणि ते पूर्णपणे पुराणमतवादीही नसतात. उदा. भूतकाळास विनाकारण अवास्तव महत्त्व देताना तो फक्त, सामाजिक, धार्मिक आणि राजकीय बाबतीत स्वतःची मते व्यक्त करतो. थोडक्यात म्हणजे पुनुरुत्थान म्हणजे भूतकाळातील नीती-मूल्यांची, परंपरांची जोपासना करणे ज्याशिवाय समाजाचे एक वेगळे, स्वतंत्र अस्तित्त्वच राहत नाही. उदाहरणार्थ लोकमान्य टिळकांनी त्यांची सामाजिक तत्त्वे, सामाजिक बदलांसाठी आवश्यक असणारा दृष्टीकोन हा वेदांत तत्त्वज्ञानातून आणि महाराष्ट्राच्या परंपरातून विकसित केला होता. तरीही त्यांनी सामाजिक बदल व पुनरुत्थान घडवून आणले व त्याचा पुरस्कार केला.

**विष्णुबुवा ब्रह्मचारी व जहाल राष्ट्रवाद(इ.स.१८२५-१८७१)**

महाराष्ट्रामध्ये पुनरुत्थानाची प्रक्रिया ही ख्रिश्चन धर्माचा आणि पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीकोनातून झाली. अनेक हिंदूना असे वाटत होते की परकीय शक्तींचा वाईट प्रभाव त्यांच्या धार्मिक व सामाजिक संस्थांवर पडत आहे. पहीले पुनरुज्जीवन करणारे महाराष्ट्रातील विचारवंत होते विष्णू भिकाजी गोखले, जे विष्णुबुवा ब्रह्मचारी (इ.स.१८२५- १८७१) म्हणून जास्त प्रसिद्ध पावले. त्यांना लहानपणापासून धार्मिक गोष्टींची आवड होती. विवेक सिंधू, ज्ञानेश्वरी, एकनाथी भारुड, भगवत गीता इ. चे त्यांचे वाचन झाले होते. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी पंढरपूर येथे वैदीक धर्माचे पारायण करावयास सुरुवात केली आणि लवकरच महाराष्ट्राच्या इतर भागात प्रवचनास सुरुवात केली. मुंबई येथे त्यांनी मिशनऱ्यांचे आव्हान स्विकारले. त्यासाठी त्यांनी भाषणे, वादविवाद आणि वृत्तपत्रांद्वारे ज्ञानप्रबोधनास सुरुवात केली. इ.स.१८५६ ते १८७१ पर्यंत, ब्रह्मचारींनी, मिशनऱ्यांच्या हिंदू विरोधी धर्म प्रसाराला सडेतोड उत्तर दिले. हे अतिशय महत्त्वाचे आहे की इ.स.१८५७ मध्ये १५ जाने. ते जून १८५७ तब्बल सहा महीने त्यांनी चौपाटी समुद्र किनाऱ्यावर ख्रिश्चन मिशनऱ्यांबरोबर वादविवाद केला. हिंदू, मुस्लिम आणि ख्रिश्चनांनी मोठ्या प्रमाणावर या वाद संवादास हजेरी लावली होती. या साप्ताहीक वादविवादाचे प्रत्यंतर जनमानसाच्या मनावर इतके खोलवर रुजले की इ.स.१८५७ मध्ये मुंबई सरकारने विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांना यापुढे प्रवचन करण्यास व धार्मिक प्रवचन करण्यास मनाई केली. विष्णुबुवांच्या कार्यप्रसारामुळे, धार्मिक भावना भडकतील अशी भीती सरकारास वाटली.

नंतर त्यांनी भारताच्या विविध भागात प्रवास करुन, वेदांचे सार्वभौमत्व व सर्वव्यापकता, श्रेष्ठता यांवर प्रवचने दिली. त्यांच्या मते, वेद म्हणजेच ज्ञान. ते प्रत्यक्षात देवाचा अंश आहेत. त्यांचा विश्वास होता की वेदांच्या अभ्यासाने माणसाचा नैतिक व तात्त्विक विकास होतो. त्यांच्या मते, वैदीक काल हा फक्त तात्त्विक दृष्ट्याच नव्हे तर शात्रीय व तांत्रिक दृष्ट्याही फार प्रगत होता. त्यात रसायनशास्त्र व भौतिकशास्त्राचा सखोल अभ्यास होता. ते म्हणतात की, संपूर्ण जगातील लोकांनी वैदीक धर्माचा पुरस्कार केला आहे आणि त्यासंबंधीच्या धार्मिक सूचना संस्कृत भाषेतून देण्यात आल्या आहेत. ब्रह्मचारींचे इतर धर्माबाबत चांगले मत नव्हते. ख्रिस्ती धर्माबाबत त्यांना वाटे की, हा धर्म म्हणजे क्रूर जातीच्या लोकांनी दांभिक पद्धतीने निर्माण केलेला धर्म आहे.

विष्णुबुवा ब्रह्मचारी ब्राह्मणी हिंदुत्त्वाच्या बाबतीत अतिशय धर्मपरायण होते. उदा वैदीक विधी, शाकाहार, पूर्वजन्मावर विश्वास इ. त्यांच्या मते, हिंदू आणि इतर धर्म जसे ज्यू, ख्रिश्चन मुस्लिम आणि इतर यांच्यामधील महत्त्वाचा भेद हा होता की, त्यांना वाटे की फक्त मनुष्यातच आत्मा आहे, प्राण्यात नाही. याउलट हिंदू धर्म विश्वातील कणाकणात आत्मा आहे असे मानतो. पुनर्जन्मावर इतर धर्माचा विश्वास नाही आणि मृत्यूसमयी शेवटी सगळयांना एकाच पद्धतीने न्याय मिळतो असा इतरांचा समज होता.

आश्चर्य असे की पुराणातील आणि पारंपारिक रितीरिवाजांविषयी इतकी आत्मियता असताना सुद्धा त्यांनी मोकळ्या मनाने अनेक चुकीच्या रुढी, रितीरिवाज नाकारले. त्यांच्या मते, व्यक्तीची जात ही त्यांच्या कर्माने ठरावी, जन्माने नाही. त्यांनी श्री शिक्षणाचा पुरस्कार केला. वर निवडताना, मुलींच्या आवडीनिवडींना प्राधान्य द्यावे. त्यांनी असे म्हटले की बारा वर्षांखाली त्यांचा विवाह व्हावा. त्यांनी सतीची पद्धत चुकीची ठरवून त्याविषयी निंदा केली. विधवा पुनर्विवाहास पाठींबा दिला.

ते अत्यंत हाडाचे लेखक होते. विष्णुबुवांच्या प्रसिद्ध साहित्यापैकी एक म्हणजे 'वेदोक्त धर्मप्रकाश, इ.स. १८६४ मध्ये ते प्रकाशित झाले. त्यातील 'एक रुचक फायदेशीर सरकार' या लेखात एकच घर आणि सर्व नागरीक हे त्यांचे कुटुंबिय असा विचार त्यांनी मांडला. त्यांनी असे म्हटले की, प्रजेचे हित सांभाळणे, ही सरकारची जबाबदारी आहे आणि राजाच्या आज्ञेचे पालन करणे हे जनतेचे कर्तव्य तसेच, सर्वजण एकाच कुटुंबाचे प्रतिनिधी असल्याने, सर्व जमिन ही कोणा एकाची मालकीसत्ता न ठेवता सर्वांनी ती सर्वांसाठी कसायला हवी आणि एकमेकांच्या गरजा पूर्ण करावयास हव्यात. सामाजिक बाबीत त्यांनी कायदेशीर विवाह (Civil Marriages) आणि घटस्फोटांना परवानगी दिली. त्यांच्या मते, मुले फक्त पाच वर्षापर्यंत आईवडीलांकडे राहू शकतात. त्यानंतर सरकारकडे सुपूर्द केली पाहिजेत. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीस त्यांच्या कार्यक्षमतेनुसार काम दिले पाहिजे आणि त्यांच्या व्यवसायानुसार, पाच जातींमध्ये विभाजन

केले पाहीजे. सरकारने वृद्ध लोकांची काळजी घेतली पाहिजे आणि प्रत्येक विभागाचा प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक केली पाहीजे आणि ही संस्था संसदेपारखी कार्यरत झाली पाहिजे.

ब्रह्मचारींनी संपत्तीचा अभाव असलेल्या अर्थव्यवस्थेचा विचार केला होता आणि अशी व्यवस्था ज्यात धर्मदायी सस्थांचाही अभाव आहे. परंतु, लोकांच्या चारीत्र्याविषयी व व्यक्तिमत्त्वाविषयी ते आश्वासक होते. अनेक भ्रष्टाचारी राज्यकर्त्यांमुळे एकूण समाजाचे चारित्र्यच भ्रष्ट झाले आहे. परंतु यातूनही चांगले होईल आणि जनतेची पिळवणूक व भ्रष्टाचार अधिक काळापर्यंत चालणार नाही. जनता अतिशय चांगुलपणाने राहील. इ.स.१८७९ मध्ये त्यांनी या लेखाच्या १०,००० प्रती छापून भारतातील नामवंत लोकांकडे तसेच ब्रिटीश संसदेस, मंत्र्यांना, राणी विक्टोरिया, प्रिन्स एडवर्ड यांना पाठविल्या.

विष्णुबुवा ब्रह्मचारीसारख्या धार्मिकदृष्ट्या कर्मठ व्यक्तीने अव्यवहार्य चालीरितींना विरोध कैला. लेडर्ले म्हणतो की, "त्यांचे हे विचार वैदांतिक, ऋषिमुनींचे विचार ज्ञानेश्वरांचे लिखाण ज्यांनी तेराव्या शतकात भगदवद्गीतेचे भाषांतर केले होते त्या सर्वांपासून प्रेरित होते." लेडर्ले पुढे म्हणतो की, "त्यांचे समाजाचि तात्त्विक बैठक मांडताना विष्णुबुवा ब्रह्मचारी हे भारतीय वेदांतिक तत्त्वज्ञान व परंपरांशी एकनिष्ठ राहिले."

विष्णुबुवा ब्रम्हचारी हे पुनरुत्थान प्रवृत्तीचे अग्रेसर व्यक्ती होते. सामाजिक व धार्मिक क्षेत्रात अग्रगण्य होते पाश्चिमात्य संस्कृतीपेक्षा भारतीय संस्कृती श्रेष्ठ आहे यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. आणि म्हणूनच भारतीयांनी वेदांवर विश्वास ठेवून त्यापासून प्रेरणा घेतली पाहीजे, या विचारांचे ते होते. त्यांचे सामाजिक विचार हे बंधुत्व व समाजकल्याणावर आधारित होते. आर.सी. मुजुमदार त्यांना 'आदर्श समाज वादाचे जनक' असे संबोधतात व त्यांची तुलना युरोपच्या ख्रिश्चन मिशनऱ्यांबरोबर करतात. एक लेखक म्हणतो, "ते सामाजिक बंधुत्ववादी, राजकीयदृष्ट्या समाजवादी, मनाने मुक्तविचारांचे किंवा स्वातंत्र्यवादी आणि नैतिकट्या शूर, आत्मविश्वासू आणि माणूसकीप्रिय होते."

विष्णुबुवा ब्रह्मचारी जरी कट्टर हिंदू असले तरी ब्राह्मणांचा वरचष्मा त्यांना मान्य नव्हता. असे करत असताना उच्च वर्गात आणि तळागाळातील समाजात दरी पडली. त्यांची परिणती काही चुकीच्या घटनांमध्ये झाली. (मुंबई प्रांत) मुंबईचे वृत्तपत्र 'इंदू प्रकाश' ने त्यांच्या मृत्यूनंतर, २० फेब्रुवारी १८७१ मध्ये लिहीले की,

"विष्णुबुवा ब्रह्मचारीसारखा व्यक्ती सापडणे कठीण आहे. ते एक असमान्य विचारवंत होते. त्यांनी स्वतःचे बोल कृतीत उतरवले. समाजाच्या हितासाठी जे जे आवश्यक आहे ते ते करुन दाखविण्याचे असामान्य धाडस त्यांच्याकडे होते आणि म्हणूनच, विष्णुबुवांच्या मृत्यूने केवळ मुंबईचे नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे नुकसान झाले."

विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा राष्ट्रवाद व पुनरुज्जीवत्तवाव (इ.स.१८५० - १८८२)

आपण बघितले की एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वाधात महाराष्ट्रात अनेक विचारवंतांची मालिकाच तयार झाली. उदा. बाळशास्त्री जांभेकर, डॉ. भांडारकर इ. त्यांच्या विचार व कल्पनांचा महाराष्ट्रावर खोलवर परीणाम झाला. शतकाच्या उतरार्धातही समान योग्यतेच्या व्यक्ती निर्माण झाल्या. उदा. विष्णु शास्त्री चिपळूणकर, गोपाळ कृष्ण गोखले, गोपाळ गणेश आगरकर आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. परंतु चिपळूणकरच असे आहेत की त्यांच्या तेहतीस वर्षाच्या इतक्या कमी कालखंडात ते एक पत्रकार, लेखक, निर्भीड हिंदू देशभक्त व पुनुरुत्थानकार म्हणून नावारुपास आले. त्यांची 'निबंधमाला' व 'केसरी'मधील लेखांनी केवळ त्यावेळच्या लोकांवरच नव्हे तर पुढील पिढीतील लेखक, पत्रकार व टिळकांसारख्या सामाजिक कार्यासाठी आदर्श ठरली. त्यांना 'आधुनिक मराठीचे जनक' समजले जाते. त्यांना एकोणिसाव्या शतकाच्या महाराष्ट्राचे प्रवक्ते आणि प्रतिनिधी समजले जाते. तर काही लोक त्यांना महान साहित्यिक व हिंदू धर्मीयांचे नेते समजतात. विष्णुशास्त्रींचा जन्म २० मे १८५० मध्ये पुण्यात झाला. त्यांचे वडील कृष्णशास्त्री चिपळूणकर हे अत्यंत प्रसिद्ध व्यक्ती होते. इ.स.१८६५ मध्ये वयाच्या पंधराव्या वर्षी ते मॅट्रीकची परीक्षा पास झाले. नंतर चार वर्षांनी, त्यांनी 'शाळापत्रक' नावाचे वृत्तपत्र संपादीत केले. इ.स.१८७० मध्ये मुंबई विद्यापीठातून ते पदवीधर झाले आणि दोन वर्षांनी त्यांनी स्वतःचे 'निबंधमाला' हे नियतकालिक सुरु केले. त्यानंतर त्यांनी न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली, ज्यामधून महाराष्ट्राचे नामवंत नेते मंडळी जन्माला आली. थोडक्यात म्हणजे, वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षापासून त्यांनी सामाजिक कार्यास वाहून घेतले. त्यांचा मृत्यू १७ मार्च १८८१ मध्ये झाला. परंतु मृत्यूपूर्वी त्यांनी

महाराष्ट्राच्या हृदयात स्वतःचे असे वेगळे स्थान निर्माण केले. मुंबई प्रांताचे साहित्यिक आणि सामाजिक जीवन त्यांनी समृद्ध केले.

**विष्णुशास्त्री एक लेखक आणि पत्रकार :**

त्यांच्या वडीलांच्या प्रभावाखाली तरुण विष्णुशास्त्रींनी मराठी व संस्कृत भाषा व साहीत्यात रुची निर्माण केली. त्यांच्या महाविद्यालयीन दिवसातील व्यापक वाचनाने भारतीय तत्त्वज्ञान, इतिहास व साहित्यांची त्यांना ओळख झाली. पाश्चिमात्य साहीत्य व इतिहासाच्या अभ्यासाने त्यांचे विचाराचे क्षितिज अजून व्यापक झाले, त्यांचे साहित्य अजून प्रगल्भ झाले. त्यांचे मराठी वरचे प्रभुत्व तर एवढे वाढले की ते स्वतःच 'स्वतःला मराठीचे शिवाजी' समजत.

विष्णुशास्त्री हे पहिले मराठी लेखक होते ज्यांनी शास्त्रीय साहित्यिक टीकाशास्त्र अस्तित्वात आणले. त्यांनी जुन्या काळातील महान लेखक कालिदास, बाण सुबांशू, दंडीज इ. च्या साहित्यावर टीका केली. शाळापत्रक, निबंधमाला, केसरी मधील त्यांचे लेख हे त्यांचे मराठीवरचे असामान्य प्रभुत्व, स्वतंत्र विचारसरणींचे दर्शन घडवितात. लेख लिहीत असतानाच ते शाळेत शिकवित होते. निबंधमालेचे संपादन करीत होते. जी त्यांनी इ.स.१८७४ मध्ये सुरु केली. जोपर्यंत बहुतेक सर्वच लेखक संस्कृत किंवा इंग्रजीचे भाषांतर करीत. परंतु, मराठी भाषेत स्वतंत्र असे फारच कमी साहित्य निर्माण झाले होते. निबंधमालेच्या माध्यमातून विष्णूशास्त्रींनी हे दाखवून दिले की ज्ञान, इतिहास राजकारण, अर्थकारण आणि तत्त्वज्ञान अशा विविध क्षेत्रात मराठी भाषा कुठल्या पातळीपर्यंत भरारी घेऊ शकते. त्यांच्या लेखांनी विचारवंतांच्या मतानुसार, आतापर्यंत परकीय विचारांच्या जोखडात अडकलेल्या अनेक सुशिक्षितांना मुक्त केले. तथापि, त्यांनी पूर्वीच्या लेखकांचे, कादंबरीकारांचे, संशोधनकारांचे व पत्रकारांचे मराठी भाषेतील योगदान त्यांनी दृष्टीआड केले नाही.

इ.स.१८८० मध्ये चिपळूणकरांनी टिळक, आगरकर आणि ना.म.जोशी यांच्याशी सहभागी करुन पुण्यात न्यू इंग्लीश स्कूल स्थापन केले जे कॅथलिक जेयूईट मिशनऱ्यांच्या आधुनिक तत्त्वप्रणालीवर आधारीत होते. त्याच वर्षी त्यांनी दोन मराठी पेपर छापायचे ठरविले. 'केसरी' मराठीतून आणि 'मराठा' इंग्रजीमधून या मागचा उद्देश हा होता की लोकांमध्ये सामाजिक व राजकीय विषयांसंबंधी जागृती निर्माण करावयाची आणि या दोन वृत्तपत्रांसाठी त्यांनी आर्यभूषण प्रेस स्थापन केली. विष्णुशास्त्रींचे सुरस व प्रभावी लिखाण हे इतर लेखकांसाठी स्फूर्तीदायकच होते. त्यांच्या 'निबंधमाला' या पेपरमधून साहित्यिक टीका व राजकीय लेख या दोहोंवर प्रकाश टाकला जाई. १८८२ मध्ये, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची मराठी साहित्याची गंगोत्री आगरकर, टिळक, एम.एम. परांजपे आणि इतरांनी वाहत ठेवली. अशा प्रकारे एक लेखक, पत्रकार, प्रिटींग प्रेसचे जनक, शिक्षणतज्ञ म्हणून चिपळूणकर हे अतिशय प्रसिद्ध होते.

**चिपळूणकरांचे सामाजिक व राजकीय विचार :**

चिपळूणकर हे धार्मिक बाबतीत संवेदनशील होते. परंतु सामाजकि क्षेत्रात मात्र तेवढे पुराणमतवादी नव्हते. जरी ते अत्यंत व्यापक विचारांचे असले तरी, तरुण, सुशिक्षितवर्ग आपले प्राचीन चिरायु संस्कृतीची विचार तत्त्वे, मातृभाषा व सामाजिक नीती मूल्यांच्या त्याग करुन, पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करतात हे त्यांना मुळीच मान्य नव्हते. त्यांच्या मते, असे वर्तन म्हणजे स्वतःची संस्कृती व मातृभाषेवर अविश्वास दाखविण्यासारखे आहे. त्याच वृत्तीमुळे, भारत सदैव परकीय शक्तीच्या अंमलाखाली गुलामगिरी करीत राहीला म्हणूनच त्यांनी तरुण सुशिक्षितांमध्ये जी नवीन पाश्चात्य अंधानुकरणाची प्रवृत्ती वाढीस लागत आहे तिचा त्यांनी धिक्कार केला. त्यांनी तरुणांना आवाहन केले की महान नेते जांभेकर, भांडारकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी आणि रानडे ज्यांनी महाराष्ट्रातील जनतेचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला त्यांच्या कार्याला विसरु नका.

चिपळूणकरांनी त्यांच्या प्रभावी लेखणीचा उपयोग स्वार्थी आणि राजकीयदृष्ट्या मागासलेल्या आणि ब्रिटीशांना मदत करणाऱ्या महाराष्ट्रीयन लोकांचे न्यून उघडे पाडण्यासाठी केला. त्यांना असे वाटे की अनेक समाजसुधारकांना, ते जे ज्ञान लोकांना देतात, ते स्वतः अंमलात आणण्याचे धैर्यच नसते. तसेच जनतेच्या सुखदुःखाशीही त्यांचा काहीही संबंध नसतो, याची त्यांना खंत वाटली. हे अतिशय विरोधाभासात्मक आहे की अनेक समाजसुधारक त्यांच्या भाषणात जुन्या परंपरा रुढी, पद्धती यांच्या विरुद्ध बरेच अवसान आणून बोलतात. परंतु प्रत्यक्षात मात्र स्वतःच्या मुलांचे उपनयन समारंभ

मात्र अतिशय पुरातन पद्धतीने करतात. स्वतःच्या लहान मुलांची लग्ने लावतात. चिपळूणकरांना या अशा दांभिकतेचा तिटकारा होता आणि त्यांनी त्यांच्या लेखामध्ये त्यावर निक्षून प्रहार केले. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे एक धाडसी विद्वान होते. न वाकणारे न झुकणारे असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. त्यांनी हिंदू धर्माच्या चिरंतन मूल्यांचे रक्षण करण्यासाठी ख्रिश्चन मिशनरी व पाश्चिमात्य संस्कारांच्या विरोधात बंड पुकारले. त्यांच्या शब्दाप्रमाणे त्यांचे व्यक्तिमत्त्वही विविधांगी होते. जेव्हा त्यांच्या अनेक मित्रांनी समाजसुधारणे विरोधात पाठ फिरवली, तेव्हा त्यांनी धाडसीपणाने इ.स.१८७४ मध्ये आपली पत्नी वारल्यानंतर, एका विधवेशी विवाह केला. ह्यावरुन असे सिद्ध होते की ते सामाजिक बाबतीत अजिबात पुराणमतवादी नव्हते जो आरोप त्यांच्यावर लावण्यात येत होता. खरंतर त्यांच्या शाळापत्रक, निबंधमाला आणि केसरी या वर्तमानपत्रातील लेखांचा काळजीपूर्वक अभ्यास केला तर त्यांचे विचार अतिशय आधुनिक व त्यावेळच्या कोणत्याही समाजसुधारकांपेक्षा पुरोगामी होते. त्यांनी समाजसुधारकांचे कौतुकच केले. परंतु या सुधारकांच्या काम करण्याच्या पद्धती, त्यांच्या आयुष्यातील अग्रक्रमांच्या बाबी, आणि इंग्रजी व पश्चिमीदेशांविषयी अमर्याद आकर्षण व प्रेम या गोष्टींचा त्यांना तिटकारा होता.

चिपळूणकर त्यांच्या बालपणात पेशवा राज्याविषयी भावूक होते. जस जसे ते मोठे होत गेले, तसतसा त्यांच्यातील ब्रिटीशांविषयीचा तिरस्कार वाढत गेला आणि भारतीयांना ब्रिटीशांच्या विरुद्ध तयार करावयाचे, असे त्यांनी मनोमन ठरविले. हा उद्देश मनात ठेऊन, त्यांनी त्यांच्या लेखाद्वारे ब्रिटीशांविरोधीचा तिरस्कार, इतर सुशिक्षित तरुणांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न केला. या कामात त्यांना यश आले आणि अनेक महाराष्ट्रीयन तरुण मुले मातृभूमीसाठी स्वातंत्र्यासाठी प्रतिकार करावयास तयार झाली. परंतु त्यांचा भर हा भारताच्या भव्यदिव्य भूतकाळावर व भारताच्या समृद्ध व्यवस्थेवर होता. त्यांनी हिंदू धर्म, संस्कृती आणि परंपरांविषी, ज्यांनी कोणी अपशब्द वापरले त्यांच्या विरुद्ध ते उभे ठाकले. भारताच्या भव्यदिव्य इतिहासाने भारावून गेलेले विष्णूशास्त्री, हिंदू धर्मातील चुकीच्या पद्धतींवर उदा. बालविवाह, स्त्रियांचे प्रश्न आणि त्यांच्यावरचे अत्याचार, क्षुद्र आणि अतिक्षुद्रांची पिळवणूक ह्या सर्वाबाबत त्यांनी टीकास्त्र उचलले. परंतु भारताच्या सामाजिक धार्मिक, आर्थिक परिस्थितीत आता काही अपरिहार्य बदल अटळ होते याची त्यांनी विशेष दाद घेतली नाही.

चिपळूणकर स्वतंत्र भारताचे स्वप्न खरे होताना पाहू इच्छित होते ज्यातील जनता ही सार्वभौम असेल ते निबंधमालेमध्ये लिहीतात, "ब्रिटीश राजवटीमुळे आमचे स्वातंत्र्य नष्ट झाले आहे. स्वातंत्र्याचा अंत म्हणजे सगळ्याचा अंत. परंतु सगळ्यात दुर्दैवी बाब म्हणजे स्वातंत्र्या अभावी आमच्या संस्कृतीचे अधःपतन झाले आणि आमचे व्यक्तिमत्व पूर्णपणे भ्रष्ट झाले." म्हणूनच, त्यांनी महाराष्ट्रीयन जनतेमध्ये राष्ट्रप्रेम व ब्रिटीश सरकार विरुद्धचा तिरस्कार बिंबवला. त्यांना असे स्पष्ट वाटे, जर भारतीयांना विकास साधायचा असेल तर परकीय साम्राज्य संपविले पाहीजे. या कारणासाठी त्यांनी सामाजिक सुधारणांपेक्षा राजकीय सुधारणांना अधिक महत्त्व दिले. उदाहरणार्थ त्यांच्या 'आपल्या देशांची स्थिती' या लेखात भारताच्या अधःपतनाला इंग्लंड जबाबदार आहे. कारणीभूत आहे. तेव्हा या पाश्चिमात्य आर्यन बांधवांना म्हणजे ब्रिटीशांना त्यांच्या मायदेशी पाठविणे गरजेचे आहे. एक वेळच्या अत्यंत समृद्ध, सुपिक, हुशार व्यक्तींनी नावाजलेल्या भारताचे हे हाल व्हावेत (एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात) या विषयी त्यांना खूप खंत वाटे. त्यांच्यावर वर्षांनुवर्षे इतके अन्याय अत्याचार झाले की ते आता स्वतःचे अधिकारच विसरलेत आणि त्यांच्यामध्ये व प्राण्यांमध्ये काहीही फरक नाही आहे असे ते खेदाने लिहीतात.

चिपळूणकरांना या विषयी खूप खंत वाटते की, सुशिक्षित स्वतःस खूप हुशार समजणारे तरुण स्वतःच्या ज्ञानाचा उपयोग, स्वकीयांचे प्रश्न व दुःख कमी करण्याऐवजी, ब्रिटीश अधिकाऱ्यांची मर्जी जिंकण्यातच जास्त मश्गुल आहे. त्यापैकी काही विदेशी दारुच्या नशेत इतके बुडालेत की स्वतःची संस्कृती, परंपरा याचीही त्यांना शुद्ध राहीली नाहीये. काहींनी स्वतःची लाज लज्जा वाऱ्यावर सोडली आहे व परकीयांच्या चरणांशी लीन झाले आहेत. टी.व्ही. पर्वते म्हणतात, "चिपळूणकरांनी ही शिकवण दिली की भारताची भव्यदिव्य प्रतिष्ठा जर परत मिळवायची असेल तर स्वतःच्या पायावर उभे राहून, आत्मविश्वास वाढविला पाहीजे."

'मराठी साहीत्याचे शिवाजी' चिपळूणकर, भारताची शेती, उद्योग, व्यापार सगळ्याच बाबतीतील अधोगती पाहून फार चिंतीत होतात. या सगळ्यांस ब्रिटीशच जबाबदार आहेत असे त्यांना वाटे. तथापि, त्यांनी धर्म किंवा सामाजिक चाली, रुढी उदा. बालविवाह किंवा जातीय भेदभाव या गोष्टी ज्या समाजसुधारकांनी उचलून धरल्या होत्या त्या काही भारताच्या अधोगतीस कारणीभूत नाहीत. त्यांच्या चरीत्राचा अभ्यास करणारे लिहीतात की याचा अर्थ असा नव्हे की वाईट गोष्टींना त्यांचा प्रतिकार नव्हता. परंतु त्यांची भावना मात्र संपूर्ण देशाने एक व्हावे, स्वावलंबी, सेवा परायण आणि निरपेक्ष भावनेने देशाच्या स्वातंत्र्यासाठी, प्रगतीसाठी लढावे असे त्यांना वाटे.

विष्णूशास्त्री चिपळूणकर हे निसंदिग्धपणे भारतमातेचे महान सुपुत्र होते आणि महाराष्ट्राला त्यांचा अतिशय अभिमान आहे. त्यांना 'मराठी साहीत्याचे बृहस्पती' असे संबोधण्यात येई. परंतु त्यांनी इंग्रजी भाषेचे सामर्थ्य ओळखले होते व त्यांस ते 'वाघीणेचे दुध' असे संबोधित. परंतु त्यांचा पाश्चिमात्याचे अंधानुकरणास विरोध होता. आधीच नमूद केल्याप्रमाणे पेशवेकालीन महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि संस्थांचा त्यांना अतिशय आदर होता-

चिपळूणकरांनी अथक प्रयत्न करुन, मराठी माणसामध्ये लपलेला राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम बाहेर काढण्याचे मोलाचे कार्य केले. परंतु हाच राष्ट्रवाद संपूर्ण राष्ट्रीय पातळीवर जागृत करणे किती गरजेचे आहे याची जाणीव त्यांना झाली नाही. हे काम लोकमान्य टिळकांवर आले आणि त्यांनी ते समर्थपणे निभावले. परंतु चिपळूणकरांनी अनेक राष्ट्रभक्तांचे या बाबतीतील लक्ष या गोष्टीकडील वळविले की ब्रिटीशांचे राज्य म्हणजे वरदान आहे हे संपूर्णपणे खोटे आहे. त्यांनी हे दाखवून दिले की ब्रिटीश आणि त्यांची संस्कृती भारतात येण्यापूर्वीपासून भारतीय व्यवस्था ही समृद्ध व समर्थ होती. त्यांनी परत परत पाश्चिमात्य संस्कृतीवर श्रद्धा ठेवणाऱ्यांना निक्षून सांगितले की ब्रिटीशांनी भारतात सभ्य संस्कृती आणली हे पूर्णपणे चूकीचे आहे. अशा प्रकारच्या वक्तव्यात काहीही ठोस पुरावा नाही, हे केवळ अर्धसत्य आहे, असे ते म्हणत. त्यांनी भारतीयांना विनंती केली की अशा प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेऊ नका.

१८ मार्च १९०१ मध्ये चिपळूणकरांच्या पुण्यतिथी प्रसंगी जे भाषण देण्यात आले त्यात टिळकांनी, चिपळूणकरांचे विशेष आभार मानले. कारण त्यांनी सदैव भारतीय संस्कृतीचे अध:पतन करणाऱ्या इंग्रजी शिक्षण पद्धतीला विरोध केला होता. हरी नारायण आपटे, एस.एम. परांजपे, एस.के. कोल्हटकर, एन.सी. केळकर व इतर नामवंत लेखकांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या लिखाणातून आम्हाला प्रेरणा मिळाली हे कबूल केले.

**थिऑसॉफिकल सोसायटीचे कार्य**

थिऑसॉफिकल सोसायटी न्यूयॉर्कमध्ये मादाम ब्लावटस्की आणि कर्नल ऑलकॉट यांनी इ.स.१८७५ मध्ये स्थापन केली. ह्या मागचे कारण हे होते की पाश्चिमात्य विद्वानांनी अभ्यास केल्याप्रमाणे हिंदू धर्माच्या वैदीक पवित्र पुस्तकांचे सर्वोच्च स्थान स्पष्ट झाल्याने त्यांचे कौतुक करावे या उद्देशाने ही संस्था स्थापन झाली. आर्य समाजाच्या अनुयायांनीही अनेक अमेरिकी अनुयायांना आकर्षित केले होते. परंतु थिआसॉफिकल गट हा आर्य समाजापेक्षा अधिक कर्मठ व गूढ होता. थिऑसॉफिकल सोसायटीचे संस्थापक जानेवारी १८७९ मध्ये भारतात आले. त्याच काळात अनेक सुशिक्षित मध्यम वर्गीय पुढारी उदा. दादोबा पांडुरंग, न्यायमूर्ती रानडे आणि इतरांनी आर्य समाज व प्रार्थना समाजाचे एकीकरण मिळवणी करण्याच्या प्रयत्नात होते. थिऑसॉफिकल सोसायटीचे संस्थापक आर्य समाजाशी अत्यंत सहकार्याने वागले. तथापि स्वामी दयानंद सरस्वतींना प्रार्थना समाज आणि थिऑसॉफिकल सोसायटी कधीच पसंत पडली नाही. त्याना वाटे की प्रार्थना समाजास भारतीय संस्कृतीशी काहीही देणे घेणे नाही आणि थिऑसॉफिकल सोसायटीचा कल गुढत्वाकडे जास्त आहे.

**थिऑसॉफिनल सोसायटीची उद्दिष्ट्यचे.**

१) वैश्विक बंधुभाव निर्माण करणे.

२) प्राचीन धर्माचा, तत्त्वज्ञानाचा आणि विज्ञानाचा पुरस्कार करणे.

३) निसर्गाच्या नियमांचा शोध लावणे आणि माणसातील दैवी शक्तींना प्रोत्साहन देणे.

४) थिऑसॉफिकल सोसायटीने त्यांचे तत्त्वज्ञान ब्राह्मणी व बौद्ध तत्त्वज्ञानातून घेतले होते. धर्म, तत्त्वज्ञान आणि गुढत्वाचे ते एक अजब मिश्रण होते. त्यांचे तत्त्वज्ञान व शिकवण, पुढील मुक्ष्यांशी संबंधित असे.

१) एकेश्वरवाद.

२) देव, विश्वामध्ये तीन रूपांमध्ये आढळतो.

३) माणसाचे उच्चतम पातळी म्हणजे देव, देवदूत, आत्मा आणि मानव परातीत बुद्धीमत्ता अस्तित्वात आहे यावर विश्वास ठेवणे.

दयानंद सरस्वतींनी थिऑसॉफिकल सोसायटीच्या कार्याची स्तुती केली कारण त्यांनी अनेक सामाजिक कार्ये जशी शाळा उघडणे, पुस्तके छापणे इ. सुरु केली. परंतु निधीचा योग्य वापर न केल्याबद्दल आर्यसमाज थिऑसॉफिकल सोसायटी मध्ये दरी पडली. थिऑसॉफिकल ओसायटीचे मुख्य कार्यालय अडयार, मद्रास येथे इ.स.१८८२ मध्ये हलविण्यात आले आणि भारतात विविध ठिकाणी शाखा उघडण्यात आल्या.

मादाम ब्लाव्हाटस्की या प्रवचनासाठी दौऱ्यावर निघाल्या आणि मोठ्या प्रमाणावर, भारताच्या मुख्य शहरातून अनुयायी वर्ग त्यांना मिळाला. अनेक हिंदू नेत्यांची, धार्मिक बाबतीतल श्रद्धा डळमळीत झाली होती. हिंदू धर्मातील कर्मठ आणि दांभिकपणावर उघडपणे टीका करण्याचे धैर्य त्यांच्यात नव्हते. म्हणून थिऑसॉफिकल सोसायटीचा आश्रय त्यांनी घेतला. त्यांनी संदीग्धपणाने 'कर्म' व 'निर्वाण' या सोसायटीच्या दोन तत्त्वांना मान्यता दिली. परंतु त्यांचा खरा रस हा संस्थेच्या शैक्षणिक कार्यातच होता.

**थिऑसॉफिकल सोसायटीचे महत्त्व :**

थिऑसॉफिकल सोसायटीने शाळा उघडल्या, पुस्तके छापली आणि पुस्तिकांद्वारा हिंदू प्राचीन धर्म व संस्कृतीचे महत्त्व विशद केले. १९ व्या शतकाच्या शेवटच्या वर्षात हिंदू पुढारी परकीयांसमोर मान खाली घालत जेव्हा ते हिंदू धर्मातील गुंतागुंतीच्या जाती व्यवस्थेबद्दल बोलत असत. परंतु मादाम ब्लाव्हाटस्की व नंतर ॲनी बेझंट यांच्या इ.स.१८८९ मध्ये नेतृत्वाखाली, हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवनाची प्रक्रीया सुरु झाली. दादाभाई नौरोजी, के.टी. तेलंग, लोकमान्य टिळक आणि न्यायमूर्ती रानडे यांनी त्यांच्या कार्याचे, विविध अंगांनी व दृष्टीकोनातून कौतुक केले. इ.स.१८९३ मध्ये मादाम ब्लाव्हाटस्की यांच्या निधनानंतर ॲनी बेझंट, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये अतिशय प्रसिद्ध झाल्या. इ.स.१८९१ मध्ये त्यांनी बनारस येथे हिंदू कॉलेज सुरु केले आणि हिंदू धर्मातील सुधारणांचा पुरस्कार केला. सोसायटीची तत्त्वप्रणाली व गूढवादी भूमिका या कारणाने निर्भत्सना झाली. परंतु हे सत्यही नाकारुन चालणार नाही की सोसायटीने हिंदू समाजात आत्मविश्वास जागृत केला होता.

**गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव**

इ.स.१८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर अनेक पाश्चिमात्य शिक्षित तरुण व राजकीयदृष्ट्या जागृत झालेल्या वर्गाच्या, प्रामुख्याने हिंदू समाजाच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. परंतु त्यामुळे उच्चकुलीन मुस्लिम समाजाच्या व्यक्तींच्या मनात भीतीचे सावट निर्माण झाले. सय्यद अहमद खान आणि त्यांचे अनुयायी यांनी काँग्रेस सोडली. ब्रिटीश राज्यकर्त्यांनी त्या परिस्थितीचा त्वरीत फायदा ऊचलला. अलिगढ विद्यापीठाची स्थापना ही काँग्रेसला एक नवीन कलाटणी देणारी ठरली. कारण इ.स.१८८८ मध्ये लॉर्ड डफरीनने काँग्रेसला 'सूक्ष्मदर्शीय अल्पसंख्यांक' असे संबोधून सरकारी पाठींबा काढून घेतला.

लोकमान्य टिळक जे खंबीर राष्ट्रवादी होते त्यांनी जनतेकडून पाठींबा उभा करायचा असा निश्चय केला. त्यांनी मराठ्यांच्या गतकाळातील कामगिऱ्या अभ्यासल्या. तसेच दयानंद सरस्वती यांच्या आर्यसमाजाची पुनरुज्जीवनवादी कार्य आणि शिखांच्या सिंग सभेचे कार्य त्यांना माहित होते. त्यांना वाटे की, महाराष्ट्रातील जनतेस उद्युक्त करुन, कार्यप्रवण बनविले पाहिजे.

इ.स.१८९२ मध्ये लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सव सुरु केले. गणपतीची पूजा ही महाराष्ट्रीयन लोक घरातच खाजगीरित्या करीत. हा उत्सव हिंदू वर्षानुसार भाद्रपद महिन्यात म्हणजे ऑगस्ट-सप्टेंबरच्या मध्ये व शिवजयंती एप्रिल-मे च्या दरम्यान येते. शिवजयंतीच्या बाबतीत, म्हणावयाचे झाल्यास, महात्मा फुलेंनी शिवाजी महाराजांच्या समाधीची स्वच्छता, डागडुजी व पुनर्स्थापना इ.स. १८७६ मध्येच केली होती. त्यांनी शिवजयंती उत्सव सुद्धा प्रथमच साजरा केला व शिवाजी महाराजांच्या स्तुतीप्रित्यर्थ कुळवाडी भूषण नावाचा पोवाडा रचला. टिळकांनी

गणेश उत्सव व शिवजयंती हे दोन उत्सव इ.स.१८९० च्या दशकात सार्वजनिक केले व अत्यंत लोकप्रिय केले. लोकांनी एकत्रित करण्याची त्यांची ही योजना यशस्वी ठरली. लोकमान्यांनी शिवजयंती व गणेश उत्सव या दोहोंचा उपयोग राजकीय कारणांसाठी केला. तरुण वृद्ध स्त्री-पुरुष सर्वजणच उत्सवात सहभागी होऊ शकत होते, ज्याद्वारे जनजागृती सहज शक्य होती. लोकमान्यांवर धार्मिकतेला खतपाणी घातल्याचा आरोप झाला कारण मुंबईत हिंदू मुस्लिम दंगली उसळल्या. राष्ट्रवादाच्या पुनरुज्जीवनाऐवजी, 'द्विराष्ट्र सिद्धांतालाच' भविष्यात प्राधान्य मिळाल्याचे आपणास आढळते.

पुनरुत्थानकारांनी समाजाची नवीन तत्त्वांवर व विचारांवर मांडणी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सद्य परिस्थितीच्या आराखड्यात राहूनच काम करावयाचे ठरविले. एकोणिसाव्या शतकातील काही बदल व सुधार हे त्यांच्या पारंपारिक मूल्यांमधूनच वर आले होते. ते जरी पुरोगामी विचारांचे असले तरी, बहुतेक वेळेला, मूल्यमापनाच्या प्रसंगी कारणमिमांसेपेक्षा, पुराण तत्त्वांनाच जास्त महत्त्व द्यायचे. लोकमान्य टिळकांनी त्यांची सामाजिक तत्त्वे, नैतिकता आणि समाजसुधारणेसाठी आवश्यक दृष्टीकोन हा वेदीक तत्त्वज्ञान व प्राचीन परंपरांमधूनच घेतला होता.

म गांधींच्या नेतृत्वाचा उदय, गांधीजींच्या लोकचळवळी

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत म. गांधींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. टिळकांच्या मृत्यूनंतर १९२० पासून भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधीजींकडे आले व भारतीय स्वातंत्र्यलढा हा त्यांच्या व्यक्तिमत्त्व व कार्याभोवती केंद्रित झाला. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील गांधीजी ही एकमेव व्यक्ती होय की, जिचे नाव संपूर्ण भारतात व जगातील सर्व देशांतील जनतेपर्यंत जाऊन पोहोचले होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. स्वातंत्र्ययोद्धे समाजसुधारक, आधुनिक संत, सत्याग्रह तत्त्वज्ञानाचे प्रणेते, अहिंसेचे पुरस्कर्ते, शिक्षणतज्जा, राजकीय विचारवंत, अस्पृश्योद्धारक, धर्मचिंतक, अर्थतज्ज्ञ वगैरे. त्यांचा पिंडच मूलत गौतम बुद्ध, येशु ख्रिस्त, ज्ञानेश्वर, संत कबीर यांच्यासारख्या धर्मात्यांचा होता. ते उदारमतवादी धर्मसुधारकांच्या परंपरेतील होते. सत्य, अहिंसा, सत्याग्रहाच्या मार्गाने त्यांनी ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध दिलेला लढा हा मानव समाजाच्या इतिहासातील एक अपूर्व लगा मानावा लागेल. निर्मलकुमार बोस यांनी म्हटले आहे, 'भारतीय राजकारणात गांधीजींचा अवतार झाला नसता तर सशस्त्र क्रांतीच्या मार्गाकडे तरुण वळले असते यात शंकाच नाही. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांनी म्हटले होते, 'जी माणसे गांधीजींच्या प्रत्यक्ष सहवासात येतात त्यांनाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची थोरवी कळून येते. आपल्या सहवासातील सामान्य माणसांनाही वीर व हुतात्मे बनविण्याची आत्मिक शक्ती त्यांच्यात होती.' बाबा आमटे यांनी 'गांधीजी : एक युगमुद्रा' या लेखात म्हटले की, 'गांधीजींचे माहात्म्य सांगून गांधी सांगता येणार नाहीत. उद्याच्या पिढ्यांना त्यांची ओळख पटण्यासाठी कदाचित कॉम्प्युटर लागेल; पण काळाच्या भाळावर उमटलेली ही तप्त युगमुद्रा कोणत्याही इतिहासाला पुसून काढता येणार 'वैयक्तिक सत्याग्रह आंदोलनातील गांधीजींचे पहिले सत्याग्रही आचार्य विनोबा भावे पांच्या मते, 'भगवान बुद्धानंतर सत्य, अहिंसेचा एवढा मोठा पुजारी दुसरा झाला नाही.' बौद्रनाथ टागोरांनी म्हटले, 'असाधुतेशी साधुत्वाने कसे झगडावे याची शिकवण देणारा ॥ एक महामानव होता.' विज्ञानमहर्षी आल्बर्ट आईनस्टाईन गांधीजींबद्दल म्हणतो, डामांसाचा हा महामानव आमच्यात होता यावर पुढील पिढ्यांचा विश्वास बसणार नाही.' वाहरलाल नेहरूंच्या मते, 'गांधीजींनीच भारताला निर्भय बनविले.'

म. गांधींचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमध्ये पोरबंदर येथे झाला. आजोबा उत्तमचंद व वडील करमचंद हे अनुक्रमे पोरबंदर व राजकोट संस्थानांचे वियाण होते. सप्टेंबर १८८८ ते जून ९१ या काळात ते इंग्लंडमध्ये वकिलीच्या णासाठी गेले होते. इ.स. १८९१ मध्ये बॅरिस्टरची पदवी घेऊन आल्यानंतर मुंबई राजकोट येथे ते वकिली करू लागले; पण त्यांचा वकिलीत जम बसला नाही. पल १८९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील एका कंपनीच्या तेथील कोर्टात चाललेल्या खटल्यात वकिलाचा मदतनीस म्हणून ते गेले. तेथे त्यांच्या जीवनात फार मोठे परिवर्तन झाले. दक्षिण आफ्रिकेत जे भारतीय स्थायिक झाले होते त्यांच्याबाबत 'काळा- बारा' हा भेद केला जाई. नाताळ व ट्रान्सवाल सरकारने हिंदी लोकांना मतदानाचा हक्क दिला नव्हता व त्यांच्यावर कर लावले होते. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील द्विषाविरुद्ध लढा पुकारला होता. तेथे निग्रो व भारतीय यांचा तिरस्कार केला जात दक्षिण आफ्रिकेत दरबान या स्थळी इ.स.१९०४-१९०६ या काळात गांधीजींचे वास्तव्य होते. गांधीजींनी तेथे एक छापखाना सुरू केला. श्वेतवर्णीयांच्या

दडपशाहीविरोधातील त्यांची पत्रके, भित्तिपत्रके वा खास बुलेटिन याच छापखान्यात छापली जात. जवळपास न दशके गांधीजी दक्षिण आफ्रिकेत निग्रोंच्या परिसरात वावरत होते. खुद्द गांधीजींनी प्रथम श्रेणीच्या डब्यातून प्रवास केला म्हणून श्वेतवर्णीय रेल्वे अधिकाऱ्यांनी धक्के रून त्यांना खाली उतरवले होते. या घटनेतून त्यांना कृष्णवर्णीयांच्या हक्कांसाठी वा देण्याची स्फूर्ती मिळाली. गांधीजींनीच दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णीयांना आपल्या हक्कांची जाणीव करून दिली. गांधीजींनी हिंदी लोकांची बाजू घेऊन सत्याग्रह केला व सत्याग्रह लढ्यात यशही मिळवले होते. अहिंसात्मक सत्याग्रहाच्या शस्त्राला फार मोठे यश प्राप्त झाले होते. गांधींचा आत्मविश्वास वाढला होता. ९ जानेवारी १९९५ रोजी गांधीजी भारतात परत आले. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांना गांधीजींनी आपले गुरू मानले होते. ना. गोखले यांच्याच सल्ल्यानुसार गांधीजींनी इ.स. १९१५- १६ मध्ये देशभर दौरा केला. धोतर नेसणारे, काठेवाडी फेटा घालणारे, इंग्रजीऐवजी मातृभाषेतून बोलणारे, रेल्वेच्या तिसऱ्या वर्गातून प्रवास करणारे, गांधी भारतीयांना आपले वाटू लागले. भारतातील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे अवलोकन यांनी केले. इ.स. १९०१ च्या कलकता येथील अधिवेशनास गांधीजी प्रथमच उपस्थित होते.

**गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण :-**

गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वावर कोणतीही परंपरा व संप्रदाय, धर्मग्रंथ व धर्मगुरू यांची एकसुरी छाप दिसत नाही. अनेक ग्रंथ, धर्म, संप्रदाय यांच्यामधून त्यांनी काही विचार प्रेरणा व तत्त्वे आत्मसात केली होती. त्यांच्या व्यक्तित्वावर खालील प्रभाव दिसतात

१) हिंदू धर्मातील अध्यात्मवाद. २) बौद्ध, जैन व वैष्णव या पंथांतील भूतदया व नीतिमूल्ये जैन धर्मातील पंचतत्त्वे,
३) ख्रिस्ती धर्मातील मानवतावादी मूल्ये. ४) आईच्या व्रताचरणांचा प्रभाव.
५) भगवद्गीता, तुलसीरामायण या ग्रंथाचा प्रभाव.
६) गांधीजींचे वडील व आजोबा हे दोघेही विशुद्ध चारित्र्य, सचोटी, स्वामिनिषा व स्वाभिमान यासाठी प्रसिद्ध होते. सत्यनिष्ठा, संग्राहकता व व्यवहारकुशलता या गुणांचा वारसा त्यांना रक्तातूनच मिळाला होता.
७) थोरो, रस्कीन, टॉलस्टॉय यांच्या विचारांचा प्रभावही गांधीजींवर होता. रस्किन यांच्या 'Unto This Last' या ग्रंथाचा त्यांच्यावर प्रभाव होता. या पुस्तकात एखाद्या व्यक्तीचे भलेपण हे सर्वांच्या भलेपणातच असते हा संदेश आहे. या पुस्तकाचे गांधीजीनी 'सर्वोदय' या नावाने भाषांतरही केले. या पुस्तकामुळे माझ्या जीवनात रचनात्मक फेरफार घडवून आणला असे गांधीजी म्हणतात.

गांधीजी संसारी होते तरीही ते संन्यस्त वृत्तीने राहत. स्वतःला सनातनी हिदु म्हणवून घेत व सामाजिक सुधारणांचा पुस्कार करत. सत्यनिष्ठा, परमसहिष्णुता प्रामाणिकपणा, कणखरपणा, विनम्रपणा, आदर्शवाद, व्यवहारचातुर्य, शिस्तप्रियता, अस्पृश्यांबद्दल कळकळ इत्यादी गुण त्यांच्या अंगी होते. भारतीय जनतेला अंगभर कपडा माहीत नाही म्हणून ते पंचावर जगभर वावरले. गांधीजींनी लेख, भाषणे, मुलाखती, पत्रव्यवहार, छोट्या पुस्तिका इत्यादीद्वारे भरपूर लिखाण केले आहे. त्यांचे साहित्य स्फुट व संकीर्ण आहे. 'माझे सत्याचे प्रयोग' हे गांधीजींचे आत्मचरित्र अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. गांधीजींचे मन हे स्फटिकासारखे स्वच्छ व पारदर्शी होते त्यामुळे गांधीजींनी खासगी बाबीही आत्मचरित्रात लिहिल्या आहेत. गांधीजीना प्रत्येक कार्यात शेकडो-हजारो अनुयायी मिळाले. कारण उच्च प्रतीचे मानवी गुण त्यांच्या अंगी होते. आधुनिक लोकशाहीतील वृत्तपत्रांचे महत्त्व गांधीजींनी ओळखले होते म्हणूनच दक्षिण आफ्रिकेत 'Indian Opinion' व भारतात 'Young India, 'नवजीवन', 'हरिजन' ही वृत्तपत्रे त्यांनी स्वतःच्या संपादकत्वाखाली चालविली `Indian Opinion' हे पत्र १९०४ ला सुरू झाले. १९१४ पर्यंत गांधीजी प्रत्येक अंकात लिहित असत. गांधींनी आपले तत्त्वज्ञान या वृत्तपत्रांच्या माध्यमातून सार्वजनिक सभा, विविध कार्यक्रम, पत्रकारांना मुलाखती देऊन मांडले.

**गांधीजींच्या लोकचळवळी :-**

गांधीजींचा राजकीय क्षितिजावर एक नेता म्हणून जे उदय झाला त्यास प्रामुख्याने श्रीजीनी जे प्रारंभी सत्याग्रह केले ते कारणीभूत होते.

१) हिंदुस्थानातील मजुरांना मुदतबंदीचे करार करून फिजी बेटात (प्रशांत सागर) गोरे मळेमाळे शेतावर काम करण्यासाठी घेऊन जात. ही गुलामीची पद्धत व्हावी यासाठी गांधीजींनी प्रयत्न केले. ३१ मे १९१७ पूर्वी सरकारने ही पद्धत नाही केली तर सत्याग्रह करू, असे गांधीजींनी घोषित केले होते. एप्रिल १९१७ सरकारने ही पद्धत बंद नाही केली तर सत्याग्रह करू, असे गांधीजींनी घोषित होते. एप्रिल १९१७ मध्ये ही पद्धत सरकारने बंद केली. म. गांधींच्या सत्याग्रही अक्षाचा हा पहिला प्रयोग होता.

२) चंपारण सत्याग्रह (१९१७) बिहार प्रांतातील चंपारण जिल्ह्यात या लोकांनी निळीच्या मळयातून काम करण्यासाठी हिंदी मजुरांना ठेवून त्यांचे शोषण मोठ्या प्रमाणात चालविले होते. पुरुषांना १० पैसे तर स्त्रियांना ६ पैसे लहान मांना ३ पैसे एवढीच मजुरी होती. भारतीय शेतकऱ्यांवर नीळ पिकवण्याची सक्ती कली जाई. त्यावेळी युरोपियन मळेवाल्यांनी शेतकऱ्याबरोबर त्यांच्या जमिनीच्या तीन- णांश निळीची लागवड करण्याचे सक्ती करणारे करार केले होते. त्या करारांना कठिया पद्धत म्हणत. राजकुमार शुक्ल या स्थानिक नेत्यांनी गांधीजींची भेट घेऊन पानी चंपारणला यावे व त्या प्रश्नात लक्ष घालावे, अशी विनंती केली. गांधीजींनी मेद्र प्रसाद, ब्रिजकिशोर बाबू प्रसाद (बिहारी), महादेव देसाई व नरहरी पारिख (गुजरात) व जे. बी. कृपलानी, राजकिशोर प्रसाद, डॉ. अनुग्रह नारायण सिंह, रामनवमी प्रसाद, रामर्षीदेव प्रसाद या आपल्या सहकाऱ्यासोबत चंपारण भागातील क्यांना भेटी दिल्या, प्रत्यक्ष पाहणी केली, लोकांची निवेदने स्वीकारली. गांधीजींचे सर्व सहकारी इंग्लंडमधून बॅरिस्टर होऊन आले होते. गांधीजींनी 'तीनकथिया' पद्धत बंद करणे का आवश्यक आहे हे शासननियुक्त आयोगाला पटवून देण्यात यश ळविले. ही नीळ ठरलेल्या दरात ब्रिटिश मळेवाल्यांना विकण्याची सक्ती असल्याने लात शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असे. गांधीजींनी या मजुरांच्या मदतीस याचे ठरविले. त्याकाळी निळीच्या मळयात काम करणाऱ्या पुरुषाला १० पैसे वियांना ६ पैसे व मुलांना ३ पैसे मजुरी मिळे. गोऱ्या मळेवाल्यांच्या पाठीमागे सरकार हाते. म. गांधींना चंपारणमध्ये प्रवेश करण्यास मनाई होती. त्यांनी तो मनाई हुकूम मांडला. मनाई हुकूम मोडल्याबद्दल त्यांच्यावर खटला भरण्यात आला. या खटल्याने देशाचे लक्ष वेधून घेतले. म. गांधींनी आपण गुन्हा केल्याचे कबूल केले व त्याबद्दल आपणास शिक्षा द्यावी असी मागणीही केली. सरकारला लोकमताच्या दबावाखाली हा खटला काढून घ्यावा लागला. एवढेच नव्हे तर चंपारणमधील शेतकऱ्यांवर/मजुरांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी कायदाही करावा लागला. नीळ उत्पाद सक्ती रद्द करण्यात आली. चंपारण सत्याग्रह हा गांधीजींना मिळालेला दुसरा विजयी येथूनच त्यांच्या राजकीय जीवनास प्रारंभ झाला होता. चंपारणमध्ये गांधीजीनी गावशाळा सुरू केल्या. तसेच गावसफाई, गोशाळा, हिंदी प्रसार ही कामेही हाती पता

३) अहमदाबादेतील कापड गिरणी कामगारांचा संप अहमदाबादेती कापड गिरण्यांचे मालक कापड गिरणीतील कामगारांचे शोषण करत. अहमदाबा गिरणीमालक अंबालाल साराभाई हे गांधीजींचे मित्र होते. पण त्यांच्याही गिरणीतील कामगारांना अल्प पगार मिळे. कामाचे तासही जास्त होते हे मान्य केले गांधीजींनी या कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन उभे केले व त्यांना म्या मिळवून दिला. गांधीजींनी अहमदाबाद टेक्सटाईल असोशिएशन ही संस्था स्था केली. तिचे १४,००० कामगार सदस्य होते. कामगारांच्या वेतनवाढीच्या मागणी गांधीजींनी पाठिंबा दिला व कामगारांची गांधींच्या सल्ल्यावरून संप व उपोषणक गांधीजीही कामगारांबरोबर उपोषणास बसले. शेवटी गिरणी मालकांनी कामगारांची वेतनवाढीची मागणी मान्य केली. म. गांधीजींच्या हस्तक्षेपामुळेच अहमदाबादेतील गिरणी कामगारांचा संप होऊन कामगारांच्या वेतनात ३५ टक्के वाढ झाली. आंदोलनात अंबालाल साराभाईच्या भगिनी अनुसयाबेन या गांधींसोबत उपोषण बसल्या होत्या. या संपात वल्लभभाई पटेल, शंकरलाल बँकर, अनुसया काळे यांचा सहभाग होता.

४) गुजरातमधील खेडा सत्याग्रह: गुजरातमधील खेडा जिल्ह्यात दुष्काळामणे चार आणे किंवा त्याहूनही कमी उत्पन्न आले. कायद्यानुसार शेतकऱ्यांना माफी देणे बंधनकारक होते. दुष्काळ असतानाही सरकारने शेतसारा माफी दिली नाही. सरकार सक्तीने सारा वसूल करते होते. गांधीजींनी शेतकऱ्यांना शेतसारा न भरण्याचा सर दिला. सरकारच्या दडपशाहीला न भिता गांधीजींनी सत्याग्रही आंदोलन चालू ठेवत गांधीजींच्या अध्यक्षतेखाली 'गुजरात सभेने' या आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली वल्लभभाई पटेल, विठ्ठलभाई पटेल, इंदुलाल याज्ञिक, शंकरलाल बँकर, अनुसया यांनी गांधीजींसमवेत अनेक खेड्यांना भेटी दिल्या होत्या व परिस्थिती जाणून घेतली होती. शंकरलाल बँकर,

अनुसयाबाई काळे, महादेव देसाई हे पण या सत्याग्रही होते. वल्लभभाई पटेल हे त्यावेळचे एक विख्यात वकील होते. प्रारंभी ते गांधीजी टीकाकार होते. परंतु खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ज्या धैर्याने व कणखरपणे लबा लढविला ते पाहून ते प्रभावित कणखरपणे लढा लढविला ते पाहून ते प्रभावित शाले व गांधीजींचे अनुयायी बनले. नंतर त्यांना वकीली करावयास वेळच मिळाला नाही लाठीमार, घरादाराची जप्ती व तुरुंगवास शेतकऱ्यांना सहन करावा लागला. शेवटी सरकारलाच माघार घेऊन शेतकऱ्यांची सारामाफीची मागणी मान्य करावी लागली म. गांधींनी जे प्रस्तुत सत्याग्रह प्रारंभीच्या काळात हाती घेतले त्याचे महत्त्व नलिनी पंडित यांनी 'गांधी' या ग्रंथात पुढील शब्दांत मांडले आहे. त्या म्हणतात.

भारताच्या राजकारणात गांधींचा प्रवेश होण्यापूर्वी येथील राजकारण मध्यमवर्गाच्या घुटमळत होते. शेतकरी, कामगार, दलित, स्त्रिया असे सर्व गट परिघाच्या कहर राहिले होते. चंपारण, खेडा, अहमदाबाद येथील अनुभवानंतर गांधीजींच्या त्वाखाली चालणाऱ्या चळवळींमधून आपल्या गाऱ्हाण्यांची दाद घेतली जाईल, अशी मागासलेल्या गटांना प्रथम आशा वाटू लागली आणि तिच्यामधून एका माज्यशाहीविरोधी आघाडीच्या उभारणीची पूर्वतयारी झाली. या ३ आंदोलनाद्वारे धीजींनी भारतीय जनतेसमोर चळवळ करण्याची पद्धती व रीत मांडली. शोषित, गरीब व कामगार यांच्या हक्कासाठी झगडणारा एक नेता अशी गांधीजींची एक प्रतिमा १॥ १९१७ पूर्वीच निर्माण झाली होती.'

चंपारण, अहमदाबाद व खेडा या आंदोलनाद्वारे गांधीजींच्या रूपाने एक समृद्ध त्व पुढे आले. 'गांधी म्हणजे स्थानिक प्रश्न हाती घेऊन त्याबद्दल ठोस पावले बबलणारा' अशी त्यांची ख्याती पसरली. भारतीय जनतेच्या समस्यांचा जवळून ध्यास करण्याची संधी त्यांना मिळाली. भारतीय जनतेची बलस्थाने व कमकुवत बाबी त्यांच्या लक्षात आल्या. वरील तिन्ही आंदोलनामुळे ग्रामीण भागातील व शहरातील गरिबांचे हितकर्ते व नेते म्हणून गांधीजी ओळखले जाऊ लागले. गांधीजी पूर्णपणे जनसामान्यांच्या जीवनाशी एकरूप झाले होते. ते लोकांशी त्यांच्या भाषेत बोलत आणि लोकांना प्रामाणिकपणे व निर्भयपणे जगण्याचं प्रशिक्षण देत.

**२) असहकार चळवळ**

**काँग्रेसचे कोलकाता येथील अधिवेशन व असहकाराचा ऐतिहासिक ठरावः -**

जानेवारी १९२० रोजी कोलकाता येथे राष्ट्रीय काँग्रेसचे लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन भरले. या खास अधिवेशनात गांधीजींनी असहकाराचा ठराव मांडला. स्वराज्याचे हक्क मिळवण्यासाठी राज्यकर्त्यांशी असहकार पुकारावयाचा हे या ठरावाने निश्चित केले. त्यात या असहकाराचे स्वरूपही निश्चित केले गेले होते. उदा. ब्रिटिश मालावर बहिष्कार, सरकारी कार्यक्रमांवर बहिष्कार, कायदे मंडळाच्या निवडणुकांवर बहिष्कार, सरकारी शाळा महाविद्यालयांवर बहिष्कार, सरकारी न्यायालयांवर बहिष्कार वगैरे.

**नागपूर अधिवेशन (डिसेंबर १९२०) :-** डिसेंबर १९२० मध्ये काँग्रेसचे नियमित वार्षिक अधिवेशन नागपूर येथे भरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष सी. विजय राघवाचार्य हे होते. नियमानुसार खास अधिवेशनात पास शालेल्या त्या ठरावावर वार्षिक अधिवेशनात चर्चा होणे आवश्यक होते. या अधिवेशनात उपस्थित प्रतिनिधींची संख्या १४५८२ होती. त्यापैकी १०५० मुस्लिम तर १६९ खी प्रतिनिधी होते. हे अधिवेशन अनेक अर्थाने वादळी व महत्त्वाचे होते.

१) काँग्रेस संघटनेत इ.स. १९२० मध्ये गांधीजींना अग्रस्थान प्राप्त झाले व ते पुढे २०-२५ वर्षे टिकून राहिले.

२) बॅ. जीना, मदनमोहन मालवीय, ॲनी बेझंट, बिपिनचंद्र पाल तसेच हि अनुयायी खापर्डे, अणे, मुंजे इत्यादी नेत्यांचा असहकार चळवळीस विरोध असतानाही असहकार चळवळ सुरू करण्याबाबतचा ठराव या अधिवेशनात मंजूर झाला होता अधिवेशनास उपस्थित असलेल्या ब्रिटिश मजूर पक्षाच्या तीन प्रतिनिधींनी अशक कार्यक्रमाबाबत प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त केली होती.

३) काँग्रेस संघटना ही अधिक व्यापक, बलशाली व क्रियाशील बनविण्याचा प्रयत्न झाला. त्यासाठी खालील निर्णय घेतले गेले.

अ) भाषिक तत्त्वावर आधारलेल्या २१ प्रांतिक संघटना स्थापन करण्यात आ महाराष्ट्रातही एक, मध्य प्रांतासाठी नागपूरला एक, विदर्भासाठी अमरावती येथे व शहरासाठी १ अशा चार प्रांतिक काँग्रेस कमिट्या स्थापन करण्यात आल्या होत्या. न केळकर हे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष बनले होते, तर शंकरराव देव चिटणीस होते

ब) अ. भा. काँग्रेस समितीत ३५० सदस्य राहतील. या केंद्रीय समितीसाठी प्रत्येक प्रांतातर्फे किती सदस्य राहतील हेही निश्चित केले गेले होते.

क) महत्त्वाच्या सर्व मुद्यांवर निर्णय घेण्याचा अधिकार अ. भा. काँग्रेस समितीला होतादैनंदिन कामकाज चालविण्यासाठी या केंद्रीय समितीतून १५ निर्वाचित सदस्यांची कार्यकारी समिती स्थापन करण्याचे ठरले होते.

ड) भारतीय काँग्रेस समितीचे मुख्य कार्यालय अलाहाबाद येथे राहील. वार्षिक अधिवेशनापूर्वी दोन-तीन दिवस विषय नियामक समितीची बैठक घेतली जाऊन अधिवेशनात चर्चेकरिता येणारे ठराव निश्चित केले जावेत तसेच विषय नियामक समितीत अ. भा. काँग्रेस समितीने निवडलेले सदस्य असावेत अशा प्रकारची काँग्रेसची घटना था अधिवेशनात निश्चित करण्यात आली होती.

नागपूरचे अधिवेशन काँग्रेस चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरती काँग्रेस जी आजपावेतो फक्त शहरात होती, सुशिक्षितांपुरतीच मर्यादित होती; परंतु आता खेड्यापाड्यांत जाण्याची प्रक्रिया सुरू झाली. आपण हिंदुस्थानला एका वर्षात स्वराज्य थे। अशी जी घोषणा गांधीजी करीत होते त्यावर या अधिवेशनात शिक्कामोर्तब झाले. या अधिवेशनानंतर काँग्रेसच्या सर्व नेत्यांनी देशाच्या विविध भागांत दौरा करून असहकार कार्यक्रमाचे महत्त्व व स्वरूप स्पष्ट केले. नागपूर अधिवेशनानंतर प्रांताप्रांताचे काँग्रेस कार्यकर्ते काँग्रेसच्या नव्या घटनेनुसार प्रांतिक, जिल्हा आणि तालुका काँग्रेस समित्यांची पुनर्रचना करण्याच्या कामात गुंतले. असहकाराच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातून स्वयंसेवकाची नोंदणी करण्यात आली. ५० लक्ष स्वयंसेवकांची नोंदणी देशभरात झाली होती. १ कोटी रुपयांचा स्वराज्य फंड जमा करण्याचा संकल्प लवकरच पूर्ण झाला १९२०-२१ मध्ये गांधीजीनी पगडीऐवजी 'टोपी' वापरण्यास सुरुवात केली. ती 'गांधी टोपी' म्हणून ओळखली जाऊ लागली. गांधीजींच्या शेकडो अनुयायांनीही 'गांधी टोपी' वापरण्यास प्रारंभ केला.

**असहकार चळवळीचा कार्यक्रम :-**

४ सप्टेंबर १९२० रोजी कोलकाता येथे भरलेल्या काँग्रेसच्या विशेष अधिवेशनात कार चळवळीच्या कार्यक्रमावर शिक्कामोर्तब करण्यात आले. असहकार चळवळीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे होता.

**अ) असहकार चळवळीतील नकारात्मक कार्यक्रम :-**

1) ब्रिटिश सरकारने दिलेल्या पदव्या, मानसन्मान यांचा त्याग करणे. परदेशी वस्तूंवर बहिष्कार टाकणे.
2) सरकारी सभा, कार्यक्रम, दरबार समारंभ आदींवर संपूर्णपणे बहिष्कार टाकणे.
3) ब्रिटिशप्रणीत शाळा-कॉलेजांवर बहिष्कार टाकणे.
4) ब्रिटिश न्यायालयांवर बहिष्कार टाकणे.
5) इ.स.१९१९ च्या कायद्यानुसार अस्तित्वात येणाऱ्या प्रांतिक कायदे मंडळावर जनतेने बहिष्कार टाकावा व कोणीही मतदान करू नये.
6) ब्रिटनहून कोणताही अधिकारी किंवा पाहुणा आल्यास त्याच्या स्वागत समारंभावर भारतीय जनतेने बहिष्कार टाकावा.
7) इंग्लंडने मेसोपोटोमियात जी लष्करी भरती सुरू केली आहे त्यावर बहिष्कार टाकावा.
8) सरकारी नोकऱ्यांचा त्याग करणे.
9) स्थानिक स्वराज्य संस्था, कायदा मंडळे यांचे त्यागपत्र देणे.

**ब) असहकार चळवळीतील सकारात्मक/विधायक कार्यक्रम :-**

असहकार चळवळीचे सकारात्मक/ विधायक स्वरूपही होते. नकारात्मक कार्यक्रमांशिवाय खालील स्वरूपाचा विधायक कार्यक्रमही गांधीजींनी घोषित केला होता.

१) स्वदेशी मालांचा वापर करावा.

२ ) हिंदू-मुस्लिम ऐक्य.

१) अस्पृश्यता निवारण.

४) स्थानिक पातळीवर लवाद मंडळे स्थापन करून त्यांच्यामार्फत लहानसहान वादग्रस्त मुद्यांचा निकाल लावणे.

५) स्वदेशी उद्योगास प्रोत्साहन, विशेषतः हातमाग व्यवसायाचे पुनरुज्जीवन करणे.

६) दारूबंदीचा प्रसार करणे.

७) लोकमान्य टिळकांच्या स्मरणार्थ एक कोटी रुपये निधी जमा करणे.

८) राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना करणे.

९) खादीचा प्रसार प्रारंभ स्वतःपासून केला.

स्वतः गांधींनी 'कैसर हिंद' ही पदवी ब्रिटिशांना परत दिली व या असहकार चळवळीचा असहकाराच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणजे वकिलांनी आपल्या वकिलीचे त्यागपत्र द्यावे हा होता. पं. मोतीलाल नेहरू, सैफुद्दीन किश्चलू, टी. प्रकाशन, आसफ अली, में, सी आर. दास, सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद, सी. राजगोपालाचारी यांनी वकीली सोडून हकारी रुपयाच्या उत्पन्नावर पाणी सोडले. काहींनी वर्षभर न्यायालयात जाणे बंद केले हो अण्णासाहेब भोपटकर (पुण्यातील अग्रगण्य वकील) यांनी मात्र न्यायालयात जाणे चालूच ठेवले. एक वर्षापुरती ज्यांनी वकिली सोडली त्यात वासुदेवराव दास्ताने (भुसावळ), कुलाब्याचे गोसावी, बॅ. जयकर, सातारचे अष्टपुत्रे, सोलापूरचे रामचंद्र राजवाडे, यवतमाळच अब्दुल सैफ, दामोदरपंत गद्रे वगैरेंचा समावेश होता.

टिळक स्वराज्य फंड ३० जून १९२१ पूर्वी एक कोटी रु. चा स्वराज्य गोळा करावा व १ कोटी लोकांना काँग्रेसचे सभासद करून घ्यावे असे ठरले होते. संकल्प सिद्धीला गेला. हा टिळक स्वराज्य फंड ठरलेल्या मुदतीत पूर्ण व्हावा म्हणून गांधींनी एप्रिल १९२१ मध्ये गुजरात व सिंध प्रांताचा दौरा केला होता. शंकरलाल बंकर, जमनलाल बजाज, उमर सोमाणी वगैरेंनी मुंबईतील धनाढ्य व्यापाऱ्यांच्या मदतीने देणग्या रूपात ३६ लाख रु. मिळविले. मुंबई शहरातून देणगीच्या रूपाने लाखो रुपये मुख्यत मारवाडी, मुसलमान व पारशी व्यापाऱ्यांच्या दातृत्वामुळे मिळाले. मुंबईतील मराठी भाषिक असलेले गिरणी कामगार, कारकून, शिक्षक यांच्याकडून लहान लहान रकमेची देणगी घेण्यात आली. बॅ. जयकर यांनी २५,००० रु. एकरकमी देणगी दिली. काही नाटक कंपन्यांनी नाटके सादर करून पैसा दिला. हा फंड उभा करण्यासाठी गांधीजींनी मुंबई उपनगरांत ठिकठिकाणी सभा घेतल्या होत्या. खालील ५ कामे काँग्रेसजनांनी निष्ठेने था। पाडली तर स्वराज्य दृष्टिपथात येईल असा विश्वास गांधीजींना वाटत होता. १) अस्पृश्यता निवारण २) दारूबंदी ३) खादी ४) काँग्रेसच्या सभासदांची नोंदणी ५) टिळक स्वराज्य जमविणे.

परदेशी कपड्यांवर बहिष्कार २ जुलै १९२१ पासून ही मोहीम हा घेण्यात आली. गांधीजी मुंबईतील गिरणी मालकांना भेटून तेथील गिरण्यांचे मालक परदेशी कपड्यांवर बहिष्कार टाकल्यानंतर कपड्यांच्या किमती वाढवून लुटणार नाहीत तमेव विदेशी गिरणी मालकांकडून अभिवचन घेत होते; पण गांधीजींना हवे असलेले लेखा अभिवचन फारच थोड्या गिरणी मालकांनी व कापड व्यापाऱ्यांनी दिले.

२८ ते ३० जुलै १९२१ रोजी मुंबईत अ.भा. काँग्रेस महासमितीची बैठक भरली. १९ जुलै रोजी गांधीजींनी उमर सोमाणींच्या मालकीच्या एल्फिन्स्टन मिलच्या आवारात परदेशा कापडांची होळी पहिल्यांदा पेटविली. त्यावेळी अ.भा. काँग्रेस समितीचे बैठकीसाठी आलेले सर्व सभासद हजर होते. पुढे ९ ऑक्टोबर १९२१ रोजी याच जागी गांधीजीनी विदेशी कापडांची होळी केली होती; पण यावेळेस गांधीजींनी काठेवाडी पद्धतीच्या पोशाखामा त्याग केला होता व पंचा घालून ते आता वावरत होते. कोट्यवधी गरीब देशबांधवांच्या अंगावर पुरेसे कपडे नाहीत म्हणून गांधीजीही अर्धे अंग उघडे टाकून थंडी वाऱ्यांत वावरू ब्रिटिश पंतप्रधान यांनी गांधीजींना 'अर्धनग्न फकीर' असे म्हटले होते. पुढे ब्रिटनचे युवराज

आठवे एडवर्ड मुंबईत आले तेव्हा मुंबईत एल्फिन्स्टन दालनात तिसऱ्यांदा विदेशी कपड्याला आग लावण्याचा कार्यक्रम गांधीजींच्या उपस्थितीत पाडला तेव्हा २५,००० लोकांची उपस्थिती होती.

शाळा-कॉलेजवर बहिष्कार सरकारी शाळांवर बहिष्कार व राष्ट्रीय शाळा- विद्यालयांची स्थापना हा असहकार चळवळीचा एक कार्यक्रम होता. त्यालाही उत्तम बाद मिळाला. इ.स. १९२०-२१ च्या असहकार चळवळीत ज्यांनी महाविद्यालयीन ण सोडले व नंतर राष्ट्रीय शाळांत अध्यापन केले अशा तरुणांमध्ये शंकर जावडेकर, ॥ भागवत, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, काका कारखानीस, स.का. पाटील, वि.प्र. . गो.आ. देशपांडे हे होत. पुढे कम्युनिस्ट वळवळीत उतरलेले रघुनाथ निंबकर, ताराम मिरजकर, श्रीपाद अमृत डांगे, देशपांडे मास्तर हे तरुणही असहकार चळवळीत आले होते. फेब्रुवारी १९२१ मध्ये मुंबईतील मारवाडी विद्यालयात राष्ट्रीय महाविद्यालय करण्यात आले. डिसेंबर १९२१ मध्ये पुण्यात टिळक महाविद्यालय हे राष्ट्रीय विद्यालय म्हणून सुरू करण्यात आहे होते. महाराष्ट्रात वेंगुर्ला, मालवण, रत्नागिरी, तारा, अहमदनगर, येवला, अमळनेर, चिंचवड वगैरे ठिकाणी राष्ट्रीय शाळा काढण्यात चा. यवतमाळ, अकोला, खामगाव, नागपूर येथेही राष्ट्रीय शाळा निघाल्या. राष्ट्रीय तिल्या आणि महाविद्यालयांच्या शिक्षकांमधून आणि विद्यार्थ्यांमधून महाराष्ट्राचे नवे उदयास आले.

असहकाराच्या कार्यक्रमात फेरफार करावा असा अप्पासाहेब केळकर, बॅ. जयकर, मुंजे वगैरेंचा आग्रह होता; पण त्यांची ही सूचना गांधीजींचे नेतृत्व मान्य करणाऱ्या संख्य काँग्रेसजनांना मान्य नव्हती. टिळकांच्या मृत्यूनंतर गांधींचे नेतृत्व मान्य करून या असहकाराचा कार्यक्रम मनापासून अमलात आणण्यास तयार झालेल्या टिळकांच्या बायांत शिवरामपंत परांजपे, काकासाहेब खाडिलकर, गंगाधरराव देशपांडे, वासुकाका बी, हरिभाऊ देशपांडे, चिंतामणराव वैद्य यांचा समावेश होता. गांधी युगाने महाराष्ट्रातील प्रभाव कमी झाला.

**असहकार चळवळीची कामगिरी/परिणाम /महत्त्व :-**

ब्रिटिश गव्हर्नर जनरल चेम्सफोर्ड यांनी म्हटले, 'गांधीजींच्या अनेक योजनांपैकी यांनी सुरू केलेले असहकारितेचे आंदोलन सर्वात अधिक मूर्खपणाचे होते.' चेम्सफोर्ड हे मत चुकीचे आहे. हे आंदोलन अयशस्वी झाले असले तरी भारतीय स्वातंत्र्य पळीत त्यास महत्त्वाचे स्थान आहे. असहकार आंदोलनाची घोषित उद्दिष्टे / कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी झाला नाही.

१) जनतेत राष्ट्रीय जागृती शहरी तसेच ग्रामीण भागातही या आंदोल राष्ट्रीय जागृती निर्माण होण्यास मदत झाली. सामान्य जनता नव्या ध्येयवादाने, राष्ट्र भारावून गेली. राष्ट्रासाठी आपण काही तरी करू शकतो असा अभिमान व आत्मि भारतीय जनतेत निर्माण झाला. या चळवळीने काय मिळविले या संदर्भात विपि म्हणतात, 'भारतीय शेतकरी कामगार, कारागीर, दुकानदार, व्यापारी, व्यावसायिक मध्यमवर्गीय अशा विविध वर्गामध्ये राष्ट्रीय काँग्रेस पोहचली होती. चळवळीची संपूर्ण देशभर परसरली होती. काही प्रदेश अन्य प्रदेशांपेक्षा अधिक सक्रिय होते, निष्क्रिय असा एकही प्रदेश नव्हता.' डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी म्हटले, 'ब्रिटिशांचे भारणी संबंध प्रस्थापित झाल्यापासून इतका उत्साह आणि निर्धार जनतेमध्ये पूर्वी कधीहश्रून आला नाही. या दीर्घकाळात जनतेने इतकी देशसेवा पूर्वी कधीच केली नाही. जनतेला आपल्या कर्तृत्वाबद्दल इतका आत्मविश्वास पूर्वी कधीच वाटला नव्हता.' जनतेतील म नाहीशी होऊन जनतेत नवा उत्साह निर्माण झाला.

२) तरुण वर्ग राष्ट्रकार्याकडे आकर्षिला गेला गांधीजी, नेहरू पितापुर विठ्ठलभाई पटेल, बॅ. दास, वल्लभभाई पटेल, राजेंद्रप्रसाद वगैरे नेत्यांचा आदर्श, क तरुण वर्गापुढे निर्माण झाल्याने राष्ट्रकार्यासाठी आपले जीवन समर्पित करण्याचा निर्णय तरुणांनी घेतला.

३) सनदशीर चळवळीचे पर्व संपून सक्रिय जनआंदोलनाचे पर्व सुरू झाले काँग्रेस तिच्या स्थापनेपासूनच सनदशीर मार्गाने स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करीत होती. कोषध वार्षिक अधिवेशनात ठरावीक स्वरूपाच्या मागण्या (सामाजिक, आर्थिक व प्रशासकी केल्या जात असत. परंतु सर्वसामान्य जनता मात्र काँग्रेस आंदोलनापासून आतापावेतो होती. गांधीजींच्या असामान्य नेतृत्वात जनतेला राष्ट्रीय चळवळीत ओढण्याची कि होती. काँग्रेस स्वयंसेवक दलाची

सदस्यसंख्या ५० लाखांपर्यंत पोहोचलेली होती. भा स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात एवढे मोठे जनआंदोलन प्रथमच घडून आले होते.

४) गांधीजींचे नेतृत्व पुढे आले असहकार चळवळीचा गांधीजींनी भारती जनतेपुढे ठेवलेला कार्यक्रम व असहकार चळवळीचे केलेले नेतृत्व, त्या चळवळी त्यांनी केलेले प्रचार दौरे यामुळे गांधीजींचे नेतृत्व पुढे आले. १०/३/१९२२ ते २०/१/ १९२२ या काळात साबरमती येथे तर २१/३/१९२२ ते ११/१/१९२४ या का येरवडा (पुणे) येथे ते तुरुंगात होते. गांधीजींच्या जनमानसावर पडलेल्या प्रभावाचे वर्णन करताना पं. जवाहरलाल नेहरू म्हणतात, 'असामान्य व्यक्तिमत्त्व असत गांधीजी भारतातील लक्षावधी लोकांना स्फूर्ती देत होते. ते लोकांचे श्रद्धास्थान बनले हो सर्वसामान्य जनताच नव्हे तर अनेक बुद्धिमंत गांधींच्या कार्यक्रमाकडे आकृष्ट झाले केवळ गांधींनी राष्ट्रीय आंदोलनास दिलेल्या नैतिक अधिष्ठानामुळे व त्यांनी पुरस्क केलेल्या तंत्राचे औचित्य पटल्यामुळे.' इ.स. १९२०-२२ च्या आंदोलनामुळे गांधीजींचे नवे नेतृत्व पुढे आले. ते इ.स. १९४७ पर्यंत स्वातंत्र्य चळवळीचे सवर्वोच्च नेते होते. धीमीच्या या नेतृत्वाची पायाभरणी असहकार आंदोलनाने केली यात शंकाच नाही.

५) ब्रिटिश सरकारच्या धोरणात बदल असहकार आंदोलनामुळे जनतेवर पशाही, जुलूम करणे मूर्खपणाचे ठरेल हे आता ब्रिटिशांच्या लक्षात आले. आंदोलनाच्या ५०,००० लोकांना अटक झाली होती. तुरुंगाची भीती जनतेच्या मनात राहिली सरकारने आता आपल्या धोरणात बदल करून उदारमतवादी दृष्टिकोन स्वीकारला इ.स. १९१९ च्या कायद्याची अंमलबजावणी तात्काळ सुरू केली. ६) काँग्रेसचे महत्त्व / प्रतिष्ठा वाढली: इ.स. १९२० चा लढा हा काँग्रेसचा अधिकृत कार्यक्रम असल्याने काँग्रेसचे महत्त्व वाढले. गांधीजींच्या आगमनापूर्वी राष्ट्रीय वळ ही उच्चवर्णीय, सुशिक्षित मध्यमवर्गाची मिरासदारी होती. पण इ.स. १९२०-२२ या असहकार चळवळीने हे चित्र पूर्णपणे पालटले. गांधीजींनी सुशिक्षितांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली. विधायक कार्याच्या निमित्ताने त्यांनी कार्यकर्त्यांना खेड्यात मामले. राष्ट्रीय चळवळीचे लोण चरख्याच्या माध्यमातून खेड्यापर्यंत पोहोचविण्याचे काम कविस कार्यकर्त्यांनी इ.स. १९२३ नंतर केल्याने काँग्रेसचे महत्त्व वाढले. काँग्रेसचे नाव धांत शहरांत-गरिबांच्या झोपडीपर्यंत जाऊन पोहोचले. सुभाषचंद्र बोस म्हणतात, .स.१९२१ या वर्षाने देशाला एक सुव्यवस्थित आणि सुसंघटित पक्ष (काँग्रेस) दिला. यापूर्वी काँग्रेस एक घटनात्मक तसेच चर्चा करणारी संस्था होती. गांधीजींनी काँग्रेसला एक नवीन घटना देऊन तिला राष्ट्रव्यापी बनविले. गांधीजींनी काँग्रेसला एका क्रांतिकारी संघटनेत परावर्तीत केले. खादी हा सर्व काँग्रेसवाल्यांचा पोशाख बनला.'

७) देशी उद्योगधंद्यांना प्राधान्य या आंदोलनामुळे विदेशी मालांवर बहिष्कार माकून स्वदेशी वस्तूंचा वापर करण्याची गरज भारतीय जनतेला पटली. याचा परिणाम महणून देशी उद्योगांना प्रोत्साहन मिळाले. देशी वस्तूंच्या दर्जातही वाढ झाली व देशी वस्तूंचे उत्पादन व खप यामुळे बेकारीही कमी होण्यास मदत झाली.

८) गांधीजींनी असहकार चळवळ थांबविल्याने काहीतरी करू इच्छिणारे तरुण सशस्त्र क्रांतिकार्याकडे वळले.

९) विधायक कार्यास प्रारंभ असहकार चळवळीमुळे अस्पृश्यता निवारण, दारूबंदी प्रसार, खादीचा प्रसार इत्यादी अनेक विधायक कार्याचा प्रारंभ झाला.

१०) पदव्या व मानसन्मान याबद्दल तिरस्कार ब्रिटिश सरकार सार्वजनिक जीवनात कार्य करणाऱ्या व्यक्तीला पदव्या, मानसन्मान, कैसर-ए-हिंद, सर, रावबहादुर, (रावसाहेब) देत असे. असहकार चळवळीच्या काळात गांधींसह अनेक नेत्यांनी या पदव्या, मानसन्मान ब्रिटिशांना परत दिल्याने इ.स. १९२० नंतर या पदव्या व मानसन्मानाबद्दल आता भारतीयांना आकर्षण तर राहिलेच नाही, उलट अशा व्यक्ती भारतीय स्वातंत्र्याचा शत्रू समजून त्यांची समाजात अवहेलना होऊ लागली.

११) भारतीय राष्ट्रवादाला गती मिळाली इ.स. १९२० च्या असहकार चळवळीने राष्ट्रवादास चांगली धार प्राप्त झाली. पं. नेहरूंनी म्हटले आहे, movement put a new life into Indian nationalism' राष्ट्रीय चळवळ ही आता जनतेची चळवळ बनली. या चळवळीमुळे अनेक नेते व कार्यकर्ते यांचे एक मोहळच तथा झाले. १९ व्या शतकाच्या अखेरीस जो राष्ट्रवाद होता त्याच्या तुलनेत इ.स. १९२० व नंतरच्या काळातील राष्ट्रवाद हा अधिक प्रखर व उग्र होता हे नक्की. बिपिनचंद्र यांच्या मते, 'भारतीय लोकांची भयाची भावना नष्ट झाली हा असहकार चळवळीचा एक प्रमुख परिणाम होता.

भारतातील ब्रिटिश राजवटीच्या पाशवी शक्तीचे त्यांना भय वाटेनासे झाले त्यांनी आता आत्मविश्वासाची व आत्मसन्मानाची फार मोठी भावना आत्मसात केली होली असहकार चळवळीच्या यशापयशाबद्दल डॉ. आर. सी. मुजुमदार लिहितात, It is neither a complete success nor a complete failure, and the truth how between the two,' अ. भा. काँग्रेस समितीने मोतीलाल नेहरू, राजगोपालाचारी, एम. ए. अन्सारी वगैरेंचा समावेश असलेली एक समिती या चळवळीचे यशापयश जाणून घेण्यासाठी नेमली होती. या समितीने प्रत्यक्ष मुलाखतीच्या आधारे या चळवळीचे फायदे खालीलप्रमाणे सांगितले.

१) राजकीय हक्कांबाबत जनतेच्या मनात जागृती निर्माण झाली.

२) सरकारवरील लोकांचा विश्वास उडाला.

३) काँग्रेस ही देशाच्या स्वातंत्र्यासाठी झटणारी एकमेव संस्था आहे असा विश्वास
लोकांच्या मनात निर्माण झाला.

४) स्वातंत्र्यप्राप्तीसाठी खूप प्रयत्न करण्याची गरज आहे. डॉ. आर. सी. मुजुमदार यांनी असहकार चळवळीमुळे काँग्रेस ही खऱ्या अर्थाने 'Mass Organization व 'Genuine Revolutionary Organization' झाली अशी दोन वैशिष्टो या चळवळीची सांगितली आहेत व ती सर्वार्थाने खरीही आहेत. गोविंद तळवळकर 'सत्तांतर १९४७ भाग १' या ग्रंथात लिहितात, 'मग गांधींच्या या चळवळीने काय साधले ? तिची प्रमुख उद्दिष्टे बिलकूल साध्य झाली नाहीत; पण साम्राज्य सत्तेविरुद्धचा लढा राष्ट्रव्यापी बनला. जे समाजघटक पूर्वी दूर होते ते या लढ्यात ओढले गेले. प्रांतोप्रांती नवे नेतृत्व निर्माण होऊन लोकांत बरीच निर्भयता आली.' अण्णासाहेब भोपटकर यांनी त्यांच्या लोकसंग्रह पत्रातून असहकारिता चळवळीवर टीका केली होती. ग. प्र. प्रधान 'स्वातंत्र्यसंग्रमाचे महाभारत' या ग्रंथात म्हणतात, 'इ.स. १९२० असहकाराच्या चळवळीमुळे स्वातंत्र्यलढ्यास नवे तेज प्राप्त होऊन या लढ्याचे पाऊल पुढे पडले. हे या चळवळीचे मोठे योगदान होते.' बाबू चित्तरंजन दास यांच्या मते, 'या चळवळीमुळे आपल्या विशाल देशातील सर्व भागात आणि लोकांच्या सर्व स्तरामध्ये जी राजकीय जागृती झाली तिचा विचार केला तर यशस्वी झाली, असेच म्हणावे लागेल.' फेब्रुवारी १९२२ मध्ये चौरीचौरा येथील नंतर गांधीजीनी हे आंदोलन स्थगित केले. या घटनेचे वर्णन सुभाषचंद्र बोस यांनी कैलेंमिटी' या शब्दात केले होते.

**३) सविनय कायदेभंग व महाराष्ट्र लाहोर अधिवेशन (इ.स. १९२९) :-**

११ डिसेंबर १९२९ रोजी लाहोर येथे रावी नदीच्या काठी काँग्रेसचे अधिवेशन भरले. जवाहरलाल नेहरू या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. जहाल व समाजवादी विचारांचे नेहरू अधिवेशनाचे अध्यक्ष झाल्याने काँग्रेस सदस्यांत उत्साह निर्माण झाला. या अधिवेशनाला १५००० लोकांची उपस्थिती होती. नेहरूंनी त्यांच्या भाषणात जगात ठिकठिकाणी सुरू असलेल्या साम्राज्यवादविरोधी लढ्याचा उल्लेख करून भारतातील काँग्रेसचा लढा हा कणातील वसाहतवादविरोधी लढ्यांचा एक भाग आहे असे म्हटले. क्रांतिकारकांचा हिंसाचार अषित नाही असे त्यांनी म्हटले व त्यांच्या अपूर्व त्यागाबद्दल त्यांनी शोकसंवेदना व्यक्त कली. संपूर्ण स्वातंत्र्य हे आता काँग्रेसचे उद्दिष्ट बनले आहे असे त्यांनी सांगितले. एका वानुसार गंधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा प्रस्ताव मांडला. तो झाला. संकल्पित चळवळ ही केव्हा व कशी करावयाची यासंबंधीचे अधिकार काँग्रेस कार्यकारिणीला देण्यात आले. २ जानेवारी १९३० रोजी कायदेभंगाच्या चळवळीचा कार्यक्रम निश्चित करण्याचे अधिकार काँग्रेस कार्यकारिणीने गांधीजींना दिले. सर्वसामान्य जनतेत जागृती निर्माण व्हावी, तसेच त्यांच्यात चैतन्य, स्फूर्ती निर्माण व्हावी या हेतूने २६ जानेवारी १९३० रोजी सर्व देशात 'स्वातंत्र्यदिन' म्हणून पाळण्याचे ठरले. त्याच दिवशी सामूहिकपणे देशसेवेची शपथ घ्यावी असेही ठरले होते. या शपथपत्रात ब्रिटिशांनी स्वातंत्र्य मानवाचा मूलभूत अधिकार हिरावून घेतला असून भारतीयांचे राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व आत्मिक बळ खच्ची केले आहे असे म्हटले होते. अत्याचारी ।।तेपुढे नमायचे नाही, सरकारला दिले जाणारे सहकार्य करावयाचे नाही व त्यासाठी कायदेभंग करण्याचा, अहिंसक मार्गाने ब्रिटिश सत्ता उलथवून टाकण्याचा मानस व्यक्त केला होता. २६ जानेवारी १९३० या दिवशी सर्व देशाने 'स्वातंत्र्यदिन' साजरा केला. सविनय कायदेभंगाच्या बळवळीला वातावरण योग्य आहे हे गांधीजींनी जनतेतील उत्साह पाहून ओळखले.

गांधीजींनी तडजोडीची आशा सोडली नव्हती. त्यांनी लॉर्ड आर्यविनला पत्र पाठवून ११ मागण्या केल्या. या ११ मागण्यांत दारूबंदी, जमीन महसुलात ५० टक्के घट, मिठावरील कर रद्द करणे, लष्करी खर्चात ५० टक्के कपात, देशी मालास संरक्षण, राजकीय कैद्यांची मुक्तता आदी मागण्यांचा समावेश होता. देश राष्ट्रव्यापी चळवळीच्या उंबरठ्यावर उभा असताना गांधीजींनी सामान्य मागण्या पुढे कराव्यात व त्या जर मान्य झाल्या नाहीत तर चळवळ रद्द करण्याचा मानस व्यक्त करावा हे काँग्रेस नेत्यांना आवडले नाही. विशेषतः काँग्रेसमधील जहाल तरुणांना आवडले नाही. गांधीजींनी नेहमीच्या धोरणाप्रमाणे २ मार्च १९३० रोजी व्हाईसरॉयला पत्र लिहिले व त्यात त्यांनी कायदेभंगाची नोटी दिली. पत्र मोठे व महत्त्वाचे होते. पूर्ण स्वराज्याच्या घोषणेतील मुद्दे अधिक विस्तृतपणे पत्रात मांडले होते. व्हाईसरॉयला त्यांनी विचारले होते, 'तुमचा पगार महिना २१००० आहे. ब्रिटिश पंतप्रधानास ५००० रु. महिना मिळतो. तुमचे रोजचे उत्पन्न ७०० रु.११ हिंदी माणसाचे दोन आणेही नाही.' गांधींच्या पत्रात आणखीन काही विदारक प्र टाकणाऱ्या गोष्टी होत्या. परंतु व्हाईसरॉयनी गांधींना पाठविलेल्या उत्तरात म्हटले होते. 'हिंदुस्थानात शांततेची एकच जागा आहे व ती म्हणजे तुरुंग.' लॉर्ड आर्यविनने गांधीजी मागण्या मान्य केल्या नाहीत. शेवटी साबरमती आश्रमात काँग्रेस कार्यकरिणीची बै झाली व त्यात राष्ट्रीय स्तरावर सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. (१४ फेब्रुवारी १९३०)

सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा कार्यक्रम

१) मिठाचा सत्याग्रह.

२) शासकीय शिक्षण संस्थांवर बहिष्कार.

३) परदेशी मालांवर बहिष्कार.

४) दारू, अफूची विक्री करणाऱ्या दुकानांवर निदर्शने.

५) करबंदी.

६) सरकारी नोकऱ्यांवर बहिष्कार.

७) जंगल कायद्याचा भंग करणे.

१) मिठाचा सत्याग्रह १२ मार्च ते ५ एप्रिल १९३० या काळात गांधीजीनी साबरमती ते दांडी हे २४० मैलांचे अंतर आपल्या अनुयायांसह पायी चालून पूर्ण केले या दांडीयात्रेत ४० गावे लागली. ठिकठिकाणी गांधींच्या सभा झाल्या. गांधींच्या भाषणांनी गावागावात उत्साह निर्माण झाला. १२ मार्च १९३० रोजी त्यांच्यासोबत ७८ निवडक स्त्री-पुरुष होते. मिठावरचा कर म्हणजे लूट व जुलूम आहे असे गांधीजींनी ब्रिटिश पंतप्रधान मॅकडोनाल्ड यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले होते. गरिबात गरीब लोकांना हा कर द्यावा लागे. मिठावर कर लावणे अनैतिक आहे. कारण मीठ आपल्या जेवणाचा अविभाज्य भाग आहे अशीही गांधीजी व त्यांच्या सहकाऱ्यांची भूमिका होती. मिठाचा ठोक भाव १० पैश असताना सरकार मणामागे सव्वा रुपया कर घेत असे. त्यामुळे करोडो गरीब लोकांना मिठावरचा कर जाचक वाटत होता. कर चुकवून मीठ तयार केल्यास किंवा त्याची विक्री केल्यास सरकार त्यास शिक्षा करीत असे. (३ महिन्यांपर्यंत कारावास)

गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहासाठी आपल्या आश्रमातील ७८ अनुयायांची पहिली तुकडी सत्याग्रहासाठी निवडली. त्या तुकडीत पंडित खरे, गणपत गोडसे, गोविंद हारकारे, विनायक आपटे, केशव चित्रे, हरिभाऊ सोहनी वगैरे १३ मराठी भाषिक होते. गांधीजीनी मिठाचा कायदा मोडला तेव्हा त्यांच्यासोबत कमलादेवी चट्टोपाध्याय, अवंतिका गोखले, मेहता, लीलावती मुन्शी, दादाभाई नौरोजींची नात पेरीन कॅप्टन या स्त्रिया होत्या. षचंद्र बोस यांनी दांडी संचलनाची तुलना नेपोलियनने एल्बाहून परतल्यावर पॅरिसकडे या संचलनाशी केली आहे.

2) सोलापूरचे चार हुतात्मे ४ मे १९३० रोजी गांधींना अटक झाली. त्यांचा म्हणून सोलापूरला ५ व ६ मे रोजी सार्वत्रिक हरताळ व कामगारांचा संप झाला. १०,००० स्वयंसेवकांनी मिरवणुका काढल्या व तिरंगी झेंडे लावले. गिरणी कामगारांनी नागरिकांच्या सहकार्याने दारूची दुकाने जाळली, रेल्वेस्थानके, न्यायालये, पोलिस या, नगरपालिकेची इमारत इत्यादी ब्रिटिश सत्तेच्या प्रतीकांवर हल्ले चढवले.८ मे १११० रोजी १००० लोकांनी ताडीची झाडे तोडली. तेव्हा पोलीस गोळीबारात १३ लोक पावले, तर २३ जण जखमी झाले. जनतेने दोन पोलिसांना जिवंत जाळले. शेवटी सशस्त्र पोलिसांना बोलावण्यात आले पण परिस्थिती नियंत्रणात येईना. शेवटी सोलापूर शहरात लष्करी कायदा पुकारण्यात

आला. या लष्करी कायद्याचा अंमल ४९ वस चालू होता. तरीही लोक उठाव करतच होते. त्यात भाग घेतलेल्या चार तरुणांना काशी दिले गेले. १२ जानेवारी १९३१ रोजी श्री. मलाप्पा धनशेट्टी, श्री. श्रीकृष्ण सारडा, श्री. जगन्नाथ शिंदे, श्री. कुर्बान हुसेन यांना पुण्याच्या येरवडा तुरुंगात फाशीची शिक्षा झाली. सरकार पक्षाने सादर केलेला एकतर्फी पुरावा ग्राह्य धरून सख्यायाधीशांनी फाशीची शिक्षा सुनावली. सोलापुरात तिरंगा झेंडा, वंदे मातरम् व गांधी जीपी या प्रतीकांनी चळवळीला प्रोत्साहन मिळाले. सोलापूर काँग्रेस समितीचे चिटणीस मुळशीदास जाधव यांना डोक्यावरची गांधी टोपी काढली नाही म्हणून मारहाण करण्यातक आली. बार्शी, पंढरपूर, सांगोला , वळसंग येथे तिरंगी झेंडे फडकावले गेले.
३) शिरोडा, जि. रत्नागिरी येथील सत्याग्रह: डॉ. वा.वि. आठल्ये, आचार्य १.द. जावडेकर, विनायकराव मुस्कुटे यांच्या हाती या सत्याग्रहाची सूत्रे होती. ५८३ स्वयंसेवक सत्याग्रह करण्यासाठी येथे गेले. ३०० स्वयंसेवकांना अटक व सत्याग्रहीवर लाठीहल्ला झाला.
४) घरसना व वडाळा येथील सत्याग्रह १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत गुजरातमधील धारसाना सत्याग्रहही खूपच गाजला. या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू व मीराबेनकडे होते. गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेतील लढ्यातील एक सहकारी इमनसाहेब अब्बास तय्यबजी व गांधीजींचे एक पुत्र मणिलाल हेही या लढ्याचे नेतृत्व करत होते. धरसनाकडे जाणारे सर्व रस्ते सरकारने रोखले तरी ३००० लोकांनी तेथे २२ मे १९३० रोजी सत्याग्रह केला. धारसना येथील शासकीय मिठागाराकडे सत्याग्रही निघाले असता पोलिसांनी त्यांच्यावर लाठीहल्ला केला. सत्याग्रहींच्या तुकड्या एकानंतर एक याप्रमाणे पोलिसांचा मार खाण्यासाठी स्वखुशीने गेल्या. सत्याग्रहींनी संयम बाळगला होता. धैर्य, निर्भयता, सामर्थ्य व संयम या सर्व गुणांचे एकत्रित दर्शन सत्याग्रहींच्या रूपाने झाले. सत्याग्रही प्रचंड प्रमाणात जखमी झाले होते व त्यांच्या वैद्यकीय उपचारांची व्यवस्थाही केली गेली नव्हती. या घटनाप्रसंगी उपस्थित असलेले मिलर लिहितात '१८ वर्षांच्या पत्रकारितेच्या माझ्या काळात २२ देशांतील जनआंदोलने मी पाहिली, परं धारसनासारखी हृदयद्रावक व चित्तथरारक घटना मी कधी पाहिली नाही अधिकारी निःशस्त्र सत्याग्रहींवर करत असलेला निघृण हल्ला पाहून शिसारी येत होती शरमेने माझी मान खाली जात होती.'
५) धरसनाप्रमाणेच मुंबईत वडाळा, मालवण, शिरोडा येथील मिठागाराच्या का झालेल्या सत्याग्रहात १५,००० सत्याग्रहींनी मिठाचा कायदा मोडला. भारतात अन्य। समुद्रकिनारा होता त्याठिकाणी याच पद्धतीने कायदेभंगाचे सत्याग्रह करण्यात आले. अ महाराष्ट्र, बंगाल, ओरिसा, गुजरात, मद्रास इत्यादी जेथे समुद्रकिनारा नव्हता तेथे अन्यायक कायद्यांचा भंग करण्यात आला. उदा. जंगलविषयक अन्यायकारक कायद्यांचा भंग जंग सत्याग्रहातून केला होता. उत्तर प्रदेश, कर्नाटक व गुजरातमधील शेतकऱ्यांनी सरकारी शेतसारा देण्याचे नाकारले होते. मुंबई शहर मीठ सत्याग्रहात आघाडीवर होते. सविन कायदेभंगाच्या चळवळीत शेतकरी व कामगार हेच राष्ट्रीय सभेचे हात व पाय आहेत अशा घोषणा मुंबईत दिल्या जात होत्या. गांधीजींनी घोषित केलेल्या सर्वच सविनय कायदेभंगाच्या चळवळीला देशभरात उत्तम प्रतिसाद मिळाला. परदेशी कापडांची ठिकठिकाणी होळी करण्यात आली. कायदेभंगाची चळवळ चालू असतानाच गांधीजींना ४ मे १९३० रोजी ब्रिटिश सरकारने अटक केली महाराष्ट्रात मुंबई, सोलापूर येथील कामगार (कापड गिरणी) त्या अटकेच्या निषेधार्थ संपावर गेले ५) परदेशी कपडा व परदेशी वस्तूंची विक्री करणाऱ्या दुकानांपुढे स्त्रियांची निदर्शन :- मुंबई ही हिंदुस्थानातील सविनय कायदेभंगाची सर्वात मोठी रणभूमी आहे असे मुंबई गव्हर्नरने म्हटले होते. राजनिष्ठ असलेले पारशी कायदेभंगाच्या चळवळीत सहभागी झाल्याने ब्रिटिश सरकार अस्वस्थ झाले. प्रभातफेऱ्या, दारूच्या व परदेशी कपड्यांच्या दुकानांपुढे निदर्शने करणे यात स्त्रियांचा सहभाग होता. पार्वती ठकार, यशोदा भट, राधाबाई आपटे, विमल गुप्ते, प्रेमा कंटक, अवंतिकाबाई गोखले, पद्मावती हेरोलीकर, सत्यभामाबाई कुवळेकर आदी स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने भाग घेतला.
६) जंगल सत्याग्रह जंगल सत्याग्रहासाठी अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर,अकोला हे तालुके चळवळ करण्यास योग्य ठरतील असे जंगल सत्याग्रह समितीला वाटल्याने तिचे मुख्य कार्यालय संगमनेर येथे उघडण्यात आले. रामकृष्णदास महाराज, लालजी पेंडसे, श्रीपाद शंकर नवरे हे तिघे या सत्याग्रहाचे सूत्रधार होते. या सत्याग्रहात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्रीनिवास सरदेसाई, भाई सथ्था यांनी भाग घेतला व कारावास भोगला. कोपरगाव व राहुरी तालुक्यातही जंगल

सत्याग्रहाचे लोण पोहोचले होते. नाशिक जिल्ह्यात सटाणा, बागलाण, कळवण या तालुक्यांत जंगल सत्याग्रह जोरात होता. साहेब गद्रे, महंत सीतारामशास्त्री व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे तेथील सत्याग्रहाचे समय नेते होते. सातारा जिल्ह्यातील बिळाशी या गावातही जंगल सत्याग्रहात स्त्री-पुरुषांनी गाजविले. राजुबाई कदम नावाच्या स्त्रीला पोलिसांनी बेदम मारले होते. पण तिने कातील झेंडा सोडला नाही. खानदेशात ६०० जणांनी जंगल सत्याग्रहात भाग घेतला कणून त्यांना अटक करण्यात आली.

७) ठाणे जिल्ह्यात उंबरगावला ५ मे रोजी झालेल्या मिठाच्या पहिल्या सत्याग्रहाचे नानासाहेब देवघेकर व कमलादेवी चट्टोपाध्याय यांनी केले. डहाणू तालुक्यातही डाचा कायदा मोडला गेला. मुंबईजवळ पनवेलपासून १२-१३ मैलांवर असलेल्या पिनेर येथे २५ सप्टेंबर १९३० रोजी पूर्वपरवानगी घेतलेल्या शेतकऱ्यांच्या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यात ७ सत्याग्रहींचे बलिदान झाले.

८) इ.स. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीचा प्रसार करण्याचे कार्य जेधे यांनी कले. वि.रा. शिंदे व एस. एम. जोशी यांना ६ महिने कारावासाची शिक्षा भोगावी लागली. पणे जिल्ह्यात या चळवळीचे नेतृत्व बाळुकाका कानिटकर, हरिभाऊ तुळपुळे, हरिभाऊ फाटक, वि. रा. शिंदे, केशवराव जेधे, धर्मानंद कोसंबी यांनी केले.

९) बाबू गेनू सैदचे बलिदान हा मूळचा पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ या गावचा. पोट भरण्यासाठी तो मुंबईत आला होता. त्याने काँग्रेस स्वयंसेवक म्हणून सत्याग्रह करण्यासाठी नाव नोंदवले होते. १२ डिसेंबर १९३० रोजी बईतील काळबादेवीच्या नवीन हनुमान रस्त्यावर परदेशी कपड्याने भरलेल्या लॉरीपुढे त्याने तिरंगा झेंड्यासह स्वतःला झोकून दिले. पोलीस अधिकाऱ्याने त्याला धमकावले पण तो जागचा हलला नाही. अहिंसात्मक प्रतिकार करताना त्याने हौतात्म्य पत्करले. त्याच्या अंगावरून ट्रक गेला. तो मृत्यू पावला. यावेळी त्याचे वय २० वर्षे होते. तो मुंबईत गिरणी कामगार होता व आपल्या विधवा आईसोबत राहत होता. त्याच्या अंत्ययात्रेस प्रंचड गर्दी अमली होती. (२० हजार लोकांची) बाबू गेनू सैदचे बलिदान अनेकांना प्रेरणा देणारे ठरले.

१०) १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत सरोजिनी नायडू, कमलदेवी चट्टोपाध्याय, हंसाबेन मेहता, उर्मिलादेवी, कमला नेहरू यांचा सहभाग होता.

११) पुसदजवळ आरक्षित जंगलातील गवत कापून बापूजी अणे यांच्या नेतृत्वाखाली ११ स्वयंसेवकांना जंगल कायदा मोडला म्हणून अटक केली गेली. (१० जुलै १९३०) वर्धा जिल्ह्यात इतरत्रही जंगल सत्याग्रह झाले. त्यात अनेकांना एक वर्ष कारावासाची शिक्षा झाली.

१२) मुंबईचे हंगामी गव्हर्नर हॉटसन यांच्यावर पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात शिकणाऱ्या वासुदेव बळवंत गोगटे या २० वर्षे वय असलेल्या तरुणाने महाविद्यालयात गव्हर्नरवर गोळ्या झाडल्या (२२ जुलै १९३१). हॉटसन जखमी झाला होता. गोगटे यांना ८ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती.

१३) सेनापती बापट यांनी सातारा, रत्नागिरी जिल्ह्यांत केलेली भाषणे आक्षेपार्ह त्यांना अटक करण्यात आली. खटल्याची सुनावणी झाली व २४ नोव्हेंबर १९३१०० होऊन त्यास ७ वर्षे कारावासाची शिक्षा झाली. त्यांनी तुरुंगात आपणास 'क' वर्ग असी मागणी स्वतःहून केली होती.

इ.स. १९३३ च्या एप्रिलअखेरपर्यंत मुंबई इलाख्यात १३.१६२ पुरुष व ११६ स्त्रियांना कायदेभंगाच्या चळवळीत दोषी ठरविले गेले होते.

## वैयक्तिक सत्याग्रह आंदोलन (इ.स. १९४०)

सप्टेंबर १९४० मध्ये वैयक्तिक सत्याग्रह आंदोलनाचा हा निर्णय गांधीजींनी ब्रिटिश सरकारला कळविला. परंतु हा निर्णय अत्यंत मिळमिळीत आहे असे काँग्रेस नेत्यांना वाहत होते. वैयक्तिक सत्याग्रह आंदोलन हे डिसेंबर १९४१ पर्यंत चालले व त्यात २६००० सत्याग्रहींना ब्रिटिशांनी अटक केली होती. यावेळी सामुदायिक कायदेभंगाची चळवळ घेतली असती तर देशात अराजक माजून जातीय दंग्यांचा उद्‌भव होण्याचा धोका होता म्हणूनच सविनय कायदेभंगाची चळवळ वैयक्तिक पातळीपुरतीच मर्यादित ठेवण्याचा गांधीजींना निर्णय घेतला होता. या आंदोलनात काँग्रेस कार्यकारिणी व महासमितीचे सदस्य प्रांतिक नेते यांनी भाग घ्यावा अशा सूचना दिल्या होत्या. पहिला सत्याग्रही म्हणू

गांधीजींनी विनोबा भावे यांची निवड केली होती. आचार्य विनोबा भावे हे ज्ञानोपासक होते. त्यांची वृत्ती साधुतुल्य होती. वर्ध्याजवळ सेवाग्राम येथे त्यांनी विधायक कार्याला स्वतःला वाहून घेतले होते. अनेकांना वैयक्तिक सत्याग्रहामागची गांधीजीची भूमिका पटली नाही आणि त्यांनी काँग्रेसने प्रखर चळवळ करावी अशी मागणी केली आचार्य विनोबा भावे यांना तीन महिन्याची शिक्षा झाली. पंडित नेहरू हे दुसरे सत्यापती होते. त्यांना मात्र चार वर्षांची शिक्षा झाली.

तिकडे युरोपात महायुद्धाची प्रखरता वाढत होती. ७ डिसेंबर १९४१ ला जपानने अमेरिकेच्या पॅसिफिक महासागरातील पर्लहर्बर बंदरावर हल्ला करून व जर्मनी-इटालीच्या बाजूने युद्धप्रवेश केला. हिटलरने इंग्लंड-फ्रान्स या मित्रदेशांचा अनेक आघाड्यांवर पराभव केला होता. जपानने आग्नेय आशियाई देशांवर ताबा मिळवला. अशा परिस्थितीत इंग्लंड अडचणीत सापडले. ब्रिटिशांना भारतीयांच्या सहकार्याची आवश्यकता भासू लागली भारतीयांचे सहकार्य मिळावे म्हणून डिसेंबर १९४१ मध्ये ब्रिटिशांनी वैयक्तिक सत्याप आंदोलनातील सर्व सत्याग्रहांची मुक्तता केली. २३ डिसेंबर १९४१ च्या बाडॉली येथील काँग्रेसच्या अधिवेशनात काँग्रेसनेसुद्धा प्रस्तुत आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला वैयक्तिक सत्याग्रह हा गांधीजींचा केवळ प्रतीकात्मक लढा आहे असे अनेकांना वाटले, परंतु गांधीजी या मार्गाने हळूहळू पुढच्या लढ्याची तयारी करीत होते. गांधीजीनी वैयक्तिवा सत्याग्रह आंदोलन तहकूब केले. कारण अहिंसा तत्त्वास कलंक लागण्याची शक्यता होती.

**'छोडो भारत' चळवळ व महाराष्ट्र**

गांधीजीच्या नेतृत्वाखालील 'छोडो भारत' आंदोलन हे 'स्वयंस्फूर्त क्रांती' म्हणून आते. 'छोडो भारत' ची हाक म. गांधींनी मुंबई शहरात दिली. ९ ऑगस्ट १९४२ पहारे गांधीजी व त्यांचे सचिव महादेवभाई देसाई या दोघांना अटक झाली. सकाळी बई शहरातील ५४ पुढाऱ्यांना अटक झाली. शंकरराव देव, स.का. पाटील, मेहेरअली, अशोक मेहता, सरोजिनी नायडू, शांताबाई वेंगसरकर आदींना अटक या अटकेची वार्ता समजताच जमाव प्रक्षुब्ध झाला. अश्रुधूर, लाठीहल्ला, गोळीबार कार मुंबई शहरात दिवसभर चालू होता. सायंकाळी ६ वाजता शिवाजी पार्कवर म. की आपण भाषण करू असे कस्तुरबा गांधींनी जाहीर केले. त्यामुळे कस्तुरबा गांधी, लाल, डॉ. सुशीला नायर यांनाही सरकारने अटक केली. ९ ऑगस्टला जयप्रकाश पण, नानासाहेब गोरे तुरुंगातच होते. ऑगस्ट महिन्यात पोलिसांची नजर चुकवून सनराव पटवर्धन मुंबईतच राहिले व तेथून महाराष्ट्रात व कर्नाटक येथील भूमिगत लीची सूत्रे हलवू लागले.

काँग्रेस नेत्यांपैकी सादिक अली, श्रीमती सुचेता कृपलानी, रंगराव दिवाकर वगैरे श्रीही काही दिवस मुंबईतच राहिली. ११ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत भायखळ्याच्या बारात रस्त्यावर भाजी विकणाऱ्या २२ वर्षे वयाच्या देवू गणपत या तरुणाने पोलिसांची जाताना 'चले जाव', 'करेंगे या मरेंगे' या घोषणा देताच त्याला गोळ्या झाडल्या. तो पावला. देवू गणपतीला नुसत्या घोषणा दिल्याबद्दल प्राणास मुकावे लागले. ९ ऑगस्टला मुंबईत १६ वेळेस गोळीबार झाला व ८ माणसे मृत्युमुखी पडली. ४४ जण मी झाले. पुणे शहरात देव, जेधे, गाडगीळ वगैरे प्रमुख नेत्यांना अटक झाली. त्याचा षध म्हणून लोकांनी उत्स्फूर्तपणे मिरवणुका काढल्या. त्यावेळी लोकांनी खालील मार्ग अवलंबिले-

१) टेलिफोनच्या तारा तोडणे.

२) एकट्या पोलिसाला घेरून त्याला गणवेश काढावयास लावून त्याची होळी करणे.

३) पोलिस चौक्या ताब्यात घेऊन त्या जाळणे.

४) जेथे पोलिस बंदोबस्त आहे त्यांच्यावर दगडफेक करणे.

५) बसगाड्यांची मोडतोड करणे.

६) खजिने लुटणे.

७ ) रेल्वेस घातपात करणे.

८) टपाल कार्यालयास आगी लावणे. ९

) पूल उद्ध्वस्त करणे.

१०) विनातिकीट रेल्वे प्रवास करणे.

११) मीठ तयार करणे.

१२) न्यायालयांवर बहिष्कार.

१३) सरकारी नोकरीचे राजीनामे.

पुणे शहरात ९ ते १२ ऑगस्टच्या काळात नारायण दाभाडे या विद्यार्थ्यास त मथुराबाई अनंत माटे यांना हौतात्म्य पत्करावे लागले. त्यामुळे विद्यार्थी अधिकच बिहले गांधीजी, महादेवभाई देसाई, सरोजिनी नायडू, मीराबेन, कस्तुरबा, प्यारेलाल, सुशीला नायर इत्यादींना ब्रिटिशांनी पुण्यात आगाखान पॅलेसमध्ये ठेवले गेले. १५ ऑगस्टला महादेवभाई देसाई यांचा हृदयविकाराने मृत्यू झाला. त्यांचे अंत्यसंस्कार बंगल्याच्या आवारात करावेत असे सरकारने कळविले. त्यावेळी गांधीजींनी शवाला अग्री दिला. त्यांच्या पाची व पुत्रालाही अंत्यदर्शनही घेता आले नाही.

खानदेशातील साने गुरुजी पुण्यात येऊन भूमिगत चळवळीत काम करू लागले खानदेशातील डॉ. उत्तमराव पाटील, त्यांच्या पत्नी लीलाबाई, उत्तमरावांचे बंधू शिवाजी दशरथ या सर्वांनीच 'चले जाव' चळवळीत भाग घेतला. अमळनेर पेटून उठले. त्यामा प्रेरणा साने गुरूजींची होती. खानदेशातील भूमिगत चळवळीस मार्गदर्शन करण्यासाठी सामे गुरुजींनी मधू लिमये यांच्यावर जबाबदारी टाकली होती. रेल्वेचे रूळ उखडून टाकणे कामे खानदेशात मधू लिमये यांच्या सल्ल्याने हाती घेण्यात आली. ९ सप्टेंबरला 'भारत छोडो' चळवळीस १ महिना झाला म्हणून नंदुरबारच्या विद्यार्थ्यांनी मिरवणूक काढली सेवा शिरीषकुमार मेहता या १५ वर्षांच्या मुलाने तिरंगा फडकावला; पण तो पोलिसांच्या गोळीबारास बळी पडला. नंदुरबारमध्ये त्यादिवशी एकूण ७ जणांनी हौतात्म्य पत्करले, कुलाबा जिल्ह्याचे एक नेते नानासाहेब कुंटे हे दाढी वाढवून वेशांतर करून इ.स. १९४३ च्या जानेवारीपर्यंत मुंबईत भूमिगत म्हणून वावरत होते. पुण्याच्या छावणी विभागात कॅपिटॉल व वेस्टएंड या चित्रपटगृहांत बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आला (२४ जानेवारी १९४३). त्यात २ ब्रिटिश सैनिक ठार झाले व १४ गोरे सैनिक जखमी झाले. सरकारने न्यायालयात सादर केलेल्या यादीनुसार या कट खटल्यात ३९ आरोपी होते. त्यापैकी ४० जणांना अटक केली गेली. पण साक्षीपुराव्याअभावी या खटल्यातील आरोपी सुटले.

**काँग्रेस रेडिओ:**

२३ ऑगस्ट १९४२ ते नोव्हेंबर १९४३ पर्यंत मुंबईत उषा मेहता, विठ्ठलभाई जव्हेरी, नानक मोटवानी, जगन्नाथ ठाकूर व बाबूभाई खाकर या जणांच्या सहकार्याने व राम मनोहर लोहिया यांच्या मार्गदर्शनाने काँग्रेस रेडिओ चालविण्यात येत होता. या रेडिओवरून सतत ९० दिवस बातम्या देण्याचे काम एल्फिन्स्टन महाविद्यालयातील प्राध्यापिका श्रीमती कमल वूड करीत असत. पण आपल्या भूमिगत देशसेवेचा उल्लेख त्यांनी कोठेच केलेला नाही. पोलिसांना त्यांच्या या देशसेवेचा शेवटपर्यंत पत्ता लागला नाही. काँग्रेस रेडिओवर 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्तां हमारा', 'वंदे मातरम' ही गीते आणि इंग्रजी व हिंदी बातम्या, देशभक्तिपर कवितांचे वाचन आदी कार्यक्रम सादर केले जात पोलिसांना हे रेडिओ केंद्र कोणत्या इमारतीमध्ये सुरू आहे हे समजत नव्हते; पण नंतर पोलीसांना या काँग्रेस रेडिओचा सुगावा लागला व त्यांच्यावर खटला भरला गेला. बाबूभाई यांना ५ वर्षाची, उषा मेहतांना ४ वर्षांची व चंद्रकांत जव्हेरी यांना १ वर्षाची शिक्षा नरिमन प्रिंटर, ठाकूर व रवींद्र मेहता हे माफीचे साक्षीदार झाल्यामुळे त्यांना शिक्षा नाही.

पुण्यात काँग्रेस रेडिओ इ.स. १९४४ च्या आरंभी सुरू झाला. (३० जानेवारी ते २८ ११९४४ पर्यंत) हा रेडिओ चालू होता. नाशिक शहरातही असाच प्रयत्न झाला. नाशिक जिल्ह्यातील भूमिगत चळवळीत वामनराव यार्दी, वसंत नाईक, रावसाहेब ओक सहभागी झाले होते. अहमदनगर शहरात मिरवणुका, निदर्शने झाली. शोलापूर शहरात आणि पंढरपूर, करमाळा यासारख्या तालुक्यांच्या ठिकाणी 'चले जाव' ळीतील भूमिगतांनी बॉम्बस्फोट घडवून आणले होते.
कोल्हापूर संस्थानात गारगोटी या गावी भूमिगतांनी पोलिस ठाण्यातील शस्त्रागार १७. नंतर तेथील तुरुंगात असलेल्या राजबंद्यांची मुक्तता करण्यात आली व खजिना ण्याचा प्रयत्न झाला तेव्हा पोलिसांच्या गोळीबारात ७ जण मृत्यू पावले (१३ डिसेंबर १९४२). ग्यानदेशात चिमठाणे गावात ५.५ लाखांचा खजिना लुटला होता. डॉ. उत्तमराव पाटील मोहिमेत सहभागी झाले होते. ही रक्कम भूमिगत चळवळ, तुरुंगातील कैदी तुरुंगाबाहेरील कार्यकर्ते यांच्यासाठी वापरली गेली. खानदेशातच नंदुरबार येथे खजिने लुटण्याचे प्रयत्न 5. त्यात जी.डी. लाड, नागनाथ नायकवाडी वगैरे मंडळी दाखल झाली होती. कोल्हापूरच्या रत्नाप्पा कुंभार यांच्या गटातील तरुणांनी जेजुरीच्या श्रीखंडेरायाचा खजिना परला (२७ जुलै

१९४४). याप्रकरणी १३ जणांवर रीतसर खटला भरला. एक माफीचा साक्षीदार वगळता बाकी सर्वांना निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. ९ ऑगस्ट ते २८ ऑगस्टपर्यंत नागपूर शहरात आणि जिल्ह्यात १०८८ लोकांना अटक केली.

**यावलीचा उद्रेक व बेनोडा गावाची शौर्यकथा :-**

१५ ते १९ ऑगस्ट १९४२ हे ५ दिवस अमरावती शहरापासून २२ किमी अंतरावर पावली या २००० लोकसंख्येच्या गावात स्वातंत्र्याचे यज्ञकुंड धगधगत होते. १८ ऑगस्टला जिल्हाधिकारी मेल्ड्रम, जिल्हा पोलिस अधिकारी ग्रँट यांनी पोलिसांचे पथक घेऊन यावलीच्या ग्रामस्थांना धडा शिकवण्याचा प्रयत्न केला. ग्रामस्थांनी पोलिसांचा कडवा प्रतिकार केला. मेल्ड्रम साहेब त्यात जखमी झाले व बेशुद्ध झाले. लोकांनी त्यांना पकडले. शरणागती पत्करून ते सुटले; परंतु त्यांनी पुन्हा लष्कराची कुमक घेऊन यावलीवर हल्ला केला. पोलिसांनी ४७ फैरी झाडल्या. त्यात ५ लोक ठार झाले व १२ जखमी झाले. १९ ऑगस्टला लष्कराने गावास वेढा दिला. यावलीच्या १३४ गावकऱ्यांकडून रु. १० हजार सामुदायिक दंड वसूल करण्यात आला. यावलीतील प्रतिकारास जबाबदार असल्याच्या आरोपावरून ६२ जणांना विशेष न्यायालयाने २ ते ७ वर्षे मुदतीच्या सक्तमजुरीच्या शिक्षा ठोठावल्या. इ.स.१९४२ च्या चळवळीतील यावलीचा संघर्ष महत्त्वपूर्ण मानला जातो.

मोर्शी - वरूड रस्त्यावर बेनोडा हे गाव आहे. १६ ऑगस्ट बेनोडा, इत्तमगाव, लाणी इ. खेड्यांतील लोकांनी एकत्र येऊन वामनराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा नेला. पोलिसांनी मोर्चावर गोळीबार केला. त्यात महादेव फंदाडे महादेव वाघमारे, पांडुरंग मालप महादेव बारमासे व विनायक यावले यांनी प्राण गमावले.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अटक :-**

इ.स.१९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीपासून तुकडोजी महाराजांनी कीर्तन, भजन, प्रवचन या मार्गांनी लोकांचे प्रबोधन घडवून आणले होते. माणसाने मरण पत्करावे, पण दास्य स्वीकारू नये असे ते म्हणत. आष्टी व चिमूर या दोन गावांतील लोकांना चिथावणी दिली म्हणून २८ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांना अटक करण्यात आली.

**नागपूर शहर व जिल्ह्यातील 'छोडो भारत' चळवळ :-**

२८ ऑगस्ट १९४२ पर्यंत नागपूर शहरात व जिल्ह्यात १०८८ लोकांना अटक करण्यात आली. पोलिस व लष्करास ७४ वेळा गोळीबार करावा लागला. ४५६ वेळा बंदुकीच्या फैरी झाडल्या. ६४ लोक प्राणास मुकले, तर ४२ जण जखमी झाले. नागपूरच्या राष्ट्रीय शिवाजी मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते दाजीबा महाले व त्यांचा मुलगा शंकर महाले यांनी या लढ्यात हौतात्म्य पत्करले. (१३ ऑगस्ट १९४२)

**अकोला, अमरावती, वर्धा, भंडारा, तुमसर येथील चळवळ :-**

वर्धा, भंडारा, तुमसर या ठिकाणी असंतुष्ट जमावाने परकीय सत्तेविरुद्ध राग व्यत केला. अमरावतीच्या हनुमान व्यायाम मंडळाचे कार्यकर्ते हे चले जाव चळवळीत सहभागी झाले होते. अकोला येथील राष्ट्रीय शाळेचे शिक्षक व विद्यार्थी इ.स. १९४२ च्या चळवळीत सहभागी झाले होते.

**अष्टी व चिमूर :**

वर्धा जिल्ह्यात अष्टी गावी १६ ऑगस्ट १९४२ रोजी सुमारे ३००० लोकांचा जमाव पोलिस ठाण्यावर चाल करून गेला. पोलिसांनी गोळीबार केला तेव्हा गोळीबारामुळे ७ जण ठार झाले. संतप्त जमावाने पोलिस उपनिरीक्षक जमादार व ४ पोलीस यांच्यावर चाकूहल्ला करून त्यांना ठार केले. पोलिस ठाणे, टपालखात्याचे कार्यालय, सरकारी विश्रामगृहाच्या इमारतीला लोकांनी आगी लावल्या. १० जणांना फाशी, ५४ जणांना जन्मठेप, १६ जणांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठाण्यात आल्या. अष्टीच्या गावकऱ्यांकडून ५०,००० रु. दंड वसूल केला गेला. चिमूर (आजचे चंद्रपूर) जिल्ह्यातील ५००० लोकवस्ती असलेल्या गावात उद्धव कोरेकर यांनी ब्रिटिशांना लोकांनी कर देऊ नयेत, कायदे मोडावेत अशी चिथावणी दिली. १६ ऑगस्ट १९४२ ला जमावाने सबडिव्हिजनल ऑफिसर, नायब तहसीलदार, परिमंडल निरीक्षक व एक शिपाई यांना लाठ्यांचे प्रहार करून ठार मारले व त्यांची प्रेते जाळून टाकली. चिमूरमधील सरकारी दवाखाना वगळता बाकीच्या सरकारी इमारतींना आगी लावण्यात आल्या. शेवटी ३०० गोरे सैनिक व भारतीय

सैनिक यांनी ८ दिवस चिमूर गावात तळ ठोकून बायकामुलांना मारहाण केली. १९ सप्टेंबर १९४२ रोजी बलात्काराच्या नाची शहानिशा करण्यासाठी रमाबाई तांबे, विमला देशपांडे, विमला अभ्यंकर, द्वारकाबाई कसकर, डॉ. श्रीमती वझलवार या प्रतिष्ठित स्त्रियांनी तपशीलवार चौकशी केली व आपला अहवाल सादर केला. एवढेच नव्हे तर स्त्रियांवर बलात्कार केले. या अत्याचाराची सौकशी व्हावी म्हणून म. गांधीचे शिष्य आचार्य भन्साळी यांनी प्रदीर्घ उपोषण केले होते. पण यांची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समित्यांचे अहवाल चुकीचे आहेत असे कारण सून ते अहवालच फेटाळले गेले. चिमूर प्रकरणी न्यायालयीन चौकशी करावी असी मागणी हिंद सेना संघाच्या ठक्करबप्पा नटेश, अप्पाजी द्रविड, ए. डी. मणी, पी. कोदंडराव था सदस्यांनी केली.

विदर्भातील 'चले जाव' चळवळीचा जोर फक्त नागपूर शहरापुरता मर्यादित नव्हता. बावली (जि. अमरावती), बेनोडा, अष्टी व चिमूर वगैरे खेडेगावांत ब्रिटिश सरकारच्या डपशाहीचा सामान्य माणसांनी प्रतिकार केला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना अटक झाली. अशी व चिमूर या दोन्ही गावांत जे घडले ते चळवळीच्या इतिहासातील एक स्फूर्तिदायक पर्व आहे नंदुरबारचा शिरीषकुमार मेहता.

**साताऱ्यातील प्रतिसरकार (१ जून १९४३१३ जून १९४६) :-**

१९४२ च्या चले जाव चळवळीत मुंबई प्रांतातील सातारा जिल्ह्यात प्रतिसरकार स्थापन करण्याचे प्रयत्न झाले. साताऱ्यातील प्रतिसरकार हे १ जून १९४३ पासून १३ जून १९४६ पर्यंत म्हणजे तीन वर्षांहून अधिक काळ कार्यरत होते. प्रति सरकारातील मेले हे शेतकरी कुटुंबातले होते. नाना पाटील, किसन वीर यांच्या नेतृत्वाखाली हे सरकार अस्तित्वात आले होते. नाना पाटील सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीचे संस्कार घेऊन ॥.स. १९३० मध्ये तलाठ्याच्या नोकरीचा राजीनामा देऊन काँग्रेस चळवळीत दाखल झाले होते. ९ ऑगस्ट १९४२ ते ३१ मे १९४३ या पहिल्या टप्प्यात सातारा जिल्ह्यात मोर्चे काढणे, प्रभातफेऱ्या काढणे तसेच टेलिफोनच्या तारा तोडणे, सरकारी इमारतींना आगी लावणे सधन लोकांच्या घरांवर दरोडे घालून पैसा हस्तगत करणे आदी प्रकार घडले. भूमिगत काव्याने लढणाऱ्या भूमिगतांचे २९ गट होते. भूमिगत चळवळीत गुप्तता बाळगली जात होती. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाशी भूमिगतांनी केलेल्या चळवळी विसंगत होत्या.

१ जून १९४३ रोजी भूमिगतांच्या सर्व गटांच्या प्रतिनिधींची बैठक होऊन प्रतिसरकार स्थापन करण्यात आले. के. डी. पाटील यांची सर्वाधिकारी म्हणून २५-३० जणांकडून नेमणूक केली गेली. साताऱ्याच्या प्रतिसरकारच्या चळवळीत स्त्रियांनी महत्त्वाचा वाटा उचलला. त्या स्त्रियांत लीलाताई पाटील, विजयाताई लाड, लक्ष्मीबाई नायकवडी, राजुताई पाटील यांचा उल्लेख करावा लागतो. प्रतिसरकारच्या वतीने न्यायालयेही स्थापन करण्यात आली होती. ब्रिटिशांच्या महागड्या न्यायपद्धतीऐवजी गोरगरिबांना स्वस्तात आणि शक्य तितक्या लवकर न्याय मिळवून देण्यासाठी प्रत्येक खेड्यात न्यायमंडळे स्थापन करण्यात आली होती. सातारा भूमिगत चळवळीची काही वैगुण्येही होती. सर्वच भूमिगत पराक धाडसी व त्यागी होते असे नव्हे. भूमिगत गटांच्या सर्व नेत्यांचे आर्थिक व्यवहारही पाथ नव्हते. तसेच भूमिगत चळवळीतील नेत्यांमध्ये विचारप्रणालीच्या दृष्टीनेही मतभेद असत स्वातंत्र्योत्तर काळात ते वाढत गेले. काही कार्यकर्तें काँग्रेसमध्ये, काही शेतकरी-फाम पक्षात तर काही कम्युनिस्ट पक्षात व समाजवादी पक्षात गेले. इ.स. १९४६ च्या प्रांति कायदे मंडळाच्या निवडणुकीत काँग्रेस नेत्यांनी सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीचे प्रतिसरकारचे गुणगान करून मतदारांचा पाठिंबा मिळवला. पण मोरारजी देसाईनी ८ व १० जून १९४६ या दिवशी सातारा जिल्ह्याचा दौरा करून ग्रामराज्यावर टीका केली होती प्रतिसरकारच्या माध्यमातून सातारा जिल्ह्यातून नवे नेतृत्व उदयास आले. उदा. किसा वीर, यशवंतराव चव्हाण, दिनकर निकम, तानाजी पेंढारकर, डी. जी. देशपांडे, रानामा कुंभार, अच्युत पटवर्धन, नागनाथ नायकवडी, जी. डी. लाड वगैरे. इंग्रज राज्यकत्यांनी त्यांच्या हस्तकांनी प्रतिसरकारला 'पत्री सरकार' म्हणून बदमान केले. सातारा जिल्ह्यातील भूमिगतांनी प्रतिसरकार स्थापन केले, असे कबूल करावयास मुंबई सरकार तयार नकते पोलिसांच्या खबऱ्यांना पकडून दोन्ही पाय बांधून त्यांच्या दोन्ही तळपायांवर काठीने तहाचे मारावयाचे असा प्रकार भूमिगत कार्यकर्ते करत असत. प्रतिसरकारातील नेते, कार्यक यांनी ३ वर्षापेक्षाही अधिक अस्तित्वात असलेल्या भूमिगत चळवळीत व पत्री सरका चालवण्याच्या प्रक्रियेत मोठे योगदान दिले होते हे नक्कीच. प्रति सरकारच्या स्थापन

सहभागी झालेले अनेक भूमिगत राष्ट्रसेवादलाशी संबंधित होते. ब्रिटिशांनी सातारा जिल्ह्यातील भूमिगतांची फार मोठ्या प्रमाणात धरपकड केली होती. प्रतिसरकारच्या भूमिगत कार्यकर्त्यांनी काही सामाजिक सुधारणांना चालना दिली. उदा.

१) गांजाचा साठा नष्ट करणे.

२) दारूची पिपे किंवा बाटल्या फोडणे.

३) दारू अड्ड्यावर दंड बसवून तो वसूल करणे.

४) जत्रेच्या वेळी बोकड कापण्याचा प्रथा बंद करणे,

५) लेकी-सुनांचा छळ करणारांना वठणीवर आणणे.

६) गांधी पद्धतीने लग्न लावणे. या पद्धतीत वधूवर खादीची जाडीभरडी वस्त्रे परिधान करत बऱ्याच खेड्यांत नाना पाटील यांनी गांधी विवाह पद्धतीने अल्पखर्चात लग्ने लावली (पुढे इ.स. १९५७ मध्ये सातारा व इ.स. १९६७ मध्ये बीड लोकसभा मतदारसंघातून ते लोकसभेवर निवडून गेले होते.) सामूहिक विवाहावरही भर दिला जाई. शंकरराव निकम, बापूसाहेब लाड यांचे गांधी विवाहच झाले होते.

७) रखेल्या ठेवणारांना वठणीवर आणले जाई.

८) लग्न व त्यातील मानापानावर कमीत कमी खर्च करावा म्हणून वधू-वर मंडळींचे बोधन केले जाई.

९) खेड्यात वाचनालये स्थापन करणे.

इ.स.१९४६ मध्ये आचार्य अत्रे यांनी सातारा जिल्ह्याचा दौरा करून भाषणे केली व प्रतिसरकारची तरफदारी केली होती. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष काकासाहेब गाडगीळ श्रांती प्रतिसरकारच्या काळात झालेल्या पोलिसी अत्याचाराचा निषेध केला.

**इ.स. १९४२ च्या उठावाबाबत विविध पक्ष, संघटना व नेत्यांच्या भूमिका :-**

गांधीजीनी हे आंदोलन सर्वांसाठी खुले ठेवले होते. कोणाच्याही सहकार्याची ते वाट नव्हते. ९ कोटी मुस्लिमांचे आपण प्रतिनिधी आहोत असा जीनांचा दावा होता. श्रीगांनी 'अत्यंत भयंकर व घातक आंदोलन' या शब्दांत या आंदोलनाचा धिक्कार कला. हे आंदोलन यशस्वी झाल्यास हिंदूंची हुकूमशाही प्रस्थापित होईल या भीतीने मुस्लिम समाज या आंदोलनापासून दूर राहिला. बंगालमधील काही मुस्लिम संघटना मात्र या आंदोलनात सहभागी झाल्या होत्या. शीख समाजाची भूमिका आंदोलनास विरोध करण्याची नव्हती तर आंदोलनापासून १० तटस्थ राहण्याची होती. वि. दा. सावरकरांनी 'देशासाठी कष्ट भोगणाऱ्या नेत्यांना आपली सहानुभूती आहे', 'भारताची स्वातंत्र्य आकांक्षा कोणासही दडपता येणार नाही' अशी विधाने व्यक्त केली होती; पण त्यांची 'हिंदू महासभा' शेवटपर्यंत मैदानात उतरलीच नाही. डॉ. गेवारांच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही तटस्थतेचे धोरण स्वीकारले होते. डॉ. अबिडकरांनी ब्रिटिश सत्ता हे आमच्या दृष्टीने सर्वात मोठे संरक्षण आहे अशी भूमिका घेतली होली; पण सर्व दलित समाज आंबेडकरांच्या मागे नव्हता. महाराष्ट्र, तामिळनाडू व पंजाबमधील काही दलित जमाती सोडल्या तर सर्व प्रांतांतील दलितवर्गही या आंदोलनात सहभागी झाला होता व तो गांधीजींचे नेतृत्व मानत होता. कम्युनिस्टांनी आंदोलनास सक्रिय विरोध केला. हे आंदोलन दडपण्यासाठी चाललेल्या सरकारी प्रयत्नांत ते ब्रिटिशांचे हस्तक असल्याचा अनुभव आला होता. हिटलरने रशियावर आक्रमण केल्यानंतर जून १९४० मध्ये रशिया ब्रिटनच्या बाजूने हिटलरविरोधी युद्धात उतरला तेव्हा कम्युनिस्टांची भूमिका एकदमच बदलली. त्याच्या मोबदल्यात ब्रिटिशांनी साम्यवादी पक्ष कायदेशीर ठरवला व कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची सुटका करण्यात आली. इ.स.१९३०-३२ च्या सामूहिक कायदेभंग चळवळीसही कम्युनिस्टांचा विरोध होता.

**छोडो भारत' आंदोलनाचे परिणाम / महत्त्व :- '**

आधुनिक भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे स्थान या चळवळीला आहे. जयप्रकाश नारायण म्हणतात, '१९१७ मध्ये रशियात झालेल्या क्रांतीला रशियात जे स्थान आहे तेच स्थान हिंदुस्थानच्या इतिहासात १९४२ च्या चळवळीला आहे. हे आंदोलन पूर्णपणे अहिंसावादी नव्हते. डॉ. आर. सी. मुजुमदार म्हणतात, 'To call the movement of 1942 as a non-violent movement in any sense, is nothing but a perve of truth, or

travesty of facts.' १९४२ च्या उठावास अनेक ठिकाणी हिंस स्वरूप आले होते. रस्ते बंद, टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वे स्टेशन्सला आगी लाव सरकारी कचेऱ्या-डाक बंगले जाळणे, सरकारी खजिने लुटणे, शस्त्रसाठे पळविणे इत्या कृत्ये जनतेने मोठ्या प्रमाणात केली होती. यासंदर्भात कॉंग्रेसचे अधिकृत इतिहासकार पट्टाभिसीतारामय्या यांनी पुढील जी आकडेवारी दिली ती अशी रेल्वे स्टेशन्स जाळण् प्रकार २५०, पोस्ट ऑफिसेसवर हल्ला ३५०, पोस्ट ऑफिसे जाळली ५०, टेलि व टेलिफोन तारा तोडल्या एकूण ठिकाणे ३५००, पोलिस स्टेशन्स जाळली ७ सरकारी कार्यालयांना आगी लावण्यात आल्या . ही आकडेवारी पाहता या चळवळीला अहिंसा चळवळ म्हणता येत नाही. या आंदोलनाचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) या आंदोलनाने मुस्लिम लीग, हिंदू महासभा व आर.एस.एस. सोडून सर्व राजकी पक्षांना, अपक्षांना व सामाजिक गटांना कॉंग्रेसच्या पाठीमागे एकमुखाने उभे केली देशातील जागृत व संघटित लोकमताचा आविष्कारच या आंदोलनाच्या रूपाने प्रका झाला. 'चले जाव' आंदोलन हे संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीवर एक सार्वमतच उरते

२) स्वातंत्र्यासाठी राष्ट्रीय देहदंड सोसणाऱ्या आंदोलकांच्या साहाय्यासाठी धावून जाणारी पक्षातीत राष्ट्रीय भावना या आंदोलनाने देशात निर्माण केली. तुरुंगांतील राजबंद्यांच्या साहाय्यासाठी आर्थिक, कायदेविषयक मदत देण्यासाठी लोक पुढे आले.

३) टाइम्स ऑफ इंडिया, 'स्टेटस्मन' ही इंग्रजधार्जिणी वृतपत्रे सोडली तर देशातील इतर इंग्रजी वृतपत्रे (अमृत बझार पत्रिका, हिंदुस्थान टाइम्स, इंडियन एक्सप्रेस, नॅशनल हेराल्ड) बंद होती. काही वृत्तपत्रांनी ब्रिटिशाचे जाचक निर्बंध सांभाळून प्रकाशन चालूच ठेवले होते. एकूण चळवळीच्या काळात वृतपत्र स्वातंत्र्याची पर मोठी गळचेपी झाली.

४) इ.स. १९२० व इ.स. १९३० च्या चळवळींपेक्षाही या चळवळीने राष्ट्रप्रेम, स्वार्थत्याग, राष्ट्रनिष्ठेची भावना अधिक व्यापक प्रमाणात निर्माण केली.

५) ब्रिटिशांनी अत्यंत क्रूर मार्गाचा व पाशवी शक्तीचा वापर करून ही चळवळ दडपून टाकल्यामुळे ब्रिटिशांप्रती भारतीयांच्या मनातील असंतोष हा अधिक तीव्र बनला.

६) या आंदोलनामुळे स्वातंत्र्य अधिक जवळ आले. भारतात फार काळ राज्य करणे कठीण आहे हे ब्रिटिशांच्या लक्षात आले. कारण पोलिस, नौदलात राजनिष्ठेला तहा गेला होता. या चळवळीतील जनतेवर काही ठिकाणी गोळीबार करण्याचे पोलिसांनीटाळले होते. या आंदोलनाने आग्नेय आशियातील हिंदी जनतेत उत्साह निर्माण झाला व भारतीय ७)स्वातंत्र्यलढ्यास साहाय्य करण्यासाठी हे लोक पुढे आले. ऑगस्ट क्रांती उठावामुळे साम्राज्यांतर्गत स्वराज्य की संपूर्ण स्वातंत्र्य हा प्रश्नच निकाली निघाला. कोणत्याही स्वरूपातील ब्रिटिश वर्चस्व व हस्तक्षेप नसलेले संपूर्ण सार्वभौम स्वातंत्र्यच भारतीयांना दिले पाहिजे ही गोष्ट आता सिध्द झाली.

८) इ.स. १९४२ च्या चळवळीमुळे आझाद हिंद सेनेच्या भावी कामगिरीची पार्श्वभूमी तयार झाली.

९) मुस्लिम लीग या चळवळीपासून दूर राहिल्याने इंग्रज-मुस्लिम लीग यांच्यातील मैत्री दृढ झाली. त्याचा फायदा पाकिस्तानच्या निर्मितीसंदर्भात ब्रिटिशांना सहानुभूती वाटावी यात झाला.

१०) सरकारचे नीतिधैर्य खचले. कारण लष्कर, नौदल हेच स्वातंत्र्य चळवळीला अनुकूल बनले होते. फेब्रुवारी १९४६ मध्ये मुंबईत नौदल सैनिकांचे बंड झाले. या सर्व बदलत्या परिस्थितीची दखल ब्रिटिशांना घ्यावी लागली. ब्रिटनचे पंतप्रधान ॲटली यांनी २० फेब्रुवारी १९४६ रोजी भारत सोडून जाण्याचा आपला ऐतिहासिक निर्णय जाहीर केला.

या चळवळीने भारतीय जनमानसात मोठी क्रांती घडवून आणली. गांधीजींच्या शिकवणुकीमुळे नेत्याविना संघर्ष करावयास भारतीय जनतेला या चळवळीने शिकवले. (१) भूमिगत प्रतिकार आंदोलनाची आवश्यकता सामुदायिक प्रतिकाराइतकीच महत्त्वाची आहे ही बाब या चळवळीने सिद्ध केली. लोहिया, जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली हे या आंदोलनाचे प्रमुख नेते होते. हे आंदोलन काहीसे अयशस्वी झाले असे म्हटले तरी त्यामुळे प्रतिकाराची ज्योत तेवत ठेवण्याचे महत्त्वाचे काम झाले यात शंकाच नाही.

**१९४२ चा उठाव अयशस्वी का झाला?**

१) काँग्रेससह सर्व नेतेमंडळी प्रारंभापासूनच तुरुंगात होती. जनतेला नेत्याविना लढावे लागले. जनतेला आदेश द्यावयास व मार्गदर्शन करावयास कोणी नेता नव्हता.

२) आंदोलकांत सुसूत्रता नव्हती.

३) तुरुंगातून सुटल्यानंतर काँग्रेस नेते तडजोडीच्या मार्गाने सत्तांतर घडवून आणण्याच्या राजकारणात गुरफटले. ऑगस्ट उठावातून जन्मलेल्या साऱ्या क्रांतिकारक शक्ती त्यांनी मारून टाकल्या.

४) ब्रिटिशांनी ही चळवळ दडपून टाकण्यासाठी अत्यंत दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब केला. ब्रिटिशांच्या प्रचंड सामर्थ्यापुढे या चळवळीतील नेते, कार्यकर्ते यांचा निभाव लागणे अशक्यच होते. मारहाण, अटकसत्र, गोळीबार, दडपशाही, लष्कराचे सहकार्य घेणे इत्यादी मार्गांनी त्यांनी ही चळवळ दडपून टाकली.

**मुंबईतील नाविक दलाचा उठाव १८ फेब्रुवारी १९४६ :-**

१८ फेब्रुवारी १९४६ रोजी मुंबई बंदरात उभ्या असलेल्या जहाजांवरील भा नौसैनिकांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांविरुद्ध व पर्यायाने ब्रिटिश सत्तेविरुद्ध सशस्त्र उठान या उठावामागे खालील कारणे होती.

१) अन्न, राहण्याची व्यवस्था, युद्ध आघाडीवरील कामे, वैद्यकीय तपासणी प्रत्या बाबत ब्रिटिश व भारतीय नौसैनिकांमध्ये अधिकारी पक्षपात करीत.

२) प्रशिक्षण काळात भारतीय प्रशिक्षणार्थींना शिवीगाळ केली जाई.

३) भारतीयांना नौदलात उच्च पदे, बक्षिसे मिळत नसत. भारतीय नौसैनिकांपेक्षा ब्रिटिश नौसैनिकांना ६ पट वेतन मिळे.

५) युद्ध समाप्तीनंतर भारतीय नौसैनिकांना सेवेतून कमी केले जाई. भारतीय नौसैनिकांनी आझाद हिंद सेनेतील अधिकाऱ्यांविरुद्ध जेव्हा खटले भरलेले तेव्हा त्यांच्या मदतीसाठी एक निधी जमा केला होता. आझाद हिंद सेनेच्या कार्याचा स प्रभाव त्यांच्यावर होता. आपण आपले प्राण कोणासाठी? कशासाठी? व का? द्यावया इत्यादी प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाले. त्याची पहिली प्रतिक्रिया १ डिसेंबर १९४५ उमटली. त्यादिवशी नौदल दिन साजरा होणार होता. त्यादिवशी 'ब्रिटिशांना मारा', ' करा' अशी घोषवाक्ये लिहिलेली होती. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी प्रचंड धाक दाखवणे, कोणी केले त्याची नावे त्यांना न समजू शकल्याने ब्रिटिश अधिकारी संतप्त झाले. दस का दिवशीही जहाजावर 'जय हिंद', 'ब्रिटिश साम्राज्यवाद्यांचा धिक्कार असो' अशी घोषवाक सगळीकडे लिहिलेली आढळून आली. यासंदर्भात उठावाचे नेते बी. सी. दत्त या व्यक्तीला अटक झाली. १८ फेब्रुवारी १९४६ रोजी तलवार बोटीवरील भारतीय सैनिकांनी अप घेण्याचे नाकारले. त्याबरोबर मुंबईत असलेल्या सर्व जहाजांवरील नौसैनिक त्यांच्या समर्थनार्थ पुढे आले. २४ जहाजे ओस पडली. तलवार जहाजावरचा युनियन जॅक काहन तिरंगा लावला गेला. नौसैनिकांनी 'इन्कलाब झिंदाबाद', 'साम्राज्यवाद नष्ट करा', 'हिंदू मुस्लिम एक आहेत' अशा घोषणा देत मुंबई शहरात मिरवणूक काढली. सरकारले नौसैनिकांच्या बंडाची दखल घेतली. नौसैनिकांचे बंड मोडून काढण्याचे काम हाती घेतले, पण हे बंड मोडून काढणाऱ्या युरोपियन लोकांवर लोकांनी हल्ले केले. लष्कराने सामान्य जनतेवर गोळीबार केला म्हणून संतप्त होऊन २२८ लोक या उठावात मारले गेले अनेकजण जखमी झाले. या उठावाची प्रतिक्रिया म्हणून दिल्ली, मीरत, अंबाला था शहरांतील वायुदलात भारतीय सैनिकांनी उठाव केला. विशेष म्हणजे केंद्रीय कायदेमंडळात बॅ. असफअली यांनी सरकारच्या निषेधाचा व नौसैनिकांच्या समर्थनाचा प्रस्ताव मांडला होता व त्यास सर्व बिनसरकारी भारतीय सदस्यांनी पाठिंबा दिला होता. ब्रिटिश सेनापतीने ब्रिटिश सरकारला कळवले की, भारतीय लष्कर, नौदल, वायुदल हे ब्रिटिशांना एकनिष्ठ राहिलेले नसल्याने भारतात आता ब्रिटिशांची सत्ता टिकणे अशक्य आहे. नौदलाच्या उठावाच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांनी भारतात कॅबिनेट मिशन (त्रिमंत्री योजना) पाठवण्याची घोषणा केली.

**संयुक्त महाराष्ट्राची चळवळ :-**

महाराष्ट्र हे भारतीय संघराज्यातील एक घटकराज्य आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले आहे. दरवर्षी १ मे रोजी महाराष्ट्रात सार्वजनिक सुटी असते. महाराष्ट्र राज्याचा वर्धापनदिन साजरा होतो. अर्थात, तोही प्रामुख्याने शासकीय पातळीवरच. संयुक्त महाराष्ट्र हे मराठी माणसांचे स्वप्न होते व त्या स्वप्नाच्या पूर्तीसाठी अनेकांना तुरुंगवास सहन करावा लागला. १०५ लोकांचे बळी गेले. सेनापती बापट, एस.एम. जोशी, आचार्य अत्रे, कॉ. श्रीपाद अमृत डांगे, भाई उद्धवराव पाटील आदींच्या समर्थ नेतृत्वामुळे महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली होती. पं. नेहरूंचा संयुक्त महाराष्ट्राला विरोध होता व ते त्यांच्या भूमिकेवर ठाम होते, पण संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीमुळे मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत झाला. मतभेद, राजकारण या गोष्टी बाजूस ठेवून मराठी माणूस संयुक्त महाराष्ट्राच्या ध्येयपूर्तीसाठी एकत्र आला. हैदराबाद संस्थानात मराठी भाषिक ५ जिल्हे (सध्याचे ८ जिल्हे) असले तरी येथील नेते व जनता यांच्या मनातही मराठी भाषिकांचा संयुक्त महाराष्ट्र व्हावा, मराठी भाषिकांचे एक स्वतंत्र राज्य असावे असे स्वप्न होतेच. स्वामी रामानंद तीर्थ व त्यांचे सहकारी हे भाषावार प्रांतरचनेचे प्रारंभापासूनच पुरस्कर्ते होते. स्वामी रामानंद तीर्थांनी हैदराबाद येथे जून १९४७ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात भाषिक तत्त्वांवर हैदराबाद संस्थानची पुनर्रचना झाली पाहिजे, मराठवाडा महाराष्ट्र राज्यात सामील व्हावा अशी मागणी केली होती. स्वामीजींनी पं. नेहरूंच्या भूमिकेची किंवा मताची पर्वा न करता भाषावार प्रांतरचनेच्या मागणीचा उल्लेख हैदराबादच्या त्या अधिवेशनात पं. नेहरूंच्या उपस्थितीत केला होता हे विशेष होय. स्वामीजीचे हे मत प्रातिनिधिक स्वरूपाचे होते. हैदराबाद संस्थानातील मराठवाड्यातील मराठी भाषिकांच्या मनातही संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न होते व ते स्वप्नच स्वामीजींनी पं. नेहरूंच्या समोरच त्यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला स्पष्ट नकार असतानाही मांडले होते हे विशेष होय. मराठी भाषिकांना गुजरातचे आर्थिक व राजकीय वर्चस्व अमान्य होते. स्वातं काळात इ.स. १९३७, १९४६ मध्ये गुजराती भाषिक पण मुंबई निवासी बाळासाहेब दोनदा मुख्यमंत्री झाले होते. त्यांच्या मंत्रिमंडळातील महत्त्वाची खाती ही गुजराती भाषिक मंत्र्यांकडे होती. ही बाब मराठी भाषिकांना खटकणारी होती.

ब्रिटिश राजवटीत मराठी भाषिक प्रदेश हा अनेक प्रांतांत व देशी संस्थानांत विभागलेला होता. मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश व विदर्भावर ब्रिटिशांची सत्ता होती तर मराठवाड्यावर हैदराबादच्या निझामाचे राज्य होते. दक्षिण महाराष्ट्रातील १६ छोट्या-मोलमा संस्थानांवर देशी संस्थानिकांचे राज्य होते. विविध भागांवर भिन्न सत्ता असल्या तरी क मराठी भाषिकांचे एकच राज्य असावे असा विचार २० व्या शतकाच्या प्रारंभापासूनच राजकीय नेते, साहित्यिक वगैरे मांडत होते. महाराष्ट्राच्या एकीकरणाचे स्वप्न ज्यांनी इ.स १९४६ पूर्वीच पाहिले होते त्यांची नावे -

१) न. चिं. केळकर (साहित्यसम्राट) २) श्री. व्यं. केतकर (ज्ञानकोशकार)
३) दत्तो अप्पाजी तुळजापूरकर ४) के. सी. ठाकरे (प्रबोधनकार) -
५) ग. वि. पटवर्धन (जयपूर) ६) ('ज्योत्स्ना' मासिकाचे संपादक) प्रा. विठ्ठल वामन ताह्मणकर
६) शंकर रामचंद्र शेंडे (सांगली)
७) ग. त्र्यं. माडखोलकर ८) दत्तो वामन पोतदार ९) धनंजयराव गाडगीळ
१०) लालजी पेंडसे. ११) आचार्य विनोबा भावे

यांनी इ.स.१९१७ मध्ये जनार्दन विनायक ओक यांच्या संपादकत्वाखाली प्रकाशित होणाऱ्या 'लोकशिक्षण' या मासिकाच्या वैशाख अंकात 'तिभंगलेला महाराष्ट्र' हा लेख नकाशासह प्रकाशित केला होता. या लेखात मुंबई प्रांत, मध्य प्रांत, वऱ्हाड आणि हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा या भागातील मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणून एकसंध महाराष्ट्राची निर्मिती करावी असे म्हटले होते. साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनी 'केसरी'त 'भाषा व राष्ट्रीयत्व' हा लेख लिहून, 'मराठी भाषा बोलणारांची सर्व लोकसंख्या एक अमलाखाली आणावी.' आचार्य विनोबा भावे यांनी त्यांच्या 'महाराष्ट्र धर्म' या लेखात संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेचा पुरस्कार केला होता. इ.स. १९३७ मध्ये दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्राचा ठराव एकमताने पास करण्यात आला होता.

ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली ६ जानेवारी १९४० रोजी उज्जैन येथे मराठी वाङ्मय मंडळाचे संमेलन भरले होते. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'महाराष्ट्राचे युद्धोतर भवितव्य' या विषयावर भाषण केले. त्यात त्यांनी म्हटले होते. 'नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत पसरलेला सारा मराठी मुलूख एका राजकीय सत्तेच्या, एका मध्यवर्ती विद्यापीठाच्या आणि एका सर्वव्यापी राष्ट्रसंस्थेच्या छत्राखाली आणावयाचा; महाराष्ट्रातील एका रक्ताच्या आणि एका भाषेच्या लोकांचे मुलतानपासून मडगावपर्यंत एकसंध राष्ट्र (राज्य) निर्माण करावयाचे हे ध्येय आपण ईर्षेने वाढीस लावले पाहिजे.' ग. वि. पटवर्धन यांनी 'ज्योत्स्ना' चा वाङ्मयीन नियतकालिकामधून ४० पुढाऱ्यांना व लेखकांना एक प्रश्नपत्रिका पाठविली आणि त्यांच्या मुलाखती घेऊन सारांश छापला होता. त्यानुसार प्रथम महाविदर्भ निर्मितीची चळवळ हाती घ्यावी असे मध्य प्रांत व वऱ्हाडातील बहुतेक नेत्यांना वाटत होते.

महाविदर्भ, मराठवाडा, देश (पश्चिम महाराष्ट्र), कोकण व मुंबई शहर या ५ भागांतील लोकांचे स्नेहसंबंध वाढविण्याच्या उद्देशाने संयुक्त महाराष्ट्र सभा स्थापन करण्याचा विचार पुढे आला होता. तिची स्थापना करण्यामध्ये दा. वि. गोखले, ग. त्र्यं. माडखोलकर, शिवाजीराव पटवर्धन, श्री. शं. नवरे, त्र्यं. वि. पर्वते वगैरेंनी सहभाग घेतला होता (इ.स.१९३५). ५ वर्षात ३ ते ४ हजार तहहयात सभासदांची नोंदणी करून संयुक्त महाराष्ट्र परिषद भरविण्याची योजना आखण्यात आली होती. २८ जानेवारी १९४० रोजी द.वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील सरदारगृहात संयुक्त महाराष्ट्र सभा स्थापन करण्यात आली. धनंजयराव गाडगीळ, य.रा. दाते, ग.वि. पटवर्धन व शं. रा. शेंडे यांच्या मदतीने लक्ष्मण श्रीधर वाकणकर यांनी संयुक्त महाराष्ट्राची व्याप्ती व मर्यादा दाखविणारा नकाशा तयार केला होता.

महाविदर्भ सभा: ऑगस्ट १९४० मध्ये मुंबईत बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ सभा स्थापन झाली. का. तु. देशमुख, ए.श्री. पटवर्धन हे दोघे महाविदर्भ सभेचे चिटणीस होते. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी चिटणीस व्हावे असा आग्रह धरला गेला; पण त्यांनी कोणतेही पद न स्वीकारता २० वर्षे महाविदर्भ सभेचे काम पाहिले. महाविदर्भचे खरे सूत्रधार बापूजी अणे होते. विदर्भातील लोकांच्या हिताचे रक्षण व संवर्धन करणे हे या सभेचे उद्दिष्ट होते. ३ ऑक्टोबर १९४३ रोजी बॅ. मुकुंदराव जयकरांच्या अध्यक्षतेखाली ही सभा भरली. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाल्यावर पश्चिम महाराष्ट्राचे त्यावर वर्चस्व प्रस्थापित होईल अशी भीती बॅ. जयकर यांच्यासह महाविदर्भाच्या सर्वच पुरस्कर्त्यांना वाटत होती.

महाराष्ट्र एकीकरण सभा (१९४२) नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू टी. जे. केदार यांच्या नेतृत्वाखाली ही सभा स्थापन झाली. सर्व मराठी भाषा बोलणारांचे एक राज्य असावे अशी मागणी या सभेने केली होती. इ.स. १९४६ चा बेळगाव साहित्य संमेलनातील ठराव १२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे ३० वे मराठी साहित्य संमेलन भरले. संमेलनाचे अध्यक्ष ग. त्र्यं. माडखोलकर यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा ठराव मांडताना नियोजित मराठी भाषिक राज्याचा भूप्रदेश व सीमारेषांचा स्पष्ट उल्लेख केला. वऱ्हाड, मराठवाडा, गोमंतक हे ३ भूभाग ब्रिटिश, निजाम व पोर्तुगीज या ३ सत्ताधीशांखाली नांदत आहेत व त्यांची लोकसंख्या ९० लाख आहे. या वस्तुस्थितीकडे श्रोत्यांचे लक्ष वेधविले. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेकरिता प्रयत्न करता यावेत म्हणून शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली.

**संयुक्त महाराष्ट्र समितीचे उद्देश :-**

१) भाषावार प्रांतरचनेच्या तत्त्वांनुसार महाराष्ट्र राज्यात अजून समाविष्ट न झालेले मराठी भाषिकांचे सलग प्रदेश या राज्यास जोडून घेणे.

२) लोकसत्ताक व समाजवादी महाराष्ट्र निर्माण करणे.

३) सामाजिक, आर्थिक व राजकीय समता प्रस्थापित करून महाराष्ट्राच्या जीवनाची सहकारी तत्त्वांवर उभारणी करणे.

४) समितीने पुरस्कृत केलेला कार्यक्रम तडीस नेणे.

इ.स. १९५५ पर्यंत ही परिषद होती. संयुक्त महाराष्ट्र परिषदेत शंकरराव देव, दत्तो वामन पोतदार, केशवराव जेधे, श्री. शं. नवरे व ग.त्र्यं. माडखोलकर हे सभासद होते सामोपचाराच्या, मनधरणीच्या व वाटाघाटीच्या मार्गाने आपण ही मागणी पदरात पाडून घेवू यावर शंकरराव देव यांचा विश्वास होता. संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे ३ ठराव

ग.त्र्यं. माडखोलकर, पु.ल. देशपांडे, शं.द. पेंडसे यांनी पाठविले होते. ३ ठरावांना पाठिंबा असल्याचे बॅ. जयकर, विनोबा भावे, शंकरराव देव, रा.कृ. पाटील, दिगंबरराव बिंदू ,आ.कृ. वाघमारे, पंजाबराव देशमुख वगैरे राजकीय नेत्यांनी ग.त्र्यं. माडखोलकर यांना पत्र पाठवून कळवले होते; पण शंकरराव देव, काका गाडगीळ व बाळासाहेब खेर या ३ काँग्रेस नेत्यांनी या प्रश्नात आस्था न दाखविल्याबद्दल ग.त्र्यं. माडखोलकर यांनी नाराजी व्यक्त केली होती.

विदर्भातील चार-पाच प्रमुख मराठा पुढाऱ्यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पाठिंबा होता. ते पुढारी म्हणजे बॅ. रामराव देशमुख, पंजाबराव देशमुख, का. तु. देशमुख आणि गोपाळराव खेडकर देशमुख तसेच पंढरीनाथ पाटील हे होत.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस प्रारंभ झाल्यापासूनच 'संयुक्त महाराष्ट्र' हे मराठी भाषिकांचे राज्य होणार की मराठ्यांचे अशी शंकाही घेतली जाऊ लागली होती. तसेच संयुक्त महाराष्ट्रात अस्पृश्य जातींचे स्थान काय असणार? असाही प्रश्न विचारला जात होता. ना. रा. शेंडे या अस्पृश्य लेखकाने जुलै १९४६ मध्ये 'तरुण भारत' मध्ये लेख लिहून हा प्रश्न उपस्थित केला होता. गणेश आक्काजी गवई व हेमचंद्र खांडेकर यांनी संयुक्त महाराष्ट्रास पाठिंबा दिला होता. अस्पृश्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राजसत्तेचा वाटा महाराष्ट्राचे एकीकरण झाल्यास मिळेल असा विश्वास हेमचंद्र खांडेकर यांना वाटत होता. भाषावार प्रांतरचनेमुळे ऐक्यभावना वाढीस लागण्याऐवजी हिंदुस्थानचे अधिक तुकडे पडतील असे. डॉ. आंबेडकरांना वाटत होते.

**काँग्रेस नेत्यांच्या भूमिका**

म. गांधी हे भाषावार प्रांतरचनेचे इ.स. १९२० पासून खंदे पुरस्कर्ते होते. भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व स्वातंत्र्यपूर्व काळातच काँग्रेसने स्वीकारले होते. म्हणजे मराठी भाषिकांचे राज्य असावे या गोष्टीस त्यांचा पाठिंबा होता. राजेंद्रप्रसादही संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते होते; पण जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद, राजाजी, आचार्य कृपलानी वगैरे काँग्रेस नेत्यांना भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न निकडीचा वाटत नव्हता. शंकरराव देव यांची संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत चढाईचे धोरण स्वीकारून काँग्रेस श्रेष्ठींची नाराजी पत्करण्याची तयारी नव्हती. या प्रश्नावरून काँग्रेस श्रेष्ठींना धुडकावून २५ वर्षे कमावलेली कमाई ते वाया घालवू इच्छित नव्हते. पं. नेहरू भाषावार प्रांतरचनेची मागणी करणाऱ्यांना संकुचित प्रांतवादी ठरवित होते. बापूजी अणे स्वतंत्र विदर्भाचे पुरस्कर्ते होते. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला त्यांचा विरोध होता. आंध्र प्रांताच्या निर्मितीची मागणी फार अडचणी न येता मान्य करण्यासारखी आहे असे वैयक्तिक मत देऊन तेलगु भाषिकांना नेहरूंनी थोडीशी आशा दाखविली.

**अकोला करार (८ ऑगस्ट १९४७)**

शंकरराव देव, शेषराव वानखेडे, बापूजी अणे, श्रीमन्नारायण अग्रवाल, पंजाबराव देशमुख, पंढरीनाथ पाटील, पूनमचंद रांका, रामराव देशमुख, दा. वि. गोखले, द. वा. पोतदार, धनंजयराव गाडगीळ, ब्रिजलाल बियाणी, गोपाळराव खेडकर, प्रमिला ओक, मारोतीराव कन्नमवार, ग. त्र्यं. माडखोलकर व जी. आर. कुलकर्णी या १६ जणांनी अकोला शहरात ७ व ८ ऑगस्टला वाटाघाटी करून करार केला. तो 'अकोला करार' म्हणून ओळखला जातो. त्यातील कलमे
-१) संयुक्त महाराष्ट्राच्या एका प्रांतात महाविदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र असे दोन प्रांत असावेत.
२) त्या दोन प्रांतांना स्वतंत्र कायदेमंडळे व मंत्रिमंडळे द्यावीत.
३) उपप्रांतांसाठी दोन वरिष्ठ न्यायालये स्थापन करावीत.
४) उपप्रांताच्या कायदे मंडळाच्या निवडणुका स्वतंत्रपणे घ्याव्यात.
५) संपूर्ण प्रांतासाठी एक गव्हर्नर व दुय्यम गव्हर्नर असावा आणि एक लोकसेवा आयोग असावा.

हा करार प्रामुख्याने धनंजयराव गाडगीळ यांच्या योजनेवर आधारित होता. महाविदर्भाचा उपप्रांत करण्यास पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांनी मान्यता दिली तरी उपप्रांत असावेत की नसावेत याचा अंतिम निर्णय घटना परिषद घेणार होती. वास्तविक अणे व विदर्भ केसरी बियाणी या दोघांनी संपूर्ण मराठी प्रदेशांचे एक महाराष्ट्र राज्य करण्याच्या योजनेला संमती दिली होती; पण त्या दोघांनी अकोला करारावर सही करून त्यांचा दुटप्पीपणा दाखविला. जे. व्ही. पी. समितीची स्थापना १९४८ मध्ये जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभीसीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती

नेमली होती. या समितीने भाषावार प्रांतरचना काँग्रेसला तत्त्वतः मान्य आहे; पण त्यासाठी सध्या योग्य वेळ नाही असे मत मांडले. योग्य वेळ येताच आंध्र प्रांत बनविला जाईल. मराठी भाषिकांचा महाराष्ट्र बनेल; पण त्यात मुंबई असणार नाही. वऱ्हाडाचा प्रांत वेगळा असणार नाही. कर्नाटकमधील अडचणी संपताच त्या प्रांताची निर्मिती केली जाईल. त्रावणकोर व कोचीन एकत्र येण्यास तयार असतील तर केरळ प्रांताची निर्मिती करण्यात येईल. या शिफारशी केल्या होत्या. या अहवालाविरुद्ध महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटली होती.

**न्यायमूर्ती दार (धर) अयोग (इ.स. १९४८)**

घटना समितीने भाषा प्रांतरचनेच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी (अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायधिश) दार यांच्या एकसदस्यीय समितीची १७ जून १९४८ रोजी नियुक्ती केली; या अयोगाचे जगतनारायण लाल, पन्नालाल (निवृत्त ICS) हे सदस्य होते. दार अयोगापुढे ७०० अधिक लोकांनी साक्ष दिली व १०००० लेखी पाने अयोगाकडे सादर करण्यात आले. पण दार समितीने भाषावार प्रांतरचनेमुळे भारताची विभागणी छोट्या छोट्या प्रांतांत होईल त्यामुळे भारताचे ऐक्य धोक्यात येईल हे कारण सांगून संयुक्त महाराष्ट्राची मागणी फेटाळली. भाषा हा एकच व प्रमुख घटक मानून नवीन प्रांतरचना करणे हे सध्या राष्ट्राच्या हिताचे नाही, भाषिक राज्ये राष्ट्रवादाच्या प्रगतीच्या मार्गात अडथळे आणतात असे पार कमिशनने म्हटले होते. काँग्रेस पक्षाने इ.स. १९४८ मध्ये दार आयोगाचा अभ्यास करण्यासानी पं. नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल व पट्टाभिसीतारामय्या या तिघांची समिति नियुक्त केली या समितीनेदेखील आंध्र प्रदेशाचा अपवाद वगळून भाषावार प्रांतरचना लांबणीवर टाकण्याची शिफारस केली होती. आचार्य अत्रे व आर. डी. भंडारे यांनी २८ नोव्हेंबर १९४९ रोजी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीविषयीचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेत मांडला होता. संयुक्त महाराष्ट्र परिषद शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाली; पण काँग्रेस श्रेष्ठीचा मुख्यतः नेहरूंचा त्यास विरोध असल्याचे पाहून त्यांची कोंडी झाली होती. इ.स. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी समाजवादी व साम्यवादी पक्षांनी भाषावार प्रांतरचनेची मागणी करून हा प्रश्न ज्वलंत ठेवला. बिगर मराठी मंडळींना मुंबई शहर महाराष्ट्रात असू नये असे वाटत होते. मोरारजी देसाईंपासून समाजवादी पक्षाच्या पुरुषोत्तमदास विक्रमदासपर्यंत सर्वांचे याबाबत एकमत होते. दार अहवालाचा संयुक्त महाराष्ट्रवादी नेत्यांनी निषेध केला होता. पोट्टी श्रीरामलू यांचे बलिदान भाषावर प्रांतरचनेसाठी आंध्र प्रदेशातून तेलगू भाषिकांनी चळवळ उभी केली. त्यांना तेलगू भाषिकांचे स्वतंत्र राज्य हवे होते. श्री. पोट्टी श्रीरामलु यांनी तेलगू राज्याच्या निर्मितीसाठी उपोषण सुरू केले (इ.स.१९५२). त्यांनी सतत ४५ दिवस उपोषण केले व त्यातच त्यांचे निधन झाले. त्यानंतर तेलगू भाषिक प्रदेशात दंगली उसळल्या. त्यामुळे असंतोषाची लाट संपूर्ण आंध्र प्रदेशात पसरली. पं. नेहरूंनी तेलगू भाषिकांचे आंध्र प्रदेश या स्वतंत्र राज्याची घोषणा केली (५ डिसेंबर १९५२). आंध्र प्रदेशाची निर्मिती करून १ ऑक्टोबर १९५३ रोजी आंध्र राज्य अस्तित्वात आले. हैदराबाद संस्थानच्या फाळणीला पंडित नेहरूंचा विरोध होता. हैदराबाद मुक्तिलढ्याचे नेते स्वामी रामानंद तीर्थ हे संयुक्त महाराष्ट्राची मागणी वारंवार करत होते. पं. नेहरूंचा त्या मागणीस स्पष्ट नकार होता. काका गाडगीळ, त्र्यं. रं. देवगिरीकर वगैरेही नेहरूंच्या पुढे दबावाखाली गप्प राहिले. मुंबई विधानसभेत संयुक्त महाराष्ट्राचा ठराव यशवंतराव मोहिते आणणार होते; परंतु मोरारजी देसाई यांच्या विरोधामुळे तो येऊ शकला नाही. विदर्भातील अणे व बियाणी या दोघांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी उचलून धरली. त्यास प्रतिशह देण्यासाठी म्हणून तिन्ही विभागातील मराठी माणसे एकत्र आणून नागपूर येथे बैठका ल्या व त्यातूनच 'नागपूर करार' झाला.

**नागपूर करार (२८ सप्टेंबर १९५३)**

संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्याची दर्भाची मानसिकता नव्हती व त्यास विरोध होता. मराठी भाषिक राज्याचा प्रश्न सोडविण्यासाठी शंकरराव देव यांच्या पुढाकाराने श्री. पी. के. देशमुख या मंत्र्याच्या निवासस्थानी बैठक आली. या बैठकीला स्वतः शंकरराव देव, प्रभाकर कुंटे, मराठवाड्यातून स्वामी रामानंद सार्थ व देवीसिंह चौहान, विदर्भातर्फे डॉ. गोपाळराव खेडकर, पी.के. देशमुख, शेषराव वानखेडे हे उपस्थित होते. नागपूर करारावर १२ नेत्यांच्या सह्या आहेत - १) विदर्भ : आर. के. पाटील, पंढरीनाथ पाटील, गोपाळराव खेडकर, लक्ष्मणराव भटकर, रामराव देशमुख, शेषेराव वानखेडे, पंजाबराव देशमुख.

२) पश्चिम महाराष्ट्र: भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, देवकीनंदन नारायण, माना कुंटे.

३) मराठवाडा :- देवीसिंह चौहान हे या बैठकीला हजर नव्हते; पण त्यांची स्वाक्षरी नंतर घेण्यात आली होती. शंकरराव देव व स्वामी रामानंद तीर्थ यांनी चर्चेत भाग घेतला; पण त्यांच्या करारावर सह्या नव्हत्या.

**नागपूर कराराचे मुद्दे :-**

१) भारतातील राज्यांची नव्याने स्थापना व पुनर्रचना करण्याच्या प्रश्नावर अहवाल देण्यासाठी एका उच्चाधिकार आयोगाची नेमणूक करण्यात आली असल्याने आम्ही, मराठी भाषिक प्रदेशात वास्तव करीत असलेले लोक या सर्व भागांचे एक राज्य स्थापन करण्याच्या दृष्टीने खालील निष्कर्षाप्रत आलो आहेत.

२) सध्याच्या मुंबई, मध्य प्रदेश व हैदराबाद राज्यातील मराठी भाषिक प्रदेशांचे मिळून हे राज्य स्थापन केले जावे. या राज्याच्या सीमेत व मर्यादेत कोणत्याही भागाचे वेगळे अस्तित्व राहू नये. त्या राज्याला महाराष्ट्र किंवा मराठी प्रदेश असे म्हटले जाईल व मुंबई ही त्याची राजधानी असेल.

३) सर्व प्रकारच्या विकास व प्रशासनासाठी महाविदर्भ, मराठवाडा व राज्याचा बाकीचा भाग असे या राज्याचे तीन विभाग असतील.

४) एकाच नियंत्रणाच्या गरजेनुसार विविध प्रदेशांवर खर्च करावयाचे वाटप त्या प्रदेशाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात केले जाईल; परंतु मराठवाड्याची अविकसित स्थिती लक्षात घेता या विभागाच्या सार्वत्रिक विकासाकडे खास लक्ष दिले जाईल. याबाबतचा अहवाल राज्य विधानसभेपुढे दरवर्षी ठेवण्यात येईल.

५) सरकारच्या रचनेत त्या त्या विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान राहील.

६) धंदेव्यवसाय, औद्योगिक, वैज्ञानिक व इतर खास प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांत प्रवेश देताना या विभागाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य व समान संधी उपलब्ध करून देण्याची हमी देण्यात येईल.

७) या नव्या राज्याच्या मुख्य न्यायालयाचे मुख्य पीठ मुंबई येथे तर दुसरे पीठ मामपुर येथे असेल. नागपूर येथील पीठ सामान्यतः महाविदर्भ परिसरासाठी कार्यरत असेल, न्यायाधीशांची नियुक्ती करण्यासाठी नावे सुचविताना महाविदर्भाला तेथील सेवा व जा कौन्सिलानुसार योग्य प्रतिनिधित्व मिळेल याची खबरदारी घेतली जाईल. हीच गोर मराठवाडा विभागासाठी चपखलपणे लागू होईल.

८) सरकारी किंवा सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या संस्थांतील सर्व श्रेणीतील नोकऱ्या देताना त्या त्या विभागाला लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान दिले जाईल.

९) प्रशासनाशी जनतेचा अधिक चांगला संबंध येण्याचे साधन म्हणून विकेंद्रीकरण हा परिणामकारक मार्ग आहे यावर आमचा विश्वास आहे.

१०) महाविदर्भातील लोकांचा नागपूरशी राजधानी म्हणून फार पूर्वीपासून संबंध आहे

त्याचे विविध फायदे त्यांना मिळाले आहेत याची आम्हाला जाणीव आहे. राज्य प्रशासनाचे कार्यक्षम नियंत्रण ठेवून हे सर्व फायदे शक्य तितके कायम ठेवावेत असे आम्हाला वाटते. या कलमाच्या अंमलबजावणीसाठी तज्ज्ञांचा सल्ला घेतला जाईल. विधानसभेचे वर्षातील एक अधिवेशन (हिवाळी) नागपूरमध्ये घेतले जाईल व निश्चित काळासाठी सरकार तेथे हलवले जाईल.

११) सर्व मराठी भाषिकांना राज्यात सामावून घेण्यासाठी खेडे हा घटक धरून ताज्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या सीमा आखल्या जातील.

या कराराचे राज्यभरात स्वागत झाले. स. का. पाटील यांना नागपूर करार मान्य नव्हता. २१ नोव्हेंबर १९५३ रोजी औरंगाबाद येथे मराठवाडा विकास संघातर्फे जाहीर सभा आयोजित करण्यात आली. त्या सभेत एक नेते काशीनाथराव वैद्य यांनी नागपूर करार मराठवाड्याचा अपमान आहे असे प्रतिपादन केले. मराठवाड्याचा स्वतंत्र प्रदेश बनवावा व पैठण ही त्याची राजधानी करावी ही त्यांची भूमिका होती; पण त्याकडे कोणी फारसे लक्ष दिले नाही. विशेष म्हणजे काशीनाथराव वैद्य हे तेव्हा हैदराबाद विधानसभेचे अध्यक्ष होते. संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या जिल्हा शाखा स्थापन करण्यात आल्या. जिल्हा पातळीवरील शाखांनीही भाषावार प्रांतरचनेस पाठिंबा व्यक्त केला होता.

**राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना**

डिसेंबर १९५३ मध्ये लोकसभेत राज्य पुनर्रचना आयोगाची घोषणा करण्यात आली. सय्यद फाजल अली हे त्या आयोगाचे अध्यक्ष होते. हृदयनाथ कुंजरू व सरदार के. एम. पण्णीकर हे सदस्य होते. या आयोगाला फाजल अली आयोग म्हणतात. या आयोगाला राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नास अनुसरून सर्व महत्त्वाच्या गोष्टींची चौकशी आदीं बाबतचे अधिकार दिलेले होते म्हणून यास उच्चाधिकार आयोग असेही म्हणतात. या आयोगाला आपला अहवाल इ.स.१९५५ पर्यंत सादर करावयाचा होता. जानेवारी १९५४ मध्ये मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. या बैठकीत संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकारिणी पुनर्रचना करण्यात आली.

१) अध्यक्ष शंकरराव देव.

२) कार्याध्यक्ष भाऊसाहेब हिरे.

३) उपाध्यक्ष गोपाळराव खेडकर, स्वामीजी, देवकीनंदन नारायण, केशवराव जेधे, द. वा. पोतदार.

४) कोषाध्यक्ष - प्रा. द.रा. घारपुरे, ल.ह. कान्हेरे.

५) संयुक्त कार्यवाह डॉ. त्र्यं.रा. नरवणे, डॉ. अ.कृ. सोवनी, यशवंतराव मोहिते, ए. श्री. पटवर्धन, गोविंददास श्रॉफ.

६) सभासद शेषराव वानखेडे, रा.कृ. पाटील, देवीसिंह चौहान, दिगंबरराव बिंदू, फुलचंद गांधी.

मार्च १९५४ पासून गोविंदभाई श्रॉफ यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे कार्य मराठवाड्यात बाराने सुरू केले. त्यावेळी स्वामीजी व इतर पक्षांचे प्रतिनिधी मिळून मराठवाडा विभागीय समितीची कार्यकारिणी तयार केली. या कार्यकारिणीने पुढील ठराव एकमताने मंजूर केले.

१) हैदराबाद संस्थानचे विभाजन झालेच पाहिजे.

२) सीमप्रश्न सलोख्याने सोडवण्यात यावा.

३) नागपूर करारास सर्वांनी पाठिंबा द्यावा.

११ मार्च १९५४ रोजी हैदराबाद विधिमंडळातील मराठवाड्याच्या सर्व पक्षांच्या आमदारांची बैठक घेण्यात आली व तिच्यात संयुक्त महाराष्ट्राला एकमुखी पाठिंबा देण्यात आला. २३ मार्च १९५४ रोजी संयुक्त महाराष्ट्र मराठवाडा विभाग समितीची बैठक बॅ. श्रीधरराव वामन नाईक यांच्या निवासस्थानी घेण्यात आली. या बैठकीस सर्व पक्षांचे प्रतिनिधी हजर होते. जिल्हा व तालुका स्तरावरील समित्यांची रचना करण्यात आली. नगरपालिका आणि ग्रामपंचायत यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीस पाठिंबा द्यावा असे ठरले. त्यानुसार असे ठराव पाठविले गेले.

२७ एप्रिल १९५४ रोजी जालना येथे मराठवाडा विभाग संयुक्त महाराष्ट्र समितीचे अधिवेशन घेण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्ष आ.कृ. वाघमारे होते तर र.के. खाडिलकर उद्घाटक होते. शंकरराव देव या अधिवेशनास उपस्थित होते. त्यांच्याच साक्षीने मराठवाडा विभाग समितीने 'संयुक्त महाराष्ट्र हेच आमचे घर' असे घोषित केले. मराठवाड्यात ठिकठिकाणी अधिवेशने घेण्यात आली. त्यापैकी अहमदपूर आणि लातूर तालुका अधिवेशने गाजली.
राज्य पुनर्रचना आयोगाचा दौरा राज्य पुनर्रचना आयोगाने २९ जून १९५४ पासून मुलाखती घेण्याचे काम चालू केले. हैदराबाद येथे काँग्रेस, कम्युनिस्ट आघाडी, संयुक्त महाराष्ट्र परिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद, आमदार, राजकीय नेते, ग्रामपंचायती नगरपालिका वगैरे व्यक्ती, संस्था, संघटनांच्या मुलाखती घेतल्या. या आयोगाच्या सदस्यांनी नांदेड, परभणी, आदिलाबाद, उस्मानाबाद वगैरे ठिकाणी जाऊन मुलाखती घेतल्या. या सर्व ठिकाणी संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशी मागणी करण्यात आली.

३७ वे अ. भा. मराठी साहित्य संमेलन नवी दिल्ली येथे ऑक्टोबर १९५४ साली भरले. त्या संमेलनाचे उद्घाटन पं. नेहरूंनी केले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या संमेलनाचे अध्यक्ष होते तर काकासाहेब गाडगीळ स्वागताध्यक्ष होते. अध्यक्षांनी संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे असी मागणी केली.

राज्य पुनर्रचना कायद्यांची कलमे १० ऑक्टोबर १९५५ रोजी राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल अधिकृतपणे प्रकाशित झाला. न्या. फाजल अली आयोगाने सादर केलेल्या अहवालातील परिशिष्ट १ (अ) अन्वये १९५६ च्या राज्य पुनर्रचना कायद्याची खालील तत्त्वे सांगितली होती.

अ) ठरल्या दिवसापासून खाली नमूद केलेले प्रांत सामील करून मुंबई महणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन राज्याची निर्मिती झाली पाहिजे. विजापूर, धारवाड, हुबळी व कारवार हे चार कन्नड भाषिक जिल्हे कर्नाटक राज्याचे भाग बनले.
ब) बनासकाठा या जिल्ह्यात आबुखेड तालुका. ब) औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद जिल्हे, बीदर जिल्ह्यातील अहमदपूर, उदगीर व निलंगा तालुके, बिचकोंडा आणि जक्कन सर्कल, देगलूर आणि मुधोळ तालुका, नांदेड जिल्हा वगळता मुधोळ तालुक्यातील भियान्सा आणि इस्लामपूर सर्कल, हल्ली अस्तित्वात असलेला हैदराबाद राज्यातील आदिलाबाद जिल्ह्यातील किनवट व राजुरा तालुका. हे सर्व द्विभाषिक मुंबई राज्याचे भाग बनले.
क) हल्ली अस्तित्वात असलेल्या मध्य प्रदेश राज्यातील बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर आणि चांदा व भंडारा जिल्हा.
ड) सौराष्ट्र इ. (१) कच्छ जिल्ह्याचे हल्लीचे भाग आणि त्यानंतर नमूद केलेले प्रांत अनुक्रमे मुंबई, हैदराबाद, मध्य प्रदेश, सौराष्ट्र आणि कच्छ या राज्याचे विभाग राहणार नाहीत.
२) नमूद केलेला चांदगड तालुका हा कोल्हापूर जिल्ह्यात सामील करून त्याचा विभाग होईल. बिदर जिल्ह्यातील अहमदपूर, निलंगा आणि उदगीर तालुके हे उस्मानाबाद जिल्ह्यात सामील होतील. दोन्ही तालुक्यांचे इस्लामपूर सर्कल, किनवट तालुका आणि राजगुरु तालुका हे नांदेड जिल्ह्यात सामील करून ते त्यांचे भाग होतील. हल्लीचा मुंबई राज्यातील कच्छ म्हणून ओळखला जाणारा मुंबई राज्यातील जिल्हा अस्तित्वात येईल.

राज्य पुनर्रचना कायद्यात पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि मध्य असे पाच विभागीय सल्लागार मंडळे नेमण्याची तरतूद आहे. 'फाजल अली कमिशनचा अहवाल म्हणजे महाराष्ट्राचे मृत्युपत्र होय' असे डॉ. आंबेडकरांनी म्हटले होते.

**राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशीस प्रखर विरोध :-** आयोगाच्या अन्यायकारक शिफारशींचा राज्यभर विरोध झाला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने आयोगाच्या शिफारशी एकमताने फेटाळून लावल्या. विरोधाची तीव्रता कमी करण्यासाठी नोव्हेंबर १९५५ रोजी काँग्रेस कार्यकारिणीने 'त्रिराज्यसूत्र' सुचविले. त्यानुसार सर्व मराठी भाषिक भागांचा समावेश असलेले महाराष्ट्र, सर्व गुजराती भाषिक भागांचा समावेश मालेले गुजरात आणि संमिश्र भाषिक मुंबई महानगर अशी तीन राज्ये स्थापन करण्याचा ताव होता. त्यामुळे मराठी भाषिकांवर जाणूनबुजून अन्याय करण्यात येत आहे अशी भावना सार्वत्रिकरीत्या निर्माण झाली. २१ नोव्हेंबर १९५५ रोजी सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली जमलेल्या जनसमुदायावर जो गोळीबार झाला. त्यात १५ जण ठार झाले होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे १०५ हुतात्मे: २० नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईच्या चौपाटीवरील सभेत स. का. पाटील म्हणाले, '५००० वर्षे मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही.' 'जोपर्यंत सूर्य चंद्र तळपत आहेत तोपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही.' असे मोरारजी देसाई यांनी म्हटले होते. (ते १७ एप्रिल १९५२ ते १६ ऑक्टोबर १९५६ ) काळात मुंबई राज्याचे मुख्यमंत्री होते.) मुंबई शहर महाराष्ट्रात समाविष्ट करावे असा उराव २२ डिसेंबर १९५५ रोजी मुंबई महानगरपालिकेतील विरोधी पक्षांनी पास केला. २७ डीसेंबर १९५५ रोजी मुंबई राज्याचे दारूबंदीमंत्री डॉ. त्र्यं.रा. नरवणे यांनी मंत्रिपदाचा व ग्रिसच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. १६ जानेवारी १९५६ रोजी मुंबई शहर केंद्रशासित करण्याचा निर्णय पंडित नेहरूंनी घोषित केल्याने संपूर्ण महाराष्ट्रात त्याविरुद्ध संतप्त प्रतिक्रिया प्रामुख्याने मुंबई शहरात उमटली. १७ जानेवारी ते २२ जानेवारी १९५६ या काळात मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात दंगे झाले. मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश दिले. मुंबईत मराठी, गुजराती, उर्दू, हिंदी, तेलगू आदी एकूण १०५ बहुभाषिक निरपराध लोक गोळीबारात ठार झाले. मुंबई प्रांतात कोल्हापूरसह १८ संस्थाने होती. ही संस्थाने दख्खन संस्थाने म्हणून उल्लेखली जात. त्यांचे जातनिहाय वर्गीकरण १) मराठा जातीची संस्थाने (५) अक्कलकोट, जत, मुधोळ, फलटण, सावंतवाडी. २) पटवर्धनांची संस्थाने (कोकणस्थ ब्राह्मण) (८) सांगली, जमखिंडी, रामदुर्ग, मिरज (थोरली पाती), मिरज (धाकटी पाती), कुरुंदवाड (थोरली पाती), कुरुंदवाड (धाकटी पाती) ३) देशस्थ ब्राह्मणांची संस्थाने (२) औंध (पंतप्रतिनिधी), भोर (पंतसचिव), ४ ) मुस्लिम संस्थाने जंजिरा, सावनूर.

कोल्हापूर वगळता अन्य वरील संस्थाने ८ मार्च १९४८ रोजी मुंबई राज्यात विलीन झाली. त्यामुळे ७८१५ चौरस मैलांचे क्षेत्र मुंबई राज्याचा भाग बनले. १६,९३,१०१ लोकसंख्येची मुंबई राज्याच्या एकूण लोकसंख्येत भर पडली व मुंबई राज्याच्या उत्पन्नात १,४२,१५,५९९ रुपये भर पडली. कमलनयन बजाज यांनी संस्थाने व काँग्रेस यांच्यात करार व्हावा म्हणून प्रयत्न केले.

१ नोव्हेंबर १९५६ रोजी करण्यात आलेल्या राज्य पुनर्रचनेमुळे मुंबई प्रांतातील विजापूर, हुबळी, धारवाड व कारवार हे कन्नड भाषिकांचे ४ जिल्हे कर्नाटक राज्याचे भाग बनले. नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद व औरंगाबाद हे मराठवाड्याचे ५ जिल्हे राज्याचे भाग बनले. (१६ जानेवारी १९५६).

**द्वैभाषिक मुंबई राज्याची घोषणा :-**

केंद्र सरकारने मुंबईसह मराठी भाषिक आणि गुजराती भाषिक प्रदेशांचा समावेश करून विशाल मुंबई राज्याच्या स्थापनेचा निर्णय दि. ७ ऑगस्ट १९५६ रोजी संसदेत पास केल्य त्यामुळे महाराष्ट्रात असंतोषाची लाट निर्माण झाली. ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर १९५६ रोजी मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर भव्य मंडपात संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांची व कार्यकर्त्याची महाद्विभाषिक विरोधी परिषद घेण्यात आली. सेनापती बापट, भाई माधवराव बागल, एस. एम. जोशी, बी.टी. रणदिवे, जयंतराव टिळक, दत्ता देशमुख, यशवंतराव मोहिते, आनंदराव चव्हाण, आ. उद्धवराव पाटील, प्र. के. अत्रे या परिषदेला हजर होते. द्विभाषिक राज्य मोडीत काढावे व त्यासाठी समितीने प्रखर आंदोलन करावे ठराव यावेळी संमत झाला. शिवाजी पार्कवर जाहीर सभेमध्ये माधवराव बागल यांनी मराठी दैनिकावर टीकेची झोड उडविली. लोकसत्ता, नवशक्ती व सकाळ ही वृत्तपत्रे भांडवलदारांच्या व स.का. पाटील यांच्या हाती होती व ती संयुक्त महाराष्ट्राच्या बाजूने नव्हती. १ नोव्हेंबर १९५६ रोजी या मुंबईसह द्वैभाषिक राज्याचे पहिले व शेवटचे मुख्यमंत्री म्हणून मा यशवंतराव चव्हाण यांनी जबाबदारी स्वीकारली. हे द्वैभाषिक राज्य गुजरातलाही माभ्य नव्हते व महाराष्ट्रालाही मान्य नव्हते. या द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण होते.

३ जुलै १९५६ रोजी लोकसभेत स.का. पाटील यांनी विशाल द्विराज्याचे गोडवे गायिले. अशोक मेहता, चिंतामणराव देशमुख यांचाही द्वैभाषिक राज्यास पाठिंबा होता. संसदेतील २३२ सदस्यांनी विशाल द्विभाषिकाचा पुरस्कार करणारे निवेदन अंतप्रधानांना सादर केले होते तर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने द्वैभाषिक स्वीकारण्याचा ठराव १२१ विरुद्ध १ मताने मान्य केला. ३२ आमदारांनी या द्वैभाषिक राज्यास विरोध म्हणून राजीनामे दिले. द्वैभाषिक राज्य चालविणे हे अतिशय कठीण व किचकट काम होते. त्यासाठी साडेतीन वर्षे यशवंतरावांना तारेवरची कसरत करावी लागली. द्वैभाषिकांच्या मंत्रिमंडळातून भाऊसाहेब हिरे, ब्रिजलाल बियाणी, दिगंबरराव बिंदू या ३ जणांना वगळले होते. मोरारजी देसाई यांच्याकडील गृहखाते स्वतःकडे घेतले होते. संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनी द्विभाषिक मोडावे व संयुक्त महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये स्वतंत्र व्हावीत ही भूमिका जनसामान्यांत रुजवली. शासकीयदृष्ट्या द्वैभाषिक मुंबई राज्य चांगले असले तरी लोकभावना मात्र त्या अजिबात अनुकूल नाही आणि राजकीयदृष्ट्या हा प्रयोग यशस्वी होणार नाही हे आपले मत पं. नेहरूंपुढे चव्हाणांनी निर्भीडपणे मांडले होते.

शेतकरी कामगार पक्ष व संयुक्त महाराष्ट्र चळवळ संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कोतकरी कामगार पक्ष व पक्षाचे सरचिटणीस शंकरराव मोरे यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. २८ जानेवारी १९४९ रोजी एक पत्रक काढून संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी जनतेने जरूर तो त्याग करण्यास तयार व्हावे असे म्हटले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या पूर्ततेसाठी खालील मार्गाचा अवलंब करावा असे मोरे यांनी सुचविले होते.

१) कायदेमंडळातील मराठी भाषा बोलणाऱ्या सर्व सभासदांनी राजीनामे द्यावेत.

२) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभासदांनी राजीनामे द्यावेत.

३) संयुक्त महाराष्ट्र होईपर्यंत केंद्र व प्रांत सरकारचे कर जनतेने देऊ नयेत.

४) सर्वपक्षीय परिषद बोलवावी.

शंकरराव मोरे यांनी 'लढ्याशिवाय संयुक्त महाराष्ट्र होणार नाही' या शीर्षकाचे ३ लेख 'जनसत्ता'च्या १३ एप्रिल, ७ मे व १५ मे १९४९ च्या अंकात प्रसिद्ध करून आपली भूमिका मांडली. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न हा परप्रांतीय

भांडवलदार विरुद्ध महाराष्ट्रातील दरिद्री-किसान कामगार असा आर्थिक व वर्गीय लढा आहे असा मोरे यांचा युक्तिवाद होता. शंकरराव देव, काका गाडगीळ, भाऊसाहेब हिरे, संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या गटाचे नेते पं. नेहरू, पटेल व पट्टाभिसीतारामय्या वगैरे मातब्बरांच्या पुढे उघड लढ्यात टिकू शकणार नाहीत हे वास्तव त्यांनी मांडले. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नी काँग्रेसवर अवलंबून न राहता समाजवादी पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन व हिंदू महासभा, रा. स्व. संघ या पक्ष व संघटनांनी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्राची चळवळ फुलवली पाहिजे, या कामासाठी त्यांनी आपापसांतील मतभेद विसरून एकत्र आले पाहिजे असे म्हटले होते.

शंकरराव मोऱ्यांनी 'कर्नाटकी बंड व महाराष्ट्र थंड' या नावाचा लेख सा. 'जनसत्ता'च्या १७ डिसेंबर १९४९ च्या अंकात प्रसिद्ध केला. कर्नाटकात काँग्रेस आमदारांनी स्वतंत्र कर्नाटकाच्या मागणीसाठी राजीनामे दिले. त्यांचाच आदर्श, समोर ठेवून संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा म्हणून महाराष्ट्रातील आमदारांनीही राजीनामे द्यावेत असे त्यांनी सुचवले जनतेनेच जागे होऊन लढ्याचे शिंग फुंकल्याशिवाय संयुक्त महाराष्ट्र होणार नाही असे ते म्हणत. कोल्हापूर, ठाणे या जिल्ह्यांत संयुक्त महाराष्ट्राच्या परिषदाच्या व्यासपीठावरूनही मोरे यांनी संयुक्त महाराष्ट्राचा आग्रह धरला होता. तसेच तालुका व शहर स्तरांवरील संयुक्त महाराष्ट्र परिषदांना ते उपस्थिती लावत व त्याप्रश्नी आग्रहाने भूमिका मांडत. शे.का. पक्षाचे नेते म्हणून केशवराव जेथे यांनी दार कमिशनच्या अहवालावर टीका केली होती. शंकरराव मोरे यांच्याबरोबरच शेतकरी कामगार पक्षाचे अनेक नेते उदा. माधवराव बागल, आ. वराळे, आ. व्ही.एस. पाटील, नरसिंगराव देशमुख, उद्धवराव पाटील, केशवराव जेधे आदींनी संयुक्त महाराष्ट्राचा आग्रह धरला होता. शंकरराव मोरे यांनी खासदार नात्याने मुंबई मराठी भाषिक प्रांताची सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक बाजू संसदेत मांडली होती. पण संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या शेवटच्या टप्प्यात जेव्हा ही व्यापक, आक्रमक बनली.

शंकरराव मोरे यांनी इ.स. १९५६ मध्ये काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. पक्षशिस्त म्हणून त्यांना मागे बसावे लागले; पण प्रारंभीच्या ८-१० वर्षांच्या काळात विविध व्याख्याने, परिषदा व साप्ताहिके यांत लेखन करून त्यांनी या संदर्भात मोठे योगदान दिले ते नक्कीच यांनी पं. नेहरू, गोविंद वल्लभ पंत यांच्याशी संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर चर्चा केली संयुक्त महाराष्ट्र समितीने जेव्हा संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर आंदोलन सुरू केले क्रांतिसिंह नाना पाटील, भाई उद्धवराव पाटील यांनी ग्रामीण भागात रान पेटविले. उध्दवराव पाटील हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीत व सत्याग्रहात अग्रणी असावयाचे. 'भाषावार प्रांतरचना ही मराठी जनतेच्या न्याय्य हक्कांची चळवळ आहे. ती कोणीही दडपू शकणार नाही' असे उद्धवराव पाटील जाहीरपणे सांगत. संयुक्त महाराष्ट्र समितीत त्यांनी पो.क पक्षाचे प्रतिनिधी म्हणून काम केले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ग्रामीण भागात पोहोचविण्यात नाना पाटील, उद्धवराव पाटील यांचा महत्त्वाचा वाटा होता. संयुक्त महाराष्ट्र समितीने दिल्लीत मोठा मोर्चा नेला होता. तेव्हा उर्दूतून उद्धवराव पाटलांनी भाषण केले. त्यांना मोठी प्रसिद्धी मिळाली. कॉ. व्ही. डी. देशपांडे यांनी इ.स. १९५२ मध्ये 'संयुक्त महाराष्ट्र' नावाचे साप्ताहिक सुरू केले व अग्रलेखातून संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली होती. संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना ६ फेब्रुवारी १९५६ रोजी एस. एम. जोशी यांनी पुण्यात टिळक स्मारक मंदिरात कार्यकर्त्यांचा मेळावा भरवला. त्याच दिवशी शनिवारवाड्यापुढील प्रचंड जाहीर सभेत संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाल्याचे व एस.एम. जोशी समितीचे चिटणीस असल्याचे घोषित झाले. काँग्रेस नेत्यांनी समिती सामील न होण्याचा निर्णय घेतला होता. डांगे, अत्रे हेही समितीत काम करू लागले १ मार्च १९५६ ते ४ एप्रिल १९५६ पर्यंत मुंबई राज्यात सत्याग्रह करून कारावास भोगला इ.स. १९५७ ची निवडणूक काँग्रेसेतर पक्षांनी संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे लढविण्याचे मान्य केले होते. संयुक्त महाराष्ट्र परिषद ही शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली होती तर संयुक्त महाराष्ट्र समिती ही एस.एम. जोशींच्या नेतृत्वाखाली होती. संयुक्त महाराष्ट्र समितीत एकूण ११ पक्ष होते.

१) प्रजासमाजवादी पक्ष
२) कम्युनिस्ट पक्ष
३) शेतकरी कामगार पक्ष
४) संयुक्त महाराष्ट्र काँग्रेसजन परिषद
५) मजदूर किसान पक्ष
६) रिव्होल्युशनरी कम्युनिस्ट पक्ष
७) लाल निशाण गट
८) शेड्युल्ड कास्ट फेडरेशन
९) हिंदू महासभा
१०) जनसंघ
११) बोल्शेव्हिक पक्ष

महाराष्ट्रातील राष्ट्रीय काँग्रेस पक्ष संयुक्त महाराष्ट्र समितीत नव्हता. डॉ. लोहियांचा समाजवादी पक्ष मात्र महाराष्ट्र समितीत सामील झाला नाही. समाजवादी पक्षातर्फे निवडणूक लढवणारे मधू लिमये, जॉर्ज फर्नांडिस, डिमले, दिनकर साक्रीकर पराभूत झाले. पण यापैकी चार पक्ष प्रमुख होते

१) प्रजा समाजवादी पक्ष २) उजवा कम्युनिस्ट पक्ष ३) शेतकरी कामगार पक्ष ४) शेड्युल्ड कास्ट फेडरेशन

यशवंतराव चव्हाण हे संयुक्त महाराष्ट्राचे कट्टर पुरस्कर्ते असले तरी लोकसभेत दिलेला निर्णय शिरोधार्य मानून, काँग्रेसच्या शिस्तीच्या चौकटीत राहून त्यांना काम करणे भाग होते. इ.स. १९५७ च्या निवडणुका येऊ घातल्या होत्या. या निवडणुकीच्या निकालाने द्वैभाषिकांवर शिक्कामोर्तब होणार होते. संयुक्त महाराष्ट्राचे भवितव्यही त्यावरच अवलंबून होते.

काँग्रेस विरुद्ध समिती असा सामना होता. या निवडणुकीत काँग्रेसचे पानिपत होणार असे अगोदरपासूनच बोलले जात होते; पण निवडणुकीत द्वैभाषिकांच्या बाजूने कौल मिळवण्याचे आव्हान यशवंतरावांनी दिले. पं. नेहरू, गोविंद वल्लभ पंत, जगजीवनराम या ज्येष्ठ नेत्यांनी द्वैभाषिक राज्य हेच मराठी भाषिकांच्या दृष्टीने कसे प्रतिष्ठेचे व लाभदायक आहे हे प्रचारसभेतून सांगितले. मार्च १९५७ मध्ये निवडणुका झाल्या. यशवंतराव चव्हाण हे कराड मतदारसंघातून केवळ ६०० मतांनी विजयी झाले; पण काँग्रेसच्या भल्या भल्या प्रतिष्ठित उमेदवारांना समितीच्या उमेदवारांकडून पराभव पत्करावा लागला. 'समितीचा एक्का, निवडून येणार पक्का' ही त्या काळातील निवडणुकीत गाजलेली घोषणा होती. एस.एम. जोशी हे समितीचे अध्यक्ष पुण्यातून विजयी झाले. पुणे शहरातील एकही जागा काँग्रेसला मिळाली नाही. पुण्यातील लोकसभेचे उमेदवार काका गाडगीळ हे समितीचे उमेदवार ना.ग. गोरे यांच्याकडून पराभूत झाले. नाना कुंटे, पी. के. सावंत हे काँग्रेसचे उमेदवार पराभूत झाले; पण केशवराव जेधे हे काँग्रेसचे उमेदवार बारामती मतदारसंघातून निवडून आले होते.

इ.स. १९५७ च्या निवडणुकीत मालोजीराव नाईक निंबाळकर, गणपतराव तपासे, साठे, मुस्तफा फकी हे मंत्री पराभूत झाले. केंद्रीय मंत्री हरिभाऊ पाटसकर व जगन्नाथ भोसले हे पराभूत झाले.

**आचार्य अत्रे यांचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान**

चित्रपट, नाटक, राजकारण, वृत्तपत्रे या क्षेत्रात त्यांनी अतुलनीय कामगिरी केली. 'नवयुग', 'जयहिंद', 'मराठा' ही पत्रे त्यांनी चालविली. 'लग्नाची बेडी', 'मोरूची मावशी', 'साष्टांग नमस्कार' ही त्यांची नाटके फार गाजली. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याचे किमान ५० टक्के श्रेय आचार्य अत्रे व मराठा या पत्रास द्यावे लागेल असे मत अभय जोशी १४ ऑगस्ट २०१६ च्या 'पुण्यनगरी'त मांडतात. इ.स. १९५६ मध्ये बहुतेक सर्व दैनिके भांडवलदारांची होती. ती संयुक्त महाराष्ट्राच्या बातम्यांना प्रसिद्धी देत नसत किंवा विकृत स्वरूपात देत. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीचा प्रचार करण्यासाठी एखादे दैनिक असावे म्हणून आचार्य अत्रे यांनी 'मराठा' पत्र सुरू केले. (७ नोव्हेंबर १९५६) 'मराठा'का अग्रलेखांतून त्यांनी काँग्रेसवर झोड उठविली. त्यांच्या अग्रलेखातून जनतेच्या भाषन्न आणखीनच चेतवल्या जात. 'जनतेचा कसाई मोरारजी देसाई' या नावाचा अग्रलेख अ यांनी लिहिला होता. आचार्य अत्र्यांना 'मराठा' या दैनिकाने अफाट लोकप्रियता मि दिली. १५ नोव्हेंबर १९५६ च्या 'मराठा'च्या २५००० प्रती काढल्या होत्या. या अंकाच्या पहिल्या पानावर सेनापती बापट, एस. एम. जोशी, मधू दंडवते, माधवराव बागल, को डांगे, प्रबोधनकार ठाकरे यांचे संदेश छापले होते. मराठी जनतेचा आवाज हे अग्रलेखाचे शीर्षक होते.

संयुक्त महाराष्ट्र समितीने संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर जी पहिली निवडणूक इ.स. १९५७ मध्ये झाली, त्या समितीचे आचार्य अत्रे हे स्टार प्रचारक होते. निवडणुकीत अत्रे, डांगे, एस. एम. जोशी, नरवणे हे उभे नाहीत; आपला महाराष्ट्र उभा आहे असे प्रभावी भाषण आचार्य अत्रे सर्वत्र करीत. स. का. पाटील, यशवंतराव चव्हाण, जवाहरलाल नेहरू यांच्यावर ते कठोर शब्दांत टीका करीत. संयुक्त महाराष्ट्राची 'मुलुख मैदानी तोफ असे त्यांचे वर्णन केले जात असे. दिवसरात्र प्रवास करून रोज ८-१० सभा ते घेत त्याची शैली आक्रमक होती, विनोद करत, भावनात्मक आवाहन ते करत. सुंदर भाषाशैली व त्याला शिवराळपणाची जोड असे त्यांच्या वक्तृत्वाचे स्वरूप होते. स्वतः अत्रे इ.स. १९५७

च्या निवडणुकीत गिरगावातून सौ. सुलोचना मोदी यांचा पराभव करून विधानसभेवर निवडून गेले होते. इ.स.१९५७ नंतर आचार्य अत्रे नावाची तोफ मुंबई विधानसभेत धडाडली लागली.

अत्रे हे मुळात शिक्षक होते. पुण्यात आगरकर हायस्कूल त्यांनी स्थापन केले होते. नाटक, कथा, कविता, निबंध, कादंबरी हे सारे साहित्य प्रकार त्यांनी हाताळले होते. त्यांनी चित्रपट निर्मिती केली होती. त्यांचा 'श्यामची आई' व 'म. फुले' हे चित्रपट खूपच गाजले. अत्यंत प्रभावी, कडवे वक्ते म्हणून त्यांचा लौकिक होता. स. का. पाटील यांच्या 'सूर्य, चंद्र असेपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही' या उदगाराबद्दल आचार्य अत्रे यांनी स. का. पाटील यांना खलपुरुष ठरविले. तर संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या मराठी जनांवर गोळ्या चालविण्याचे आदेश देणारे मोरारजी देसाई यांना 'रक्तपिपासू सैतान' ठरविले. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला पाठिंबा देणाऱ्या व त्यासाठी केंद्रातील अर्थमंत्रिपद सोडणाऱ्या डॉ. सी.डी. देशमुखांना त्यांनी 'महाराष्ट्राचे दैवत' ठरविले. 'नवयुग' साप्ताहिकात 'चिंतामणी महाराष्ट्राचा कंठमणी झाला' असा अजरामर लेख त्यांनी लिहिला. मराठी माणूस, मराठी भाषा व मराठी संस्कृती यावर अत्रे यांचे फार प्रेम होते. १३ जून १९६९ रोजी त्यांचे निधन झाले.

**संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात स्त्रियांचा सहभाग :-**

संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न चुलीपर्यंत पोहचून स्त्रियांना स्वयंपाकघरातून चळवळीत ओढण्यासाठी तन-मन अर्पण करणाऱ्या कॉ. अहिल्या रांगणेकर, कॉ. तारा रेड्डी, उषा डांगे, कॉ. कमल भागवत, विमला बागल, मालिनी तुळपुळे, काँग्रेसच्या चारुशीला गुप्ते या कार्यकर्त्या अग्रेसर होत्या. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांवर समितीने आयोजित केलेल्या अनेक परिषदांमध्ये स्त्रियांची हजेरी असे. स्त्रियांनी स्वतंत्रपणे काही परिषदा आयोजित केल्या होत्या. राज्य पुनर्रचना आयोगाच्या विरोधात प्रथमच आवाज उठविण्याचे काम महाराष्ट्र प्रांतिक हिंदू महिला सभेच्या अध्यक्षा सुंदराताई भोपटकर यांनी एक पत्रक काढून केले होते. मुंबईतील स्त्रियांनी सुमतीबाई गोरे यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्रवादी महिला परिषद भरविली होती. या परिषदेला महाराष्ट्रातील जिल्हा व तालुका पातळीवरील स्त्री प्रतिनिधी आल्या होत्या. या परिषतेदील मुख्य ठराव मुंबई राजधानी असलेल्या महाराष्टाच्या मागणीचा होता. या परिषदेस शैला पेंडसे, कमल गोरे, तारा रेड्डी, अहिल्या रांगणेकर, प्रा. चारुशीला गुप्ते, इंदू साक्रीकर, कमल पाध्ये आदी मुंबईच्या सामाजिक व राजकीय जीवनात अग्रेसर असणाऱ्या स्त्रिया होत्या.

कमला भागवत या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चिटणीस होत्या. अशाच प्रकारची परिषद गंगुताई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात भरली होती (११ मार्च १९५६). मुंबईतील महिलांनी कॉ. गोदावरी परूळेकर यांच्या अध्यक्षतेखाली १९ डिसेंबर १९५६ रोजी द्विभाषिक राज्याच्या विरोधी परिषद दादरच्या वनमाळी हॉलमध्ये भरवली. या परिषदेच्या उदघाटक प्रजा समाजवादी पक्षाच्या अनुताई लिमये होत्या, तर स्वागताध्यक्ष शिरीष पै होत्या. या परिषदेस चारुशीला गुप्ते, शांता गोखले, शांता पाठक यांची उपस्थिती होती. संयुक्त महाराष्ट्रवादी महिलांची आणखी एक परिषद पुण्यास २२ जानेवारी १९५७ रोजी भरली होती.

६ फेब्रुवारी १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे रूपांतर संयुक्त महाराष्ट्र समितीत झाले. समितीच्या सचिव म्हणून कॉ. कमल भागवत यांची निवड झाली. मालिनी तुळपुळे यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात ७ फेब्रुवारी रोजी सत्याग्रह झाला. नाशिक जिल्ह्यात निफाड, कऱ्हाड तालुक्यांत कऱ्हाड गावात स्त्रियांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी मोर्चे काढले. पुढे १६ जुलै १९५६ रोजी पुण्यात २०० स्त्रियांनी वयोवृद्ध नेत्या अंबिका दांडेकर यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह केला. २६ जुलै १९५६ रोजी महाराष्ट्रातून दिल्लीत गेलेल्या शिष्टमंडळात २५० महिला होत्या. इ.स. १९५६ च्या ९ महिन्यांच्या काळात देशाच्या स्वातंत्र्य चळवळीपेक्षाही जास्त लोक संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सहभागी झाले होते. त्यात स्त्रियांची संख्या मोठी होती. संसद भवनावर जो सत्याग्रह झाला त्यातही खियांची संख्या लक्षणीय होती. पुढे १८ डिसेंबर १९५८ रोजीही स्त्रियांनी संयुक्त महाराष्ट्र मागणीसाठी संसद भवनावर सत्याग्रह केला होता. काही स्त्रिया लहान मुलं घेऊन आल्या. कडाक्याची थंडी होती. तो सत्याग्रह ३० तास केला होता व संसदेचेल प्रश्नाकडे त्यांनी वळवले. आचार्य अत्रे, एस.एम. जोशी ही स्त्रियांची प्रेरणास्थानेही लालजी पेंडसे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील स्त्रियांच्या

सहभागाबद्दल सहा महामंथन' या ग्रंथात गौरवोद्‌गार काढले आहेत. विमलताई बागल यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर जिल्ह्यातील ३०० स्त्रियांनी निपाणी व बेळगाव येथे सत्याग्रह केले होते. त त्यांना १ महिन्याची शिक्षा झाली होती.

**महाराष्ट्र काँग्रेस श्रेष्ठींचाच संयुक्त महाराष्ट्रास विरोध :-**

डॉ. य. दि. फडके यांनी २० व्या शतकातील महाराष्ट्र या ग्रंथाच्या ७ व्या व८ खंडात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नेते शंकरराव देव, मामासाहेब देवगिरीकर, काकासाहे गाडगीळ, हिरे, यशवंतराव चव्हाण आदींनी स्वतःच्या खुर्चा सांभाळण्यासाठी दिल्लीच्या काँग्रेस श्रेष्ठींच्या पुढे लाचारीने कसे लोटांगण घातले व संयुक्त महाराष्ट्राचा आग्रह न धरता या सर्वांनी कचखाऊ स्वयंकेंद्रित धोरण कसे स्वीकारले हे स्पष्ट केले आहे. शंकरराव देव यांनी तर संयुक्त महाराष्ट्राची एक भाषिक राज्याची मागणी सोडून देऊन विशाल द्विभाषिक राज्याचा पर्याय काँग्रेस श्रेष्ठींपुढे ठेवला. (१९ ऑक्टोबर १९५५) व संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला मोठा अडथळा निर्माण केला. तसेच दिल्लीचा काँग्रेस श्रेष्ठींच्या पुढे आपण कोणताच पर्याय सुचवायचा नाही असे देवगिरीकर, काका गाडगीळ, कुंटे, भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण यांनी ठरविले होते. भाऊसाहेब हिरे हे महाराष्ट्र काँग्रेसमधील वजनदार नेते होते. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या संपूर्ण आंदोलन काळात त्यांचे धोरण बोटचेपेपणाचे, धरसोडीचे व बिनकण्याचे होते. काका गाडगीळ हे केंद्रात मंत्री होते. ते इ.स. १९४८ मध्ये मुंबईच्या शिवाजी पार्कवर संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनास मुद्दामच गैरहजर राहिले, संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी जेव्हा मराठी जनता रस्त्यावर उतरली तेव्हा महाराष्ट्र काँग्रेसचे नेते रस्त्यावर उतरले नाहीत. ते आपापल्या बंगल्यात तोंड लपवून बसले होते है दुर्दैव होय. खुद्द यशवंतराव चव्हाणांनी आपली बांधीलकी संयुक्त महाराष्ट्राशी न ठेवता पंडित नेहरूंशी म्हणजे पर्यायाने आपल्या राजकीय भवितव्याशी घट्ट केली होती. नेहरूंचा वरदहस्त त्यांना हवा होता. पुढे त्यांना संरक्षणमंत्रिपद मिळाले ते नेहरूनिष्ठेमुळेच. द्विभाषिक मोडायला मोरारजी देसाईचा सक्त विरोध होता. तरी नेहरूंचे मन महाराष्ट्राच्या बाजूला वळवण्यात यशवंतराव यशस्वी झाले.

विदर्भातील नेते दादासाहेब कन्नमवार, बापूजी अणे हे स्वतंत्र विदर्भाचे पुरस्कर्ते होते. आर.पी.आय. पक्षाचाही स्वतंत्र विदर्भासच पाठिंबा होता. मराठवाड्यातील काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ पुढारी तेव्हा सरकारात सामील झालेले असल्याने तेव्हाच्या द्विभाषिक मुंबई राज्याला तोंडापुरता पाठिंबा देणारे होते पण मनाने ते संयुक्त महाराष्ट्रवादीच होते. स्वामी रामानंद तीर्थ, अनंतराव भालेराव, बाबासाहेब परांजपे हे सर्व संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते होते.

मुंबईतून प्रकाशित होणारी 'लोकसत्ता', 'नवशक्ती' व 'लोकमान्य' ही पत्रे संयुक्त महाराष्ट्राच्याबाबत आग्रही नव्हती; त्यामुळे त्यांचा खप या चळवळीच्या काळात फारच कमी झाला. 'मराठा' या पत्राने आग्रहपूर्वक ही मागणी रेटल्याने त्याचा खप ६०,०००/- पर्यंत गेला. या पत्राने पं. नेहरू व यशवंतराव चव्हाणांवर प्रचंड टीका केली होती. भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व स्वीकारून संपूर्ण देशात प्रांतांची पुनर्रचना करण्यात आली होती. पण महाराष्ट्रात मात्र निर्णय घ्यावयास काँग्रेसश्रेष्ठी तयार नव्हते. मुंबईचे स्वतंत्र राज्य हा निर्णय झाला तर भांडवलदारांचा फायदा होणार होता.

१ मे १९६० या दिवशी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली पण त्यामध्ये बेळगाव, कारवार, बिदर, भालकी, संतपूर हा सुमारे २० लाख मराठी भाषिकांचा मुलुख समाविष्ट करण्यात आला नाही हे दुर्दैव होय. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात एस. एम. जोशी यांचे कार्य - सर्व विरोधी पक्षांची एकजूट करून संयुक्त महाराष्ट्र संसदीय आणि सत्याग्रहाच्या मार्गाने खेचून आणला म्हणून संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून एस.एम. जोशी यांचे योगदान फार महत्त्वाचे आहे. आचार्य अत्रे यांनी आपल्या खास शैलीत एस.एम. म्हणजे एस (संयुक्त) एम. (महाराष्ट्र) असे समीकरण केले होते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची तारेवरची कसरत एस.एम. यांना करावी लागली. त्यांच्याबरोबर कॉ. डांगे, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, वालचंद कोठारी, माधवराव बागल, दाजीबा देसाई, बी.सी. कांबळे, दत्ता देशमुख, डॉ. नरवणे आदी नेतेमंडळी होती. संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करून या समितीचे सरचिटणीस या नात्याने एस. एम. जोशींनी महाराष्ट्र जनतेला नेतृत्व दिले. संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन आक्रमक असूनही अहिंसक होते. सत्याग्रह आणि असहकाराचे

स्वरूप लोकशाहीच्या चौकटीत बसणारे होते व सत्याग्रहाच्या बरोबरीनेच विधानसभेच्या निवडणुकांना सामोरे जाऊन संसदीय पद्धतीने लढा दिला गेला. लोकशाहीत लोकांचा पाठिंबा असेल तर हिंसेचा वापर न करता ध्येय गाठता

येते हेच या चळवळीने दाखवून दिले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही विद्रोही होती. काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाला व संघटनेला द्रोह किंवा द्रोही असण्याची सर्व वैशिष्ट्ये यात होती. स. का. पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबई काँग्रेस कमिटीने मुंबई महाराष्ट्राला देऊ नये असे निवेदन दार कमिशनला दिले होते. जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभिसीतारामय्या हे पण संयुक्त महाराष्ट्राचे विरोधकच होते. 'महाराष्ट्रापेक्षा नेहरू मोठे' असे विधान करून यशवंतराव चव्हाण हे नेहरूंच्या भूमिकेचे समर्थन करत होते.

या सर्वांच्या भूमिकेविरुद्ध महाराष्ट्रातील जनतेने उठाव वा बंड केले. मराठी भाषिक जनतेला त्यांच्या मायबोलीचे राज्य कोणत्याही परिस्थितीत द्यायचेच नाही या मुद्यावर दिल्लीश्वर ठाम होते. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यास सर्वसामान्य गुजराथी भाषिक जनतेचा विरोध नव्हता. पण त्या मागणीस विरोध करणारे गुजराथी भाािदिओ भांडवलदार व त्यांची इमानेइतबारे पाठराखण करणारे काँग्रेसश्रेष्ठीच होते. या चळवळीने काँग्रेस शासनाच्या विरुद्ध उठाव केला होता. या उठावात प्रारंभी समन्वय नव्हता पस संघर्षांचे (प्रतिकार किंवा विद्रोहात) सातत्य होते. संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आल्याने १५ वे घटक राज्य भारतात अस्तित्वात आले.

**संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व डॉ. आंबेडकर :-**

प्रबोधनकार ठाकरे यांनी डॉ. आंबेडकरांना संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे नेतृत्व करण्याची विनंती केली होती. तेव्हा आंबेडकरांनी म्हटले होते, 'माझ्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील इतर नेते एकत्र येणार नाहीत पण तुम्ही (ठाकरे) लढा उभारावा. मी व माझे अनुयायी मोला निष्ठेने लढ्याच्या पाठीमागे उभे राहू.' आंबेडकरांनी संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याला वेळोवेळी पत्रके काढून, सार्वजनिक भाषणे करून, वृत्तपत्रांना मुलाखती देऊन, टाइम्स ऑफ इंडियात लेख लिहून, राज्यसभेत दोन वेळेस सविस्तर भूमिका मांडून पाठिंबा दिला होता. थॉ. आंबेडकर यांच्या या प्रारंभीच्या मतात नंतर परिवर्तन झाले.

डॉ. आंबेडकरांनी सततच्या विचार प्रक्रियेमधून महाराष्ट्र राज्याच्या भवितव्यासंबंधी काही सूचना केलेल्या दिसतात. प्रारंभी त्यांनी संयुक्त महाराष्ट्राला विरोध केला. भाषावार प्रांतरचनेला त्यांचा विरोध होता. भाषावार प्रांतरचनेमुळे भारताचे तुकडे होण्याची प्रक्रिया सुरू होईल अशी त्यांना भीती वाटत होती. घटक राज्यांच्या निरनिराळ्या भाषा निरुपयोगी असून त्या सर्व समुद्रातच बुडवल्या पाहिजेत. हिंदी ही एकच भाषा असली पाहिजे. कारण त्यामुळे राष्ट्रीय भावना वाढीस लागेल असे त्यांनी म्हटले होते. आंबेडकरांनी 'भाषिक राज्यासंबंधी विचार' ही पुस्तिका प्रकाशित केली होती. महाराष्ट्राची राजधानी औरंगाबाद असावी अशी सूचना डॉ. आंबेडकरांनी केली होती. राज्य पुनर्रचना आयोगाच्या अहवालानुसार उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र हे मोठे प्रांत निर्माण झाल्याचे समजताच त्यांनी तीव्र विरोधी प्रतिक्रिया दिली होती. सह्याद्रीच्या अलीकडे अनुक्रमे पूर्व महाराष्ट्र व पलीकडे पश्चिम महाराष्ट्र अशी दोन राज्ये करावीत असे त्यांनी सुचविले होते. नंतर त्यांच्या भूमिकेत बदल झाला व त्यांनी महाराष्ट्राची चार राज्ये सुचविली. मुंबईसह कोकण राज्य, मराठवाडा) विदर्भ (पूर्व महाराष्ट्र), पश्चिम महाराष्ट्र, सध्याच्या परिस्थितीत निर्माण झालेले प्रश्न पाहता आंबेडकरांच्या सूचना कशा वस्तुनिष्ठहोत्या हे दिसते.

राज्य पुनर्रचना समितीच्या अहवालावर महाराष्ट्रात तीव्र प्रतिक्रिया उमटली. मुंबई हे विशाल द्वैभाषिक निर्माण करण्यात आले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या पुरस्कर्त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली. विशाल द्वैभाषिकांविरुद्ध शांततामय कायदेशीर तसेच सत्याग्रही आंदोलन सुरू झाले. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालचा शेड्युल्ड कास्ट फेडरेशन हा एका समितीमधील एक घटक पक्ष होता. द्विभाषिकास विरोध, मुंबई महाराष्ट्रातच असावी संयुक्त महाराष्ट्रास विरोध या आंबेडकरांच्या भूमिका होत्या. लहान राज्यांमुळे राष्ट्राचा विकास पांगला होऊ शकेल, लहान राज्ये केंद्र सरकारला आव्हान देऊ शकत नाहीत म्हणून लहान राज्ये करावीत अशी सूचना त्यांनी राज्य पुनर्रचना आयोगास केली होती. इ.स. १९३८ मध्ये मुंबई विधिमंडळात त्यांनी कर्नाटक प्रांताच्या निर्मितीला विरोध केला होता. संयुक्त महाराष्ट्रात मराठा समाज शासनकर्ता होणार असे भाकीत व्यक्त करून महाराष्ट्रातील अल्पसंख्य समाज, विशेषतः अनुसूचित जाती व जमाती यांना मराठ्यांच्या हातून न्याय मिळणार नाही. इतिहास त्याची साक्ष आहे असे त्यांनी सांगितले.

८ डिसेंबर १९५५ रोजी औरंगाबाद येथे मराठवाड्याचे नेते स्वामी रामानंद तीर्थ पांच्यासह शंकरराव देव त्यावेळी आजारी असलेल्या डॉ. आंबेडकरांच्या भेटीस गेले असता त्यांनी त्या दोन्ही नेत्यांना महाराष्ट्राची ३ राज्ये असावीत. त्याबद्दलची योजना नकाशे व इतर तपशील यांच्या मदतीने समजावून सांगितली होती. डॉ. आंबेडकराचा संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईत प्रत्यक्ष भाग नव्हता. तरी त्या लढ्यासाठी दिलेली वैचारिक लढाई ही चळवळ यशस्वी होण्यासाठी उपयुक्त ठरली असे मत सुहास सोनवणे ३ मे २०१० च्या लोकसत्तात एका लेखात व्यक्त करतात.

**द्विभाषिक विधेयकास संसदेची मंजुरी :-**

७ ऑगस्ट १९५६ रोजी महाद्विभाषिक म्हणजे महाराष्ट्र व गुजरात या संयुक्त राज्याचे विधेयक संसदेने मंजूर केले. तेव्हा महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली. ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर १९५६ रोजी शिवाजी पार्कवर संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची महाद्विभाषिक विरोधी परिषद घेण्यात आली. आचार्य अत्रे, सेनापती बापट, माधवराव बागल, एस. एम. जोशी, बी.टी. रणदिवे, दत्ता देशमुख, जयंतराव टिळक इत्यादी मंडळी हजर होती. द्विभाषिक राज्य मोडीत काढावे व त्यासाठी समितीने प्रखर आंदोलन करावे असा ठराव यावेळी संमत झाला होता. बेळगाव, निपाणी, कारवार, बीदर, भालकी, डांग, बैतुला, नांदगाव, बस्तरसह, महाराष्ट्र निर्माण व्हायला हवा होता. पण तो झाला नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामुळेच मुंबई महाराष्ट्राला मिळाली; नाही तर मुंबई गुजराथमध्ये गेली असती किंवा केंद्रशासित प्रदेश किंवा मुंबई कदापि स्वतंत्र राज्यही निर्माण झाले असते.

**संयुक्त महाराष्ट्र समितीचे यश :-**

इ.स. १९५७ च्या निवडणुकीत मुंबई वगळता पश्चिम महाराष्ट्रात समितीला १०२ जागा मिळाल्या. मुंबईत काँग्रेसला २४ पैकी ११ जागा मिळाल्या. अशा प्रकारे मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेस ४६ तर समिती ११८ असे पक्षबळ होते. समितीच्या बाजूने ३७ लक्ष मतदारांनी कौल दिला होता तर काँग्रेसच्या बाजूने २४ लक्ष मतदारांनी कौल दिला होता. लोकसभेच्या पश्चिम महाराष्ट्रात मुंबईच्या बाहेर २२ जागा होत्या. त्यातील २० जागा समितीने जिंकल्या. पण विदर्भ व मराठवाड्यात समितीला पाय पसरता आले नाते मराठवाड्यात ४२ पैकी ७ जागा तर विदर्भातील ६३ पैकी विरोधकांना ७ जागा मिळाल्या त्यात समित्याच्या ७ जागा होत्या. गुजरात, कच्छ व सौराष्ट्र या ३ भागांत मिळून असलेल्या १३२ जागांपैकी काँग्रेसने १०० जागा जिंकल्या. महागुजरात जनता परिषदेने २९ जागा मिळविल्या तर ३ जागा प्रजासमाजवादी पक्षाने मिळवल्या. एकूण विदर्भ, मराठवाडा, गुजरात, सौराष्ट्र, कच्छ या भागात काँग्रेसची सत्ता टिकून होती तर पश्चिम महाराष्ट्र व मुंबईत मात्र काँग्रेसचे पानिपत होऊन समिती आघाडीवर होती. विशाल मुंबई राज्याच्या विधानसभेत प्रजासमाजवादी पक्षाचे २८, शे. का. पक्षाचे ३३, कम्युनिस्ट पक्षाचे १९ व रिपब्लिकन पक्षाचे ६, संयुक्त महाराष्ट्र काँग्रेस जनपरिषदेचे ८ आमदार निवडून आले. विधानसभेत पाळीपाळीने एक वर्षासाठी एक विरोधी पक्षनेता नेमण्याचे ठरले. एस. एम. जोशी, भाई उद्धवराव पाटील, कॉ. व्ही. डी. देशपांडे, आर. डी. भंडारे, डॉ. त्र्यं. र. नरवणे असा तो क्रम होता. या सर्वांनीच संयुक्त महाराष्ट्राची मागणी विधानसभेत लावून धरली होती. पश्चिम महाराष्ट्र व मुंबईतील काँग्रेसचे नेते मात्र द्वैभाषिकांच्या विरुद्ध जनतेने दिलेला हा कौल आहे असे मानावयास तयार नव्हते. काँग्रेस नेते म्हणू लागले, 'समितीत एकत्र आलेल्या विरोधी पक्षाकडे कोणताही कार्यक्रम नव्हता. केवळ काँग्रेसविरोध हाच त्यांचा एकमेव उद्देश होता.'

समितीच्या उमेदवारांनी मोरारजी देसाईंच्या पोलिसांनी ज्या १०५ लोकांचे बळी घेतले त्याचा पुरेपूर उपयोग प्रचार मोहिमेच्या वेळी करून घेतला. आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' पत्रानेही मोठे योगदान दिले. अत्रे यांच्या विनोदी वक्तृत्वाने महाराष्ट्रातील जनतेचे मन त्या काळात जिंकले होते. त्यांच्या सभेला तुफान गर्दी होई. महाराष्ट्रात 'काँग्रेस' हा त्यांनी हास्यास्पद विषय करून टाकला होता. विरोधक निवडून आले; पण त्यांना मिळालेली मते त्यांची नव्हती तर संयुक्त महाराष्ट्राची होती. निवडणुकीनंतर यशवंतराव चव्हाण हेच मुख्यमंत्री झाले तर एस.एम. जोशी हे विरोधी पक्षनेते झाले. विधानसभेचे अधिवेशन राज्यपालांच्या अभिभाषणाने सुरू झाले; पण त्यात संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचा उल्लेखच केलेला नव्हता. परिणामी संयुक्त महाराष्ट्र समितीचे सभासद परखडपणे टीका करीत राहिले. यशवंतरावांनी पक्षसंघटनेवर आपली पकड मजबूत करण्यासाठी पक्षसंघटनेत काही बदल घडवून आणले. मालोजीराव नाईक

निंबाळकर हे प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष झाले, त्यांच्याच अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या शिवस्मारक समितीने प्रतापगडावर शिवरायांच्या पुतळ्याच्या अनावरणासाठी पं. नेहरूंना पाचारण केले. वस्तुतः समितीत सर्व जाती-धर्माचे लोक होते. समितीतील ब्राह्मण नेत्यांचा उल्लेख करून; पण त्यांच्या जातीचा उल्लेख टाळून एक निनावी पत्रक काढून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादास खतपाणी घालण्याचा प्रयत्न झाला. समितीतील ब्राह्मण नेते हे शिवस्मारकाचे उद्घाटन पं. नेहरूंच्या हस्ते कोणत्याही परिस्थितीत करूच देणार नाहीत अशी अफवा सोडून देण्यात आली होती. निदर्शनाचा पुर्नविचार करावा असे पत्रक अपक्ष नेते, विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ यांनी संयुक्तपणे काढले हाते. वृत्तपत्रांनीही अग्रलेख लिहून निदर्शनांचा फेरविचार करावा असे सुचविले महाराष्ट्रात निर्माण झालेल्या वातावरणाने यशवंतराव बेचैन झाले होते. ३० नोव्हेंबर १९५७ रोजी प्रतापगडावर पं. नेहरूंच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्याच्या अनावरणाचा कार्यक्रम शांततेने पार पडला. समितीच्या लोकांनीही शिस्त व संयम राखायचे सौजन्य दाखविले. प्रतापगडाच्या पायथ्याशी जमलेला हा शांततापूर्ण विरोधकांचा जमाव पाहून पंडित नेहरूंनाही मराठी भाषिकांच्या मागणीची तीव्रता जाणवली असावी. प्रतापगड निदर्शनापासूनच नेहरूंच्या विचारात बदल होत गेले आणि महाराष्ट्र राज्यनिर्मितीस अनुकूल वातावरण निर्माण झाले. संयुक्त महाराष्ट्र समितीने फेरनिवडणुकीत (इ.स. १९५७) चांगलेच यश मिळवले. गंबई काँग्रेसचे झकेरिया, जालन्यात काँग्रेसचे बाबासाहेब सवनेकर पराभूत झाले व तेथे समितीचे सदस्य विजयी झाले. मराठवाड्यात नांदेड वगळता सर्व जिल्हा लोकल बोर्डस् समितीच्या ताब्यात गेले. निवडणुकांतील ही पीछेहाट पाहून पं. नेहरू हे द्वैभाषिक राज्याचा विचार सोडत आहेत हे पं. नेहरूंच्या व्याख्यानातून स्पष्ट होऊ लागले; पण मुंबई कंद्रशासित ठेवण्याच्या निर्णयावर मात्र ते ठाम होते. भाऊसाहेब हिरे यांनी पं. नेहरूंना पत्रः पाठवून नेहरूंच्या बदललेल्या भूमिकेसंदर्भात विचारणा केली. हिरे यांचे अत्यंत निकटचे सहकारी गो.ह. देशपांडे यांनी द्वैभाषिकाचे दोन तुकडे करावेत अशी मागणी एका निवेदनाद्वारे कली. देशपांडे यांचे निवेदन म्हणजे भाऊसाहेब हिरे यांचेच निवेदन असा अर्थ लावून यशवंतरावांच्या नेतृत्वालाच हिरे आव्हान देत आहेत असा अर्थ काढला गेला. स्वतः भाऊसाहेब हिरे यांनी स्पष्ट केले की, 'द्वैभाषिकाचे जे समर्थक आहेत त्यांना स्वतःची व लोकांची फसवणूक फार काळ करता येणार नाही.' इ.स. १९५७ च्या निवडणुकीनंतर विरोधी पक्षांनी आळीपाळीने विरोधी पक्षनेता नियुक्त करण्याचे ठरविले. ५ वर्षांत क्रमाने एस. एम. जोशी, उद्धवराव पाटील, डॉ. त्र्यं. र. नरवणे हे विरोधी पक्षनेते असतील असे ठरले. यापैकी 'पहिल्या तिघांनी' ते पद समर्थपणे पेलून संयुक्त महाराष्ट्राची मागणी लावून धरली.

संसदेसमोर निदर्शन (१८ डिसेंबर १९५८) संयुक्त महाराष्ट्र समितीचे आंदोलन सतत सक्रियपणे सुरू राहिल्याने पं. नेहरूंना आपल्या भूमिकेत बदल करावा लागला. या प्रश्नाचा फेरविचार करण्याच्या दृष्टीने त्यांच्या मनाची तयारी होऊ लागली होती. संयुक्त महाराष्ट्र समितीने १८ डिसेंबरला दिल्लीत संसद भवनासमोर प्रचंड निदर्शने घडवून चर्चाही घडवली. केंद्रीय गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी औरंगाबाद व मुंबईला भेट देऊन परिस्थितीचा अंदाज घेतला. द्वैभाषिकांची विभागणी लांबणीवर न टाकता लोकांच्या इच्छेचा आपण आदर केला पाहिजे याची जाणीव त्यांना झाली. पं. नेहरूंचेही मत हळूहळू बदलू लागले. काका गाडगीळ यांनी दिल्लीत संयुक्त महाराष्ट्राबाबत घडून येऊ लागलेला मानसिक बदल यशवंतराव चव्हाण व काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष मालोजीरा निंबाळकर यांच्या नजरेस आणून दिला.

**इंदिरा गांधींचा संयुक्त महाराष्ट्रास पाठिंबा**

मोरारजी देसाई द्वैभाषिक राज्यास तयार नव्हते. पं. नेहरूंची कन्या इंदिरा गांधी या आता काँग्रेसच्या अध्यक्षा झाल्या होत्या यशवंतराव व इंदिरा गांधी यांनी पं. नेहरूंचे व गोविंद वल्लभ पंत यांचे मन वळविले द्वैभाषिक तोडग्याचा निर्णय करण्याचे श्रेय त्यावेळच्या लोकांनी इंदिरा गांधीना दिले ब्रिजलाल बियाणी यांची ३ राज्यांची मागणी ४ मार्च १९५९ या दिव मुंबई विधानसभेतील चर्चेच्या वेळी बियाणी यांनी मुंबई द्वैभाषिक राज्याच्या विभागणीची मागणी करून त्रिराज्य निर्मितीची मागणी केली.

१) महाराष्ट्र, २) महागुजरात, ३) महाविदर्भ

महाविदर्भाची मागणी ५ वर्षांपूर्वी बियाणी यांनी केली तेव्हाही बरेच वादळ झाले होते आता तर त्यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली. द्वैभाषिक राज्याची विभागणी व्हावी असे उत्तर प्रदेशातील खासदारांना वाटत होते कारण

ते राज्य जर कायम राहिले तर लोकसभेत त्या राज्याचा खासदारांचा मोठा गट होवून भविष्यकाळात पंतप्रधानपद त्या प्रांताकडे जाईल अशी भीती त्यांना वाटे.

गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समिती चंदीगड येथे अ.भा. काँग्रेसचे अधिवेशन भरले (इ.स.१९५९) तेव्हा काँग्रेसच्या अध्यक्षा इंदिरा गांधीनी गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यांची एक समिती नियुक्त केली. था समितीत यशवंतराव चव्हाण, जिवराज मेहता, स.का. पाटील, गोपाळराव खेडकर, के शहा, ठाकूरभाई देसाई, बाबासाहेब सवनेकर व मारोतराव कन्नमवार यांचा समावेश होता. डांग आणि ठाणे व पश्चिम खानदेशातील काही गावे गुजरातमध्ये घालण्यास चव्हाण यांनी मान्यता दिलीच होती. त्यामुळे या दोन राज्यामधील सीमेबाबत वाद निर्माण होण्याचा प्रश्न नव्हता. आर्थिकदृष्ट्या या दोन राज्यांची विभागणी करण्याच्या प्रश्नावरच सर्व चर्चा केंद्रित झाली होती. गोविंद वल्लभ पंत यांनी ३ डिसेंबरला आपल्या समितीचा अहवाल काँगे। वर्किंग कमिटीला सादर केला. दुसऱ्या दिवशी वर्किंग कमिटीने एक ठराव मंजूर केला. महाराष्ट्र व गुजरात या नव्याने निर्माण होणाऱ्या दोन राज्यांतल्या अर्थविषयक तपशिलास यशवंतराव चव्हाण व जिवराज मेहता यांनी मान्यता दिली. मुंबई राज्यातील एकूण मालमत्तेचे वाटप करण्यापूवी महाराष्ट्राने गुजरातला १० कोटी रु. नवीन राजधानी बांधण्यासाठी म्हणून द्यावेत असे ठरले. त्याशिवाय गुजरात राज्य अस्तित्वात आल्यानंतर त्याला जी आर्थिक तूट येईल ती तूट पहिली ६ वर्षे महाराष्ट्राने भरून काढावी हे मान्य करण्यात आले. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या घटक पक्षांत मतभेद संयुक्त महाराष्ट्र दृष्टिक्षेपात आला असता संयुक्त महाराष्ट्र समितीच्या घटक पक्षांत मतभेद वाढत असल्याचे दिसून येऊ लागले. मुंबई महानगरपालिका जरी संयुक्त महाराष्ट्र समितीने जिंकली तरी समितीच्या मित्र पक्षांतील महापालिकेच्या सदस्यांत वाद वाढतच गेला..

स.१९५८ या संपूर्ण समितीच्या घटक पक्षांत भांडणांची फार मोठी लागण झाली होती. अत्रे यांनी समाजवादी पक्षाला धारेवर धरून 'मराठा' पत्रातून या पक्षावर टीकेची झोड उठवल्याने सर्वजण अस्वस्थ झाले होते. प्रजा समाजवादी पक्षाची मंडळी समितीच्या ऐक्याला सुरुंग मान काँग्रेस नेत्यांशी चुंबाचुंबी करत आहेत याचा अत्रे यांना राग होता. प्रजा समाजवादी पाव कम्युनिस्ट यांच्यातील मतभेदांची दरी पुढील काळात रुंदावतच गेली.

काँग्रेस श्रेष्ठींनी संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला मान्यता देताच डॉ. नरवणे यांनी आपल्या ८ आमदारांसह सहकाऱ्यांना काँग्रेसमध्ये दाखल झाले व दारूबंदीमंत्री बनले. संयुक्त महाराष्ट्राची अधिकृत घोषणा होऊन महाराष्ट्र अस्तित्वात आल्याचा आनंदोस्तव साजरा होण्यापूर्वीच समितीचे ३० आमदार काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. चीनच्या आक्रमक हालचालीवरूनही समितीच्या सदस्यांत मतभेद वाढले. कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. डांगे हे चीनला आक्रमक मानावयास तयार नव्हते.

समितीचे ऐतिहासिक कार्य आता बहुतांशी पूर्ण झालेले असल्यामुळे एक तर समिती बरखास्त करावी किंवा महाराष्ट्र-म्हैसूर सीमाप्रश्नापुरते समितीचे कार्य मर्यादित करावे असे समाजवादी पक्षाचे मत होते. सीमाप्रश्नाच्या संदर्भात समितीच्या सर्व आमदार- खासदारांनी राजीनामे द्यावेत अशी सूचना प्रजा समाजवादी पक्षाने केली होती; पण कम्युनिस्ट पक्षाने त्यास जाहीर विरोध केला.

संयुक्त महाराष्ट्र निर्माण होताच १५ दिवसांनी प्रजा समाजवादी पक्ष समितीतून बाहेर पडला. संयुक्त महाराष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष त्यापूर्वीच काँग्रेसमध्ये गेला होता. प्रजासमाजवादी पक्षाच्या मागोमाग किसान मजदूर पक्षाचे सदस्य काँग्रेसमध्ये दाखल झाले.

एकूण संयुक्त महाराष्ट्र समितीचे कार्य महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळी काँग्रेसकडे १३६ तर विरोधी पक्षांकडे १२२ आमदार होते. समिती थोडी सक्रिय झाली असती तर ८-९ आमदारांचा (काँग्रेसच्या) पाठिंबा घेऊन समितीची सत्ता प्रस्थापित झाली असती; पण समितीमधील काही आमदार यशवंतराव चव्हाणांच्या बाजूने होते. यशवंतराव मोहिते ४-५ आमदार घेऊन (कामगार-किसान पक्ष) काँग्रेसमध्ये गेले. विधानसभेतील काँग्रेसचे संख्याबळ १३५ वरून १६० वर गेले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रातील काँग्रेसजन 'यशवंतराव चव्हाणांनी संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्णकलश आणला' असे म्हणू लागले; पण एस.एम. जोशी यांना ते मान्य नव्हते. खुद्द यशवंतराव चव्हाणांनी मात्र संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे श्रेय स्वतःकडे न घेता जाहीरपणे

महाराष्ट्राच्या जनतेला दिले. एस. एम. जोशी एका भाषणात म्हणतात, 'प्रत्येक चळवळीला नेता लागतो. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात भाई डांगे, आचार्य अत्रे, उद्धवराव पाटील, मी आणि समितीच्या कार्यकारिणीतील आमचे सहकारी संयुक्तपणे नेतृत्व करीत होतो. त्याचबरोबर लोकांनी आम्हास उत्स्फूतपणे प्रचंड पाठिंबा दिला म्हणून आमचे नेतृत्व प्रभावी ठरले. मराठी जनतेने संयुक्त महाराष्ट्र समितीच्य नेतृत्वाखाली लढून संयुक्त महाराष्ट्राचा सुवर्णकलश आणला. सिंहासनावर कोणस आहे याचे मला महत्त्व नाही.'

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राचे यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले, ' हे सर्व मराठी जनतेचे राज्य असेल' असी ग्वाही त्यांनी दिली. यशवंतराव हे का प्रशासक, मुत्सद्दी, धोरणी व दूरदृष्टी असलेले नेते होते. यशवंतराव चव्हाण हे दूरवी निश्चियी, निधर्मी व त्यागी नेते होते. त्यांनी सचोटीने, धोरणीपणाने महाराष्ट्राला लागले ग्रहण सोडविले. इ.स.१९६० नंतर त्यांनी धूर्तपणे सत्तेच्या राजकारणातील डावपेच आखले. 'महाराष्ट्राचे भवितव्य घडवताना मला कर्तबगार सहकारी हवेत. बहुजन समाजातील कर्तबगार व्यक्तींनी विरोधाचे नकारात्मक राजकारण करण्याऐवजी सत्तेत सहभागी होऊ महाराष्ट्राचे हित साधावे' असे स्पष्ट आवाहन त्यांनी केले होते. यशवंतराव मोहिते, रामभाऊ तेलंग, भाऊसाहेब शिरोळे वगैरे तडफदार कार्यकर्ते विरोधी पक्ष सोडून काँग्रेस पक्षात दाखल झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेतृत्व करणारांना मात्र इ.स. १९६२ निवडणुकीत पराभवास सामोरे जावे लागले हे दुर्दैव होय. विशेष म्हणजे इ.स. १९६२ विधानसभेच्या निवडणुकीत एस.एम. जोशी त्यांच्या एकेवेळच्या सहकाऱ्याकडून (रामभा तेलंग जे महापौर होते व काँग्रेसमध्ये आले होते) पराभूत झाले. ना.ग. गोरेही शंकरराव मोरे यांच्याकडून लोकसभा निवडणुकीत पराभूत झाले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे व शासनाच्या भूमिकेचे अपयश म्हणजे बेळगाव, कारवार, खानापूर, निपाणी, बिदर, भालकीसह मराठी भाषिकांचा मोठा भाग कर्नाटकात समाविष्ट करण्यात आला. तो आजही (१९५६ पासून) कर्नाटकातच आहे. भविष्यकाळाती तो कर्नाटकातच राहणार आहे. कोणताच राजकीय पक्ष व शासन या प्रश्नी तोडगा का शकले नाही. सीमावर्ती मराठी भाषिकांनी मागील ६० वर्षात अनेक अन्याय सहन केले आहेत. विकासापासून मराठी भाषिक प्रदेश दूरच राहिला आहे. कर्नाटक सरकारनेही बेळगाव शहरास उपराजधानीचा दर्जा देऊन महाराष्ट्रावर एका अर्थान कुरघोडीच केली आहे. कर्नाटकात मराठीबहुल ५ विधानसभा मतदार संघ होते व आजही आहेत. प्रारंभी २५-३० वर्षात महाराष्ट्र एकीकरण समितीचे ५ आमदार सतत निवडून येत होते.